
CMYK




सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह
धाराशिव | बुधवार, ४ फेब्रुवारी २०२६ । वर्ष ३ रे अंक ३३५ । पाने १२+८ । किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



राष्ट्राची ओळख त्याच्या संस्कृतीने होते, भूमीवरून नव्हे. भूमी येत-जात राहते, परंतु सांस्कृतिक संकल्पना शाश्वत असतात. आज आपली अनेक महत्त्वपूर्ण स्थळे आपल्या सीमेपल्याड गेली आहेत.

**- अमीरचंद**
संस्कार भारतीचे पूर्व अ. भा. महामंत्री

## महत्त्वाचे

### डॉलरच्या तुलनेत रुपया १३० पैशांनी मजबूत

**मुंबई :** भारतीय रुपया मंगळवारी अमेरिकन डॉलरच्या तुलनेत तीन वर्षांतील सर्वांत मोठ्या वाढीसह ९०.२० च्या पातळीवर पोहोचला. ही वाढ अमेरिका आणि भारत यांच्यातील व्यापार कराराच्या घोषणेमुळे झाली आहे. यामध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय वस्तूंवरील शुल्क ५० टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत कमी केले आहे. यापूर्वी २०२५ मध्ये रुपया सुमारे ५ टक्क्यांनी घसरून आशियातील सर्वांत कमकुवत चलन बनला होता. जानेवारी २०२६ मध्येच यात २ टक्क्यांची घसरण नोंदवली गेली होती. परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांच्या सततच्या काढणीमुळे रुपयावर दबाव होता. तथापि, मंगळवारी रुपयाने ९१.४९ च्या मागील बंदच्या तुलनेत १३० पैशांची मजबूती नोंदवत पुनरागमन केले आहे.

### सुनेत्रा पवारांकडे पुणे,बीडच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी

**मुंबई :** अजित पवार यांच्या निधनानंतर राज्याच्या राजकारणात झालेल्या बदलांच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. राज्य सरकारने जारी केलेल्या आदेशानुसार, सुनेत्रा पवार या पुणे आणि बीड जिल्ह्यांच्या पालकमंत्री म्हणून काम पाहणार आहेत. उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर अल्पावधीतच त्यांच्याकडे दोन म हत्त्वाच्या जिल्ह्यांची धुरा देण्यात आली आहे. याप्रसंगी शुभेच्छा देताना प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी नमूद केले आहे की, आपल्या प्रत्येक निर्णयात, प्रत्येक प्रवासात माझ्यासह संपूर्ण राष्ट्रवादी परिवार आपल्यासोबत ठाम पणे उभा आहे. आपले नेतृत्व महाराष्ट्राला क्षणोक्षणी अजितदादांच्या नेतृत्वाची आठवण करून देणारे ठरेल हा मला विश्वास आहे. आपणांस पुढील यशस्वी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छो.

### 'लाडकी बहीण'मुळे अर्थव्यवस्था अस्थिर होण्याचा धोका

**मुंबई :** रोख पैशांच्या स्वरूपात लाभ देण्याच्या योजनांवरील वाढत्या अवलंबित्वामुळे राज्यांची अर्थव्यवस्था अस्थिर होण्याचा धोका आहे, असा इशारा १६ व्या वित्त आयोगाने संसदेत सादर केलेल्या आपल्या अहवालात दिला आहे. या इशाऱ्यामुळे राज्य सरकार लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात एखादा ठोस निर्णय घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### रोहित पवारांना सुप्रीम कोर्टाचे खडेबोल

मुंबई : सुप्रीम कोर्टाने एमसीए अर्थात मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या सदस्य नोंदणीवर तीव्र आक्षेप नोंदवत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांना खडेबोल सुनावलेत. एवढी बेकायदा कामे करण्याची हिंमत होतेच कशी? असा खडा सवाल कोर्टाने या प्रकरणी रोहित पवार यांना केला आहे. कोर्टाच्या या भूमिकेनंतर रोहित पवार यांनी यासंबंधीची आपली याचिका मागे घेतली आहे. रोहित पवार यांनी आपल्या कुटुंबातील सदस्यांसह ४०० जणांची एमसीएवर आजीवन सदस्य म्हणून नोंदणी केली होती. त्यावर माजी क्रिकेटपटू केदार जाधव यांनी आक्षेप घेतला होता. त्यांच्या मते, बीसीसीआयच्या निकालानंतर सदस्य नोंदणीला सुप्रीम कोर्टाची परवानगी लागते. तत्पूर्वी, एमसीएच्या घटनेतही तसा बदल करावा लागतो. पण त्यानंतरही रोहित पवार यांनी आपल्या कुटुंबातील सदस्यांसह ४०० जणांची एमसीएवर आजीवन सदस्य नोंदणी केली. केदार जाधव यांनी या प्रकरणी रोहित पवारांच्या निर्णयाला आव्हान देत सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली होती. त्यावर सुनावणी करताना कोर्टाने आज रोहित पवारांना खडेबोल सुनावले.

# लोकसभेत अभूतपूर्व गदारोळ

## ● कामकाज दिवसभरासाठी स्थगित ● राहुल गांधी यांचा अट्टहास भोवला

**◆ नवी दिल्ली, ३ फेब्रुवारी**

**विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मंगळवारी पुन्हा आपल्या भाषणात वादग्रस्त मुद्यांची पुनरावृत्ती करण्याचा प्रयत्न करताच लोकसभेत अभूतपूर्व गदारोळ झाला, त्याची परिणती सभागृहाचे कामकाज आधी तीनदा आणि नंतर दिवसभरासाठी स्थगित करण्यात आली.**



दोनदा स्थगित झाल्यानंतर दुपारी दोन वाजता लोकसभेचे कामकाज सुरू होताच पीठासीन अधिकारी कृष्णप्रसाद तेन्नटी यांनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावरील चर्चेत आपले अपूर्ण भाषण पूर्ण करण्यासाठी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे नाव पुकारले. ज्या कागदपत्रांच्या आधारे तुम्ही भाषण करीत आहात, ती कागदपत्रे आधी प्रमाणित करण्याचा निर्देश सभापतींनी आपल्याला सोमवारी दिला होता, त्यांच्या निर्देशांचे पालन करीत आपण आपल्या भाषणाशी संबंधित कागदपत्रे प्रमाणित करीत असल्याचे राहुल गांधी म्हणाले. त्यावर तुम्ही संबधित कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवा. तपासून त्याबाबतचा निर्णय नंतर दिला जाईल, असे तेन्नटी यांनी म्हटले. नंतर राहुल गांधी यांनी संबंधित कागदपत्रे पटलावर ठेवली.

कागदपत्रे पटलावर ठेवल्यानंतर राहुल गांधी यांनी भाषणाला सुरुवात करताच पुन्हा चीन आणि डोकलाम संघर्षाचा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी यावर आक्षेप घेतला. राहुल गांधींचे भाषण आम्हालाही ऐकायचे आहे, पण त्यांनी विषयाला धरून बोलावे, असे ते म्हणाले.

ज्या पुस्तकाच्या आधारे मी बोलत आहे, त्याच्याशी संबंधित कागदपत्रे मी प्रमाणित करण्यासाठी पटलावर ठेवली आहेत. त्यामुळे त्या मुद्यावर बोलण्याची मला परवानगी दिली पाहिजे, असे राहुल गांधी म्हणाले. यावर सभापतींनी जो निर्णय दिला, त्या आधारे राहुल गांधी यांनी बोलले पाहिजे. नियमांचे उल्लंघन करून त्यांना बोलता येणार नाही, असे पीठासीन अधिकारी तेन्नटी म्हणाले. मी विरोधी पक्षनेता असल्याने मला बोलण्याचा अधिकार आहे. त्यासाठी मला कोणाची परवानगी घेण्याची गरज नाही, असे राहुल गांधी म्हणाले.

कामकाज सुरू होताच राहुल गांधी यांनी पुन्हा चीनचा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. पूर्व लडाखमध्ये आपला चीनसोबत संघर्ष झाला, त्यात काही भारतीय जवान हुतात्मा झाले, असे राहुल गांधी यांनी म्हणताच भाजपा सदस्य खवळले. सभागृहात गदारोळ झाला. मी तुम्हाला बोलण्याची वारंवार संधी देत आहे, पण तुम्हाला बोलायचे नाही, असे वाटते, असे सांगत तेन्नटी यांनी तेलगू देसमचे हरीश जी.एम. बालयोगी यांचे नाव पुकारले. बालयोगी बोलण्यासाठी उभे होताच काँग्रेसच्या सदस्यांनी सभापतींच्या आसनाच्या दिशेने धाव घेत घोषणाबाजी सुरू केली. त्यामुळे बालयोगी काय बोलत आहे, ते ऐकू येत नव्हते. सभागृहातील गोंधळ वाढल्यामुळे तेन्नटी यांनी कामकाज दुपारी ३ वाजेपर्यंत स्थगित केले. (तभा वृत्तसेवा)

### काँग्रेसचे आठ सदस्य निलंबित

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे भाषण सुरू असताना लोकसभेत मंगळवारी प्रचंड गदारोळ झाला. कागद फाडून सभापतीच्या आसनाच्या दिशेने त्यांचे तुकडे भिरकावणाऱ्या काँग्रेसच्या आठ सदस्यांना अधिवेशनाच्या उर्वरित कालावधीसाठी निलंबित करण्यात आले. दुपारी सभागृहाचे कामकाज सुरू होताच पिठासीन अध्यक्ष दिलीप सैकिया यांनी गोंधळ घालणाऱ्या काँग्रेसच्या आठ सदस्यांचे नाव पुकारले. त्यानंतर सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी या आठ सदस्यांच्या निलंबनाचा प्रस्ताव मांडला. तो सभागृहाने आवाजी मतदानाने पारित केला.

### भंडारा-गोंदियाचे खा. प्रशांत पडोळेंचा समावेश

निलंबित सदस्यांमध्ये मणिक्कम टैगोर, किरणकुमार रेड्डी, प्रशांत पडोळे, हिबी इडन, डीन कुरियाकोस, एस. वेंकटेशन, गुरुजीतसिंह ओजला आणि अमरेंद्रसिंह राजा वडिंग या आठ सदस्यांचा समावेश आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या उर्वरित कालावधीपर्यंत त्यांना निलंबित करण्यात आले.

### काँग्रेस सदस्यांच्या 'यार' शब्दावरून पीठासीन अधिकारी भडकले

लोकसभेत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या भाषणावरून गादरोळ होत असताना काँग्रेसच्या एका खासदाराने पीठासीन अध्यक्ष कृष्णप्रसाद तेन्नटी यांना 'यार' म्हटल्यामुळे तेन्नटी भडकले. 'यार' म्हणणाऱ्या सदस्याकडे पाहात तेन्नटी म्हणाले की, आता तुम्ही काय म्हटले, हे यार काय असते, आपण या पद्धतीने पीठासीन अधिकाऱ्याशी बोलू शकत नाही, असे त्यांनी सुनावले.

# शासकीय दुखवट्यात तहसील आवारात वाढदिवसाचा जल्लोष

- बार्शी तहसीदारांकडून प्रकाराची गंभीर दखल
- संबंधितांना नोटीस बजावणार

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ३ फेब्रुवारी**

राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या निधनामुळे संपूर्ण महाराष्ट्र शोकमग्न असताना शासनाने तीन दिवसांचा शासकीय दुखवटा जाहीर केला होता. मात्र या आदेशांनाच पायदळी तुडवत बार्शी तहसील कार्यालयाच्या आवारात वाढदिवस साजरा झाल्याचा प्रकार समोर आला आहे.

या घटनेमुळे प्रशासनाची संवेदनशून्यता, शिस्तहीनता आणि नियमांबाबतची बेफिकिरी उघड झाली आहे. यावर कारवाई काय होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान या प्रकाराची दखल घेत बार्शी तहसीलदार एफ. आर. शेख यांनी संबंधितांना नोटीस देवून खुलासा मागविणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

दि. २९ जानेवारी २०२६ रोजी बार्शी तहसील कार्यालयातील सब-जेल विभागात महसूल सहाय्यक तथा जेलर संदीप नालपे यांनी शासकीय दुखवटा लागू असतानाही आपला वाढदिवस साजरा केला. कार्यालयात केक कटिंग, सत्कार, फोटोसेशन व आनंदोत्सवाचे प्रकार उघडपणे घडले. विशेष म्हणजे, या कार्यक्रमाचे फोटो सोशल मीडियावरही व्हायरल झाले. शासनाने दुखवट्याच्या काळात कोणतेही समारंभ, कार्यक्रम किंवा आनंदोत्सव साजरे करु नयेत, असे स्पष्ट आदेश दिलेले असतानाही तहसील कार्यालयासारख्या शासकीय ठिकाणी हा प्रकार घडणे म्हणजे थेट शासकीय आदेशांचे उल्लंघन असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. या प्रकरणाबाबत विचारणा केली असता संबंधित अधिकाऱ्याने उद्धटपणे उत्तर देत आपल्या कृतीचे समर्थन केल्याचे सांगितले जाते. त्यामुळे 'नियम सर्वसामान्यांसाठीच आहेत का? की सत्ताधाऱ्यांच्या हाताखालच्या अधिकाऱ्यांसाठी वेगळे?' असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. शोककाळात शासकीय कार्यालयात केक कापले जात असतील, तर प्रशासनाची शिस्त नेमकी कुठे आहे? असा प्रश्न उपस्थित होत असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करुन शिस्तभंगाची व निलंबनाची कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

**तथ्य आढळल्यास कारवाई : तहसीलदार शेख**

दरम्यान, तहसीलदार एफ. आर. शेख यांनी या प्रकरणाचे फोटो प्राप्त झाल्याचे मान्य करत संबंधित अधिकाऱ्यास नोटीस बजावून खुलासा मागविण्यात येणार असून, तथ्य आढळल्यास शासकीय नियमांच्या उल्लंघना प्रकरणी कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले आहे.

# कृषी, दुग्ध क्षेत्राबाबत तडजोड नाही

## अमेरिकेसोबतच्या व्यापार करारावर गोयल यांची माहिती | विकासातील सहकार्याचा नवा अध्याय



**◆ नवी दिल्ली, ३ फेब्रुवारी**

अमेरिकेसोबतच्या व्यापार करारात कृषी आणि दुग्ध क्षेत्राला पूर्ण संरक्षण देण्यात आले, या दोन क्षेत्राशी कोणतीही तडजोड केलेली नाही. हा करार भारताच्या अर्थव्यवस्थेला मजबूत आणि नागरिकांसाठी नव्या संधी निर्माण करेल. दोन सर्वांत मोठ्या लोकशाही देशांमधील करार व्यापार आणि विकासातील सहकार्याचा नवा अध्याय आहे. उत्पादननिर्मिती, रोजगारांच्या संधी आणि विकसित राष्ट्रासाठी करार ऐतिहासिक असल्याचे केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल म्हणाले.

अमेरिकेसोबतच्या व्यापार कराराची घोषणा झाल्यानंतर मंगळवारी संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विरोधकांनी सरकारला लक्ष्य करीत टीका केली. यानंतर मुंबईच्या दौऱ्यावर असलेले पीयूष गोयल तातडीने राजधानी दिल्लीत पोहोचले आणि त्यांनी या मुद्यावर पत्रपरिषद घेत सरकारची भूमिका स्पष्ट केली. पंतप्रधान मोदींनी नेहमीच शेतकऱ्यांचे हित जपले असून, या करारामुळे शेतकऱ्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही, असे त्यांनी सांगितले.

कृषी, दुग्ध व्यवसायाला संरक्षण देण्यात आले. लघु उद्योग, अभियांत्रिकी, कापड, रत्न-दागिने, चामडे आणि सागरी क्षेत्राला या करारामुळे फायदा होणार आहे. करारासाठी दहा महिन्यांपासून वाटाघाटी सुरू होत्या आणि पंतप्रधान मोदी यांनी अनेकदा राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्याशी संवाद साधला त्याची फलश्रुती म्हणून हा करार झाला. अनेक गुंतागुंतीचे विषय आणि अडचणी होत्या. भारतावर ५० टक्के शुल्क लावण्यात आले होते, ज्याचा सर्वांनाच फटका बसत होता.

### राहुल गांधींना देशाचे उज्ज्वल भविष्य नको

**अमेरिकेसोबतच्या करारामुळे देशात अपरिमित संधी निर्माण होणार आहे, त्यामुळेच काँग्रेस नेते राहुल गांधींचा थयथयाट सुरू आहे. त्यांना भारताचे उज्ज्वल भविष्य नको आहे, देशात अराजकता पसरावी हाच त्यांचा हेतू आहे. नकारात्मक राजकारण करून भारताच्या प्रगतीला रोखण्याचा त्यांचा प्रयत्न यशस्वी होणार नाही, असे गोयल म्हणाले.**

**दोन्ही देश संयुक्त निवेदन जारी करणार**


अमेरिकेने शुल्क लादले असल्याने, ते कमी करण्याची माहिती देखील त्यांनी सर्वप्रथम दिली. तांत्रिक प्रक्रिया पूर्ण होताच दोन्ही देश कराराच्या तपशीलासंदर्भात संयुक्त निवेदन जारी करणार आहे. मी १.४ अब्ज लोकांना खात्री देऊ इच्छितो की हा करार सर्व भारतीयांना अभिमान वाटेल असाच आहे.

**२५ टक्के दंडात्मक शुल्क हटविले**

रशियाकडून तेल खरेदी करण्यावरून लावण्यात आलेले २५ टक्के दंडात्मक शुल्क हटवण्यात आले आहे. भारत अमेरिका व व्हेनेझुएलाकडून तेल खरेदी वाढवेल, तसेच रशियाकडून आयात कमी करेल, असेही गोयल यांनी स्पष्ट केले. (वृत्तसंस्था)

# कराराने बाजारात आली बहार

### अंबानी, अदानी, मित्तल मालामाल




**◆ मुंबई, ३ फेब्रुवारी**

भारत-अमेरिका कराराने देशांतर्गत बाजारातील वातावरण असे काही बदलले की, गुंतवणूकदारांवर जणू जादूची कांडीच फिरली. टॅरिफ धोरणावर डोनाल्ड ट्रम्प यांनी नरमाईची भूमिका घेतल्यानंतर भारतीय शेअर बाजारात जबरदस्त तेजी पाहायला मिळाली. मंगळवारच्या व्यवहारात निर्देशांकात एका क्षणी ४२०० पेक्षा जास्त अंकांची वाढ नोंदवली गेली. याचा थेट फायदा देशातील आघाडीच्या कंपन्यांना झाला असून, पहिल्या दहा कंपन्यांचे एकत्रित बाजार भांडवल ५.४० लाख कोटींनी वाढले.

३० शेअर्सवर आधारित मुंबई बाजाराचा निर्देशांक दिवसअखेर २०७३ अंकांनी वाढून ८३,७३९ या पातळीवर बंद झाला. राष्ट्रीय बाजारातील निफ्टीत एका क्षणी १२५२ अंकांची वाढ झाली होती. दिवसअखेरीस तो ६३९ अंकांनी वाढून २५,७२७ वर स्थिरावला. सर्वाधिक वाढ झालेल्या शेअरमध्ये अदानी पोर्टस्‌चा समावेश होता. त्यात ९.१२ टक्क्यांची घसघशीत वाढ झाली. त्यापाठोपाठ बजाज फायनान्स, इंटरग्लोब एव्हिएशन, पॉवर ग्रीड, सन फार्मा, बजाज फिनसर्व्ह आणि रिलायन्स इंडस्ट्रीजचे शेअर्सही चमकले.

बाजारातील या अभूतपूर्व तेजीतही टेक महिंद्रा आणि भारत इलेक्ट्रॉनिक्स हे दोनच शेअर्स विक्रीच्या दबावाखाली राहिले. (वृत्तसंस्था)



# ...अन्यथा भारत सोडा

## सर्वोच्च न्यायालयाचा व्हॉट्सॲप, मेटाला इशारा

**◆ नवी दिल्ली, ३ फेब्रुवारी**

भारतातील नागरिकांच्या डेटा गोपनीयतेबाबत सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत कडक भूमिका घेत व्हॉट्सॲप आणि त्याची मूळ कंपनी मेटाला इशारा दिला आहे. नियमांचे पालन करणार नसाल, तर भारतात व्यवसाय करता येणार नाही, अशा शब्दांत न्यायालयाने कंपन्यांना फटकारले आहे. वापरकर्त्यांचा डेटा कोणत्याही परिस्थितीत शेअर केला जाणार नाही, याबाबत लेखी हमी देणारे प्रतिज्ञापत्र सादर करण्याचा आदेश न्यायालयाने दिला आहे.

सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी सुनावणीदरम्यान सांगितले की, गोपनीयता हा वापरकर्त्याचा मूलभूत अधिकार आहे आणि त्यावर कोणतीही तडजोड केली जाणार नाही. व्हॉट्सॲप आणि मेटाने लेखी हमी दिली नाही, तर त्यांची याचिका फेटाळली जाऊ शकते, असा इशाराही न्यायालयाने दिला. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात मेटा आणि व्हॉट्सॲपने दाखल केलेल्या याचिकेशी संबंधित आहे.

या याचिकेत त्यांनी 'एनसीएलएटी'च्या आदेशाला आव्हान दिले आहे, ज्यामध्ये स्पर्धा आयोगाने ओटीटी मेसेजिंगमध्ये गैरवापर केल्याबद्दल मेटाला २१३ कोटी रुपयांचा दंड ठोठावला होता. सुनावणीदरम्यान न्यायालयाने डेटा प्रायव्हसी, डेटा वापर आणि त्याच्या आर्थिक मूल्यांवर गंभीर प्रश्न उपस्थित केले.

कोणत्याही कंपनीला देशातील नागरिकांच्या अधिकारांवर गदा आणण्याची परवानगी दिली जाऊ शकत नाही. भारतात काम करायचे असेल, तर देशाच्या डेटा संरक्षण नियमांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक आहे, असेही न्यायालयाने व्हॉटस्‌ॲप आणि मेटाला ठणकावून सांगितले. (वृत्तसंस्था)

## 'व्हीएसआर व्हेंचर्स' चौकशीच्या फेऱ्यात

**◆ नवी दिल्ली, ३ फेब्रुवारी**

'व्हीएसआर व्हेंचर्स' या कंपनीच्या मालकीच्या लिअरजेट-४५ एक्सआर या विमानाचा बारामती येथे अपघात झाला होता. यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह पाच जणांचे निधन झाले. विमान अपघाताची चौकशी अधिक तीव्र करताना नागरी विमान वाहतूक महासंचालनालय अर्थात् डीजीसीएने आता व्हीएसआर व्हेंचर्स कंपनीचे विशेष अंकेक्षण करण्याचा आदेश मंगळवारी दिला.

कंपनीचे कामकाज, विमानांची देखभाल आणि नियमांचे पालन याची चौकशी करण्यात येणार आहे आणि अहवाल १५ फेब्रुवारीपर्यंत सादर करावा, असा निर्देश दिल्याचे डीजीसीएने निवेदनात म्हटले आहे.

# राकाँच्या अध्यक्षपदाच्या शर्यतीत नाही : पटेल

**◆ मुंबई, ३ फेब्रुवारी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या शर्यतीत नसल्याचे मंगळावारी स्पष्ट करीत, माझ्याशिवायच पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्ष निवडला जाईल, असे ठामपणे सांगितले. अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर प्रथमच माध्यमांसमोर येत त्यांनी पक्षाची आणि आपली अधिकृत भूमिका मांडली.



प्रफुल्ल पटेल म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्ष कोण होणार, हे ठरवण्याचा अधिकार पक्षातील नेत्यांचा आहे. अजित दादांनंतर कार्याध्यक्ष म्हणून मी आणि प्रदेशाध्यक्ष म्हणून सुनील तटकरे सध्या जबाबदारी सांभाळत आहोत. जनभावनेचा आदर राखून लवकरच पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षाची निवड केली जाईल. मात्र, त्या शर्यतीत मी नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

अजित पवार यांच्या निधनानंतर पक्षातील निर्णयप्रक्रियेवर होत असलेल्या टीकेला उत्तर देताना पटेल म्हणाले की, या घटनेने पवार कुटुंबीयांसह संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. (तभा वृत्तसेवा)

# ४०० वर्षे जुने वाल्मीकि रामायण राममंदिरात स्थापित

## गुढीपाडव्याला राष्ट्रपती रामचरणी




**◆ अयोध्या, ३ फेब्रुवारी**

अयोध्येतील राममंदिराला आता दोन वर्षे पूर्ण झाली आहेत. भारतासह जगभरातून कोट्यवधी भाविक रामचरणी नतमस्तक झाले. अयोध्येत येणाऱ्या भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. रामललाचे दर्शन घेण्याची आस आजही भाविकांमध्ये असल्याचे पाहायला मिळत आहे. यातच ४०० वर्षे जुने वाल्मीकि रामायण अयोध्येतील राममंदिरातील रामलला चरणी स्थापित केल्याचे सांगितले जात आहे.

देशातील विविध प्रांतांमधून वाल्मीकि रामायणातील प्राचीन हस्तलिखिते आणि प्रादेशिक भाषांमधील दुर्मिळ ग्रंथ मंदिर ट्रस्टला दान केले जात आहेत. केंद्रीय संस्कृत विद्यापीठातील वाल्मीकि रामायणाचा ४०० वर्षे जुना संस्कृत ग्रंथ ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय यांनी दिल्लीहून आणला होता, जो राष्ट्रपती संग्रहालयातून ट्रस्टला सादर करण्यात आला. हा ग्रंथ राममंदिराच्या दुसऱ्या मजल्यावरील गर्भगृहात ठेवण्यात येईल. लवकरच रामायण तज्ज्ञांची एक समिती स्थापन केली जाईल. या ग्रंथांची सत्यता तपासली जाणार आहे.

दरम्यान, राम मंदिराशी संबंधित उर्वरित सर्व बांधकाम ३० एप्रिलपर्यंत पूर्ण केले जाईल. त्यानंतर, मुख्य बांधकाम संस्था, एल ॲण्ड टी आणि टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) ही जागा मंदिर ट्रस्टला सोपवतील. मंदिराच्या बांधकामावर आतापर्यंत एकूण अंदाजे १,९०० कोटी खर्च झाले आहेत, त्यापैकी १,६०० कोटी (जीएसटीसह) भरण्यात आले आहेत. मुख्य मंदिराचे बांधकाम खूप पूर्वी पूर्ण झाले आहे. आता राममंदिर परिसर आणि इतर सुविधा अंतिम टप्प्यात आहेत. (वृत्तसंस्था)

### ४०० कामगारांचा द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते सन्मान



नृपेंद्र मिश्रा म्हणाले की, सर्व कामे अंतिम टप्प्यात आहेत आणि निर्धारित वेळेत पूर्ण केले जातील. रामललाचे तात्पुरते मंदिर फेब्रुवारीपर्यंत तयार होईल. हिंदू नववर्ष चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजेच गुढीपाडवा १९ मार्च रोजी आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना औपचारिक निमंत्रण देण्यात आले आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यास त्यांनी सहमती दर्शविली आहे. त्या दिवशी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू राममंदिरात पूजा करणार आहेत तसेच राममंदिराच्या बांधकामात योगदान देणाऱ्या ४०० कामगारांचा सन्मान करतील.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### भरतनाट्यम् नृत्य परीक्षेत संस्कृती गवंडी प्रथम

**सोलापूर, दि.३ फेब्रुवारी-**



श्रीनिअंबा नृत्यालय सोलापूरची विद्यार्थीनी संस्कृती गवंडी हिने भरतनाट्यम् नृत्यच्या ४ थ्या परीक्षेत शहरात प्रथम येण्याचा बहुमान मिळविला. अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई या संस्थेच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या भरतनाट्यम मध्यमा प्रथम (४ थी) परीक्षेत संस्कृतीने प्रथम श्रेणी मिळवित शहरात प्रथम येण्याचा बहुमान मिळविला. संस्कृतीस श्रीनिअंबा नृत्यालयाचे प्रमुख श्रीनिवास काटवे आणि अंबीका काटवे यांचे मार्गदर्शन लाभले. सिद्धेश्वर देवस्थानचे प्रमुख धर्मराज काडादी, मुख्याध्यापक योगेश राऊत, नीता तमशेट्टी, रेणुका अरोरा, सुधा ऊमदी आदी मान्यवरांनी तिचे अभिनंदन केले.

### विहिंपतर्फे अक्कलकोट येथे प्रांत अभ्यास वर्ग

**अक्कलकोट, दि.३ फेब्रुवारी-**

विश्व हिंदू परिषदेतर्फे अक्कलकोट येथे विशेष संपर्क विभागाचा प्रांत अभ्यास वर्ग संपन्न झाला. पश्चिम महाराष्ट्र प्रांतामधील २५ जिल्ह्यांमधून विहिंप कार्यकर्ते व पदाधिकारी सहभागी होते. विहिंपचे केंद्रीय मंत्री तथा राष्ट्रीय प्रवक्ते अंबरिश, विशेष संपर्क विभागाचे दक्षिण भारत झोन प्रमुख संजय ढवळीकर, प्रांत मंत्री किशोर चव्हाण, सहमंत्री अ‍ॅड. सतीश गोरडे आणि श्रीकांत पोतनीस आणि तालुका संघचालक रवी जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. अक्कलकोट वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरच्या कै.कल्याणराव इंगळे पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये अभ्यास वर्गाचे उद्घाटन श्रीराम आणि भारतमाता प्रतिमचे पूजन अंबरिशजी(नवी दिल्ली), संजय ढवळीकर (ठाणे), विशेष संपर्क विभागाचे प्रांत प्रमुख तथा उद्योगपती श्रीकांत पोतनीस (कोल्हापूर), प्रांत: धर्माचार्य संपर्क प्रमुख नागनाथ बोंगरगे, विभाग सहमंत्री विजयकुमार पिसे यांच्या हस्ते करून झाले. संजय ढवळीकर यांनी अभ्यास वर्गाची प्रस्तावना सांगितली तसेच अभ्यास वर्गाचे महत्व अधोरेखित केले. याप्रसंगी प्रमुख मान्यवर उद्योजक तथा कोषाध्यक्ष हितेष माधू, जनता बँकेचे संचालक पुरुषोत्तम उडता, सहमंत्री बापू कदम, विष्णू जगताप, बजरंग दल सहसंयोजक अभय कुलथे, समरसता आयाम प्रमुख चंद्रकांत कुलकर्णी, विशेष संपर्क विभाग प्रमुख प्रवीण जिल्हा, तालुका सहकार्यवाह संतोष वगाले, सायबण्णा सोनकांबळे, अनिल कोळी, प्रखंड मंत्री बालाजी राजपूत, कृष्णा देशपांडे, प्रखंड बजरंग दल संयोजक मदन राठोड, गोविंद शिंदे, स्वामी यांनी अभ्यास वर्ग यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

### जनमत, पत्र प्रबोधन पुस्तकांचे शनिवारी प्रकाशन

**अक्कलकोट, दि.३ फेब्रुवारी-**

शहरातील नागरी प्रश्न आणि लोकभावनांना वाचकांच्या पत्रांद्वारे वाचा फोडणाऱ्या दोन महत्त्वपूर्ण पुस्तकांचा प्रकाशन सोहळा सोलापूर जिल्हा वृत्तपत्र लेखक मंचाच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. फैय्याज शेख लिखित 'जनमत' आणि अरुण धुमाळ लिखित 'पत्र प्रबोधन' या पुस्तकांचे प्रकाशन शनिवार, ७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५-३० वाजता श्री. हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात होणार असल्याची माहिती मंचाचे कार्यवाह सुनील पुजारी यांनी दिली. श्री हिराचंद नेमचंद वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांच्या हस्ते संपन्न होणार असून, कार्यक्रमाचे अध्यक्षपद ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी भूषवणार आहेत. याप्रसंगी गॅस्ट्रोइंट्रोलॉजि आणि हेपॅटोलॉजिचे डॉ. सूर्यप्रकाश कोठे, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे सोलापूर जिल्हा प्रमुख पद्माकर कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सोलापूरकर नागरिक, वाचक आणि साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सुनील पुजारी यांनी केले आहे.

### उदय विकास विद्यालयात स्नेहसंमेलन उत्साहात

**सोलापूर, दि.३ फेब्रुवारी-**

उदय विकास विद्यालय व दलितमित्र भीमराव जाधव प्रशाला यांच्या संयुक्त विद्यमाने वार्षिक स्नेहसंमेलन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. अमोल गायकवाड होते. त्यांच्या हस्ते सरस्वतीच्या व कै. हिरालाल गायकवाड यांच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमाची सुरवात केली. प्रमुख पाहुणे म्हणून शिवराज गायकवाड, नूतन नगरसेविका चैताली गायकवाड, आसीम बांगी, शिवानंद गंजी, अश्विनी तडवळकर, संतोष होसमनी, संस्थेचे संचालिका कीर्ती गायकवाड उपस्थित होत्या. कार्यक्रमास संस्था उपाध्यक्षा शारदाबाई गायकवाड, माध्यमिकचे मुख्याध्यापक मंगेश पाटील, प्राथमिकचे मुख्याध्यापक प्रकाश कोळी उपस्थित होते. सूत्रसंचालन अमोल कुलकर्णी यांनी केले.

# उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या अस्थिंचे चंद्रभागेत विसर्जन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३ फेब्रुवारी-**



राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस चे राष्ट्रीय अध्यक्ष दिवंगत अजित पवार यांच्या अस्थीकलशाचे पूजन करुन येथील चंद्रभागेच्या पात्रात अस्ती विसर्जन करण्यात आले. यावेळी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख, पदाधिकारी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नुकतेच बारामती येथे विमान दुर्घटने मध्ये निधन झाले. त्यामुळे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकस्मिक निधनाने संपुर्ण राज्य शोकसागरात बुडालेला होता. राज्य शासनाने देखील राज्यात तिन दिवसांचा दुखवटा पाळला. दरम्यान दिवंगत अजित पवार यांच्या अस्थि तसेच रक्षा खास बारामतीहून पवित्र चंद्रभागेच्या पात्रात विसर्जित करण्यासाठी मंगळवारी (ता.३) येथे आणण्यात आल्या.

येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मांडव उभा करुन दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मोठे छायाचित्र देखील त्या मध्ये ठेवण्यात आलेले होते. बारामतीहून अस्थि येणार असल्यामुळे सकाळ पासूनच कार्यकर्ते छत्रपती शिवाजी महाराज चौकात जमण्यास सुरुवात झालेली होती. चौका मध्ये अजित दादांच्या स्मृतिप्रित्यर्थ दादांची वेगवेगळी भाषणे स्पीकर वरुन लावण्यात आलेली होती. बारामतीहून अस्थिकलश येथे दाखल झाल्या नंतर तो चौफाळ्या मध्ये ठेवण्यात आला. त्याठिकाणी नागरिकांनी अस्थिकलशाच्या दर्शनासाठी गर्दी केलेली होती. त्या नंतर हा अस्थिकलश चंद्रभागेच्या वाळवंटात आणण्यात आला. त्या ठिकाणी अस्थिकलशाचे पूजन करुन तो अस्थिकलश सजविलेल्या होडीम धून चंद्रभागेच्या पात्रात मध्यभागी नेऊन त्या ठिकाणी दादांच्या अस्थिंचे विसर्जन करण्यात आले. यावेळी अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते भावुक झालेले दिसत होते. अस्थिकलशाचे विसर्जन करताना अजित दादा अमर रहेच्या घोषणांनी वातावरण स्तब्ध झालेले होते. यावेळी अनेक पदाधिकाऱ्यांना अश्रु अनावर झाल्याचे दिसत होते. यावेळी आमदार अभिजीत पाटील, शिवसेनेचे संजय बाबा कोकाटे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख, श्रीकांत शिंदे, संदीप मांडवे, सुरज पेंडल, संदीप पाटील, तालुकाध्यक्ष अतुल चव्हाण, सुमित शिंदे, प्रशांत शिंदे, वर्षा शिंदे, चारूशिला कुलकर्णी उपस्थित होते.

## हीट अ‍ॅन्ड रन प्रकरण
# फरार आरोपीस चौदा महिन्यानंतर अटक

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ३ फेब्रुवारी-**

गाडेगाव रोड बार्शी येथे दि. ५ डिसेंबर २०२४ रोजी भरधाव ट्रॅव्हल्सने मॉर्निंग वॉक करणाऱ्या शांतीलाल उत्तरेश्वर बोराडे (रा. बार्शी) यांना जोराची धडक देऊन ट्रॅव्हल्स चालक कोणाला काही माहिती न देता निघून गेला होता. या अपघाताबाबत बार्शी शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदरच्या गुन्ह्यात ट्रॅव्हल्सचे मालक यांना यापूर्वीच अटक करण्यात आली.

सदर ट्रॅव्हल्स चालक रफिक अफजल शेख (रा.रहीमनगर, परभणी) हा गुन्हा घडल्यापासून गेल्या १४ महिन्यांपासून फरार होता. त्याचा यापूर्वी मुंबई, परभणी तसेच इतर ठिकाणी शोध घेतला परंतु तो मिळून आला नव्हता तो कायम फरार असायचा. पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी सदर आरोपीचा शोध घेण्यासाठी पोसई महेश गळगटे यांच्यासोबत पोना संगप्पा मुळे व पोकॉ लखन घाडगे यांचे पोलीस पथक नेमले होते. त्यामधील मुळे यांनी परभणी येथे गोपनीय बातमीदार आरोपीचा शोध घेण्यासाठी नेमले होते. आरोपी हा परभणी येथे असल्याची माहिती मिळाली. त्यांनी लगेच माहिती पोलीस निरीक्षक यांना दिली. पोनि यांनी तात्काळ आरोपी अटकेसाठी पोलीस पथक परभणी येथे रवाना केले. परभणी येथे आरोपीस ताब्यात घेऊन सदर गुन्ह्यात अटक केली असून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केले आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक सायकल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, पोसई महेश गुळगटे, पोलीस अंमलदार संघप्पा मुळे, लखन घाडगे यांनी केली आहे.

## भारत मुक्ती मोर्चातर्फे उद्या जिल्हाधिकारी कार्यालयावर रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

भारत मुक्ती मोर्चा, बहुजन क्रांती मोर्चा व राष्ट्रीय परिवर्तन मोर्चाचे वतीने गुरुवार ५ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर भारताचे संविधान आणि लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी बामसेफ आणि भारत मुक्ती मोर्चाच्या राष्ट्रीय अधिवेशनाची परवानगी रद्द केल्याच्या निषेधार्थ रॅली काढण्यात येणार आहे, अशी माहिती अ‍ॅड. योगेश सिद्धगणेश यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ओबीसींच्या जातीने जनगणनेचा मुद्दा दडपणाच्या षड्यंत्राची न्यायाधीश नियुक्त करून स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करावी आणि दोषींवर कार्यवाही करावी. ओरिसाचे राज्य सरकार संविधानानुसार काम करण्यात अपयशी ठरले आहे. म्हणून ओरिसा राज्य सरकार ताबडतोब बरखास्त करावे, या मागण्यांसाठी हा रॅली काढण्यात येणार आहे.

सोलापुरातील महात्मा बसवेश्वर महाराज पुतळ्यापासून या रॅलीस सुरुवात होणार. त्यानंतर पुढे माणिक चौक विजापूर वेस मार्गे जिल्हाधिकारी कार्यालय पुनम गेट येथे या आंदोलनाचा समारोप होणार आहे. या पत्रकार परिषदेत रवी जंगम, बापू मस्के, फारुख शेख, दिनेश जाधव, भीमराज गोन्याल, महंमद साब हिरापुरे आदी उपस्थित होते.

# सोलापूर भाजपाकडून स्व.अजितदादांना श्रध्दांजली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**



बारामतीजवळ विमानाच्या झालेल्या दुर्दैवी अपघातात महायुतीतील सहकारी, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार, स्व. विदिप जाधव (वैयक्तिक सुरक्षा अधिकारी) स्व.पिंकी माळी-फ्लाइट अटेंडंट/केबिन क्रू सदस्य, स्व.सुमीत कपूर-पायलट इनकमांड (मुख्य पायलट), स्व.शंभवी पाठक सहपायलट यांचे निधन झाल्याने त्यांना सोलापूर शहरातील भारतीय जनता पार्टी कार्यालयात अध्यक्षा रोहिणीताई तडवळकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

यावेळी दिवंगत अजितदादा पवार यांच्या कार्यकर्तृत्व, नेतृत्व आणि जनसेवेच्या स्मृतींना उजाळा देत, त्यांच्या सामाजिक व राजकीय योगदानाबद्दल अध्यक्षा तडवळकर यांच्यासह उपस्थितांनी आदरांजली अर्पण केली. स्व. अजितदादा पवार यांच्या दुःखद जाण्याने महाराष्ट्राच्या राजकारणात आणि सार्वजनिक जीवनात पोकळी निर्माण झाली आहे. हे नुकसान इतके मोठे आहे की ते कधीही पूर्णपणे भरून निघणे अशक्य आहे. अजितदादा हे केवळ राजकीय नेते नव्हते, तर जनतेच्या हृदयात स्थान निर्माण करणारे खंबीर, स्पष्टवक्ते आणि लोकाभिमुख नेतृत्व होते. ते जात-पात, भेदभाव किंवा पक्षीय दुहीपलीकडे जाऊन सर्वसामान्य जनतेसाठी काम करणारे खरे लोकनेते होते.

विकास, प्रशासन, शेतकरी, युवक तसेच समाजातील सर्व घटकांसाठी त्यांनी नेहमीच ठाम व प्रभावी भूमिका बजावली. संकटाच्या काळात धैर्याने उभे राहणारे, निर्णयक्षम आणि परिणामकारक नेतृत्व हीच त्यांची खरी ओळख होती. त्यांचे राजकीय व सामाजिक कार्य महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदवले जाईल.

त्यांचे विचार, कार्य आणि जनतेप्रती असलेली निष्ठा पुढील पिढ्यांसाठी सदैव प्रेरणादायी राहील. स्व. अजितदादा पवार तसेच विमानातील इतर सर्वांच्या आत्म्यास सद्गती लाभो, तसेच त्यांच्या कुटुंबियांना व समर्थकांना या दुःखातून सावरण्याची शक्ती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

# आपली तक्रार पोर्टल, माय सोलापूर अ‍ॅपवरील निष्काळजीपणा भोवला; १५ कर्मचाऱ्यांना दंड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ फेब्रुवारी-**

नागरिकांच्या तक्रारी वेळेत मार्गी लागाव्यात, यासाठी सोलापूर महानगरपालिकेने कठोर भूमिका घेतली आहे. आपली तक्रार पोर्टल व माय सोलापूर अ‍ॅपवर नोंदविण्यात आलेल्या तक्रारींचा मुदतीत निपटारा न करणाऱ्या १५ अधिकारी व कर्मचाऱ्यांविरोधात थेट दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी ही कारवाई केली आहे.

सोलापूर महापालिकेने नागरिकांसाठी सुरू केलेल्या ऑनलाईन तक्रार निवारण प्रणालीद्वारे आलेल्या तक्रारी विहित कालमर्यादेत सोडवून, केलेल्या कार्यवाहीची माहिती पोर्टलवर अद्ययावत करणे संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना बंधनकारक आहे. याबाबत महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी यापूर्वीच स्पष्ट आदेश दिले होते. मात्र अलीकडील आढाव्यात काही विभागांतील तक्रारी दीर्घकाळ प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले.

ही बाब गंभीर असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५६ (२) (ड) अन्वये कारवाई करत विभागीय कार्यालय क्र. १ ते ८, घनकचरा व्यवस्थापन विभाग व नगररचना कार्यालयातील १५ अधिकारी व कर्मचाऱ्यांना दंड ठोठावण्यात आला आहे. या १५ कर्मचाऱ्यांकडे प्रलंबित असलेल्या ८४ तक्रारींसाठी एकूण ८ हजार ४०० रुपये इतका आर्थिक दंड आकारण्यात आला आहे.फेब्रुवारी २०२६ (पे इन मार्च २०२६) वेतनातून एकरकमी वसुली करण्यात येणार आहे. भविष्यात दिरंगाई झाल्यास अधिक कठोर कारवाईचा इशारा महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिला आहे.

आपले सरकार

**या कर्मचाऱ्यांवर झाली कारवाई**

विभागीय कार्यालय क्र. १ मधील अजिंक्य साळुंखे, आकाश पाटील, सुचेता आमणगी, विभागीय कार्यालय क्र. २ मधील राघवेंद्र बिराजदार, विभागीय कार्यालय क्र. ३ मधील अनिकेत कांबळे, विभागीय कार्यालय क्र. ४ मधील संजय कोळी, विभागीय कार्यालय क्र. ५ मधील परशुराम बोमकंटी, विभागीय कार्यालय क्र. ६ मधील अजिंक्य विपत, राघवेंद्र देवकर, कुलदीप जगदाळे, विभागीय कार्यालय क्र. ७ मधील अक्षय फुंदे, विभागीय कार्यालय क्र. ८ मधील श्रीरंग नादरगी, घनकचरा व्यवस्थापन विभागातील मुबारक शेख, शिवप्रसाद कुलकर्णी आणि नगर रचना विभागातील प्रमोद गोविंदवार आदी.



# बोरामणी मतदारसंघात आ. कल्याणशेट्टींच्या सभेला नागरिकांची मोठी गर्दी

## विकासाच्या मुद्यावर ही निवडणूक लढवणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ०३ जानेवारी-**

जिल्ह्यातील सर्व पाणीपुरवठा योजना प्राधान्याने पूर्ण केल्या जातील. प्रत्येक गावातील शाळा डिजिटल करून गावातच विद्यार्थ्यांना स्मार्ट शिक्षण उपलब्ध करून देण्यात येईल. यासोबतच पर्यटन व्यवसायाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मितीवर आपला भर असणार राहणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशान्वये मी व आमचे सर्व उमेदवार विकासाच्या मुद्द्यावर ही निवडणूक लढवित असल्याची स्पष्टोक्ती आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी आज (दि. ०३) व्यक्त केली. दरम्यान, बोरामणी मतदारसंघात आयोजित केलेल्या त्यांच्या जाहीर सभेस नागरिकांचा मोठा प्रतिसाद दिसून आला.

या वेळी भाजपा शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, बोरामणी जिल्हा परिषद गटाचे उमेदवार नेताजीभाऊ खंडागळे, बोरामणी पंचायत समिती उमेदवार वर्षाताई पटणे, कासेगाव पं. समितीचे विजय राठोड, मृण्मयी गवळी, उपसभापती सुनील कळके, संचालक केदार विभुते, महादेव पाटील, महेश बिराजदार यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना आ. कल्याणशेट्टी म्हणाले की, जिल्ह्याच्या प्रशासकीय कामात पारदर्शकता आणण्यासाठी आणि ग्रामीण भागातील नागरिकांचे जिल्हा परिषद कार्यालयातील हेलपाटे वाचवण्यासाठी 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (ख) आणि व्हॉट्सप तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला जाणार आहे. प्रलंबित विकासकामांच्या तक्रारी नोंदवण्यासाठी आणि त्यावर होणाऱ्या कारवाईचा मागोवा घेण्यासाठी विशेष अप विकसित केले जाईल, ज्यामुळे सर्वसामान्यांना घरबसल्या त्यांच्या मोबाईलवरच कामाची स्थिती कळू शकणार आहे. जिल्ह्यातील आरोग्य सुविधा बळकट करण्यासाठी ज्या गावांत कायमस्वरूपी दवाखाने नाहीत, तिथे दरमहा 'सर्वरोगनिदान शिबिर' आयोजित करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. शिक्षणाच्या बाबतीत, जिल्हयातील शाळा 'डिजिटल' करण्यावर भर दिला जाणार आहे. जिल्ह्यातील महिला बचतगटांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ मिळवून दिली जाणार आहे. प्रलंबित पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न केले जाणार आहेत.

**आमदार कल्याणशेट्टींच्या मार्गदर्शनाखाली विकासकामे करणार**

बोरामणी मतदारसंघाचा विकास करण्यासाठी आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या माध्यमातून मोठा विकासनिधी आणून या भागाचा कायापालट करणार असल्याची ग्वाही जिल्हा परिषदेचे उमेदवार नेताजीभाऊ खंडागळे यांनी दिली. यामुळे या मतदारसंघातील नागरिकांनी माझ्यासह बोरामणी पंचायत समिती उमेदवार वर्षाताई पटणे, कासेगाव पं. समितीचे विजय राठोड यांच्या पाठीशी उभे राहावे, असे आवाहन खंडागळे यांनी केले.

# ओल्या चाऱ्यासाठी दूध उत्पादकांची वणवण

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. ३ फेब्रुवारी-**



तालुक्यात पशुधन मोठ्या प्रमाणात असून सर्वत्रच ओल्याच्या चाऱ्याचा तुटवडा जाणवत असल्याने उसाचे वाडे घेण्यासाठी सदाशिवनगर येथे शेतकऱ्यांची झुंबड उडत असून काही ठिकाणी असणाऱ्रा ओला चारा (मकवन) घेण्यासाठी पशुधन शेतकरी गर्दी करीत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

तालुक्यात शेळी एक लाख ६७ हजार ३५५ ,मेंढ्या ३२ हजार ८०६ ,गाय १ लाख ४६ हजार ७८३,म्हैस ७६ हजार २२८ असे २ लाख २३ हजार ११ पशु धन आहे.तालुक्यात मे महिन्यात पाऊस झाला त्यानंतर शेतकऱ्यांनी जनावरांच्या चाऱ्यासाठी मका पिकास पसंती दिली .ऑगस्ट,सप्टेंबर मध्ये पेरणी केलेली मका यापूर्वीच कापणीला येऊन संपली आहे. तसेच तालुक्यात उस पिकाचे क्षेत्र मोठे आहे .परंतु सततच्या पावसामुळे ऊस पिकाची वाढ पाहिजे त्या प्रमाणात झाली नाही .मार्च ,एप्रिल पर्यंत चालणारे साखर कारखाने आत याच महिन्या बंद होतील,उस क्षेत्र संपले आहे.तसेच अनेक कारखान्यांनी ऊस कापणी साठी यंत्राचा वापर केला त्यामुळे उसाचे वाडे उपलब्ध झाले नाही.

तालुक्यात बैलगाडीने उसाचे गळीत केले जात होते परंतु आता वाहनाची संख्या मोठ्या प्रमाणात दिसून आली.त्यामुळे बैलगाडी मालक आपल्या जनावरांना पुरेल असे वाडे ठेऊन जादा वाडे विकत होता. आता ते हि बंद झाले. दुध वाढीसाठी कोरड्या चाऱ्या बरोबर ओल्या चाऱ्याची आवशकता असते. काही शेतकऱ्या कडे मका आहे त्याचा दर आता २२ शे २५ शे गुंठ्याला झाला आहे.काही वाहन चालक लासुर्णे ,पाडेगाव आदी ठिकाणी असणाऱ्या गुऱ्हाळावरून वाडे आणून विक्री करीत असून १०० रुपयास १६ पेंडी वाडे देत ते घेण्यासाठी शेतकरी वर्ग गर्दी करीत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# स्पर्धक देशांपेक्षा भारतावरील शुल्क कमी

## • पंतप्रधान मोदींच्या रणनीतीचे यश • ट्रम्प यांची माघार • पाकिस्तान, बांगलादेश, चीनच्या तुलनेत भारताला झुकते माप

**व्यापारात भारताचे स्पर्धक असलेल्या देशांवरील शुल्क**

| देश | चीन | ब्राझील | द. आफ्रिका | म्यानमार | लाओस | बांगलादेश | व्हिएतनाम | मलेशिया | कंबोडिया | थायलंड | पाकिस्तान |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शुल्क (टक्क्यांत) | ३७ | ५० | ३० | ४० | ४० | २० | २० | १९ | १९ | १९ | १९ |



◆ **वाशिंग्टन, ३ फेब्रुवारी**

भारत-अमेरिकेत झालेल्या व्यापार करारावरील सहमती हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या रणनीतीचे यश आहे. इंडोनेशिया, व्हिएतनाम, बांगलादेश, चीन आणि पाकिस्तान या स्पर्धक देशांच्या तुलनेत भारतावरील व्यापार शुल्क कमी आहे. मोदी-ट्रम्प यांच्यातील मैत्रीमुळेच शक्य झाल्याचे अमेरिकेचे वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनिक यांनी म्हटले आहे.

भारत-अमेरिका यांच्यात करारावर सहमती झाल्यामुळे भारतावरील व्यापार शुल्क २५ टक्क्यांवरून कमी होऊन १८ टक्क्यांवर आले आहे. रशियाकडून तेल खरेदी करण्यात येत असल्याने आकारण्यात येणारे २५ टक्के शुल्क लवकरच रद्द केले जाईल. याची अंमलबजावणी मंगळवारपासून सुरू झाल्याची माहिती लुटनिक यांनी प्रसार माध्यमांना दिली. भारतावरील शुल्क शेजारी देश पाकिस्तान, बांगलादेश आणि चीनपेक्षा कमी आहे.

राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या घोषणेमुळे जगातील दोन सर्वांत मोठ्या लोकशाही देशांमध्ये गेल्या काही काळापासून सुरू असलेला व्यापारी तणाव दूर होण्यास मदत होणार आहे. दुसरीकडे व्हाईट हाऊसच्या एका अधिकाऱ्याने म्हटले की, अमेरिकेने रशियन तेल आयातीवरील दंडात्मक कर मागे घेतला आहे आणि आता केवळ १८ टक्के सुधारित परस्पर कर लागू राहणार आहे. ◂(वृत्तसंस्था)



### दोन्ही देशांतील संबंध मजबूत : लिंस्कॉट

पंतप्रधान मोदींशी दूरध्वनीवरून झालेल्या संभाषणानंतर ट्रम्प यांनी भारतासोबतच्या करारावर केलेली टिप्पणी दोन्ही देशांतील घनिष्ठ आर्थिक संबंधांना आणखी मजबूत करते. करारासाठी खूप वेळ लागला असला, तरी दोन्ही देशांनी तयारी दर्शवली याचा मला आनंद आहे असे मत अमेरिकन व्यापार प्रतिनिधी मार्क लिंस्कॉट यांनी व्यक्त केले. ■

### रशियाची तेल खरेदी थांबविण्याचा आदेश नाही

करारानुसार, भारताने रशियाकडून तेल खरेदी थांबवण्यास आणि त्या बदल्यात अमेरिका आणि व्हेनेझुएला येथून आयात वाढविण्यास सहमती दर्शविली असल्याची माहिती लुटनिक यांनी दिली. तथापि, सरकारने रशियन तेल आयात थांबवण्यासाठी अद्याप कोणताही औपचारिक आदेश जारी केलेला नाही, अशी माहिती अधिकृत सूत्रांनी दिली. ■




### व्यापार करारासाठी आतापर्यंत काय घडले

- १३ ते १४ फेब्रुवारी २०२५ रोजी पंतप्रधान मोदी यांनी अमेरिकेचा दौरा केला आणि व्यापार कराराच्या वाटाघाटींवर राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यासोबत चर्चा केली
- २ एप्रिल २०२५ रोजी ट्रम्प यांनी भारतासह सर्व देशांवर १० टक्के शुल्क लावण्याची घोषणा केली आणि २६ टक्क्यांपर्यंत वाढविण्याचा इशारा दिला
- व्यापार करारातून कृषी उत्पादनांना वगळण्यावरून मतभेद झाल्याने ट्रम्प यांनी ३१ जुलै २०२५ रोजी भारतावर २५ टक्के शुल्क आकारण्याची घोषणा केली आणि रशियातून तेल खरेदी करण्यावरून दंड म्हणून अतिरिक्त शुल्क लावण्याचा इशारा दिला
- ७ ऑगस्ट २०२५ रोजी रशियाकडून तेल खरेदी करण्यावरून अतिरिक्त २५ टक्के आणि आधीचे २५ टक्के असे एकून ५० टक्के शुल्क भारतावर आकारण्यात आले
- २ फेब्रुवारी २०२६ रोजी ट्रम्पा यांनी भारतासोबत व्यापार करारावर सहमती झाल्याची घोषणा केली आणि भारतावरील शुल्क ५० टक्क्यांवर १८ टक्के करण्यात आले. ■

# मदत फुकट नाही, भारताकडून शिका!

## जागतिक बँकेच्या अध्यक्षांनी पाकिस्तानला फटकारले

◆ **जीनेव्हा, ३ फेब्रुवारी**

पंजाबमधील जालंधर येथे जन्मलेले जागतिक बँकेचे अध्यक्ष अजयपालसिंग बंगा यांच्या स्वागतासाठी पाकिस्तानने अंथरलेले 'रेड कार्पेट' काही कामाचे ठरले नाही. बंगा यांच्या दौऱ्यादरम्यान पाकिस्तानने त्यांना खूश करण्यासाठी त्यांचे उत्साहात स्वागत केले. तरीही, बंगा यांनी कर्जाच्या मुद्यावर पाकिस्तानी मंत्र्यांना चांगलेच फटकारले. जागतिक बँकेच्या अध्यक्षांनी सांगितले की, पाकिस्तान कर्ज घेत आहे, पण ही मदत फुकट दिली जात आहे, असे समजू नये.



इस्लामाबादमध्ये पंतप्रधान शहबाज शरीफ आणि अर्थमंत्री मुहम्मद औरंगजेब यांच्या भेटीदरम्यान, जागतिक बँकेने पुढील दहा वर्षांत पाकिस्तानला २० अब्ज डॉलर देण्याचा रोडमॅप (मार्ग नकाशा) तयार केला. यासोबतच बंगा यांनी पाकिस्तानी मंत्र्यांना सांगितले की, त्यांनी आपल्या देशातील भ्रष्टाचार आणि करचोरी थांबवावी. पाकिस्तानने सुधारणा केल्या नाहीत तर, येत्या वर्षांत कोणीही कर्ज देणार नाही.

जागतिक बँकेचे अध्यक्ष अजयपाल सिंग बंगा चार दिवसांच्या पाकिस्तान दौऱ्यावर आहेत. अखेरच्या दिवशी, ३ फेब्रुवारी रोजी बंगा त्यांच्या वडिलोपार्जित गाव, पंजाबमधील खुशाब जिल्ह्यात आले. १९४७ च्या फाळणीनंतर बंगा कुटुंबातील पहिले सदस्य आपल्या वडिलोपार्जित गावी जात आहेत. त्यापूर्वी त्यांनी गुरुद्वारा पंजा साहिबमध्ये माथा टेकला. एखाद्या भारतीयाच्या या भेटीवर यावेळी पाकिस्तानी माध्यमांनी कर्ज घेतल्यामुळे कोणतीही टिप्पणी केलेली नाही. मागील काही काळापासून आर्थिकदृष्ट्या संकटात असलेला पाकिस्तान आयएमएफ आणि जागतिक बँकेकडून मोठ्या प्रमाणात कर्ज घेत आहे. ◂(वृत्तसंस्था)

# भारत-अमेरिका कराराचे खरे श्रेय राजदूतांना

### २१ दिवसांत परिस्थिती बदलली

◆ **नवी दिल्ली, ३ फेब्रुवारी**

भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार कराराचा मसुदा अंतिम टप्प्यात आणण्यात एका व्यक्तीचा मोलाचा वाटा असल्याचे मानले जात आहे. ही व्यक्ती म्हणजे अमेरिकेचे भारतातील राजदूत सर्जियो गोर आहे. त्यांनी १२ जानेवारी २०२६ रोजी पद सांभाळल्यानंतर दोन्ही देशांतील चर्चेला वेग आला होता.

अमेरिकेने पहिल्यांदा गेल्या वर्षी एप्रिल महिन्यात भारतावर २५ टक्के टॅरिफ लावले होते. मात्र, डोनाल्ड ट्रम्प यांनी मोदींसोबतच्या मैत्रीला जागत आता टॅरिफ कमी करून १८ टक्क्यांवर आणले आहे. ज्यावेळी भारत आणि अमेरिका यांच्यात व्यापार करारावर वाटाघाटी सुरू होत्या. मात्र, सर्जियो गोर यांनी राजदूत म्हणून कार्यभार स्वीकारल्यानंतर कराराला निश्चित रूप देण्याच्या प्रक्रियेला वेग आला. अनेक बाबतीत चित्र स्पष्ट होत गेले. सर्जियो गोर यांनी पद स्वीकारताच भारत आणि अमेरिका यांच्यात सर्व काही ठीक सुरू आहे



असे सांगत चर्चा सकारात्मक सुरू असल्याचे संकेत दिले. लवकरच चांगले परिणाम दिसतील. दोन्ही देशांमधील नाते खूप चांगले आहे. हे देश एकमेकांचा आदर करतात असे ते म्हणाले होते.

**डोनाल्ड ट्रम्प यांचे निकटवर्तीय**

गोर हे भारतात राजदूत म्हणून येण्यापूर्वी ते व्हाईट हाऊस प्रेसिडेंशियल पर्सनल ऑफिसचे संचालक होते. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे ते सर्वांत विश्वासू सहयोगी म्हणून ओळखले जातात. गोर यांच्यावर भारताची जबाबदारी त्यांनी दोन्ही देशांमधील तणाव वाढत असताना सोपवली होती. राजदूत होताच त्यांनी पुढच्या दिवशाच म्हणजे १३ जानेवारी रोजीच भारत आणि अमेरिका यांच्यातील अधिकाऱ्यांमध्ये व्यापार करारावर चर्चा सुरू असल्याचे संकेत दिले होते. त्यांनी दोन्ही देशांमध्ये चर्चेच्या सात फेऱ्या घडवून आणल्या.

**भारतासारखा दुसरा सहकारी नाही**

गोर यांनी जाहीररीत्या भारतासारखा महत्त्वाचा सहकारी देश दुसरा कोणता नाही, असे वक्तव्य केले होते. ◂(वृत्तसंस्था)




भारतातील चहाची भुरळ जगभरात आहे. देशातील चहाचा दर्जा अत्युच्च समजला जातो. त्रिपुरातील आगरतळा शहराच्या बाहेर चहाच्या मळ्यात चहाची पाने तोडताना कामगार

## चित्रपट वार्ता

### 'गोलमाल-५'मध्ये दिसणार अक्षयकुमार

**मुंबई** : बॉलिवूडची गाजलेली कॉमेडी फ्रँचायझी 'गोलमाल' आता तिच्या पाचव्या भागासह प्रेक्षकांसमोर येणार आहे आणि यावेळी चित्रपटात एक मोठा ट्विस्ट पाहायला मिळणार आहे. अक्षयकुमारने 'गोलमाल-५' मध्ये मुख्य खलनायकाच्या भूमिकेत प्रवेश केला आहे. तो अजय देवगण आणि त्याच्या टीमविरुद्ध पडद्यावर दोन हात करेल. मुख्य कलाकारांमध्ये अजय देवगण पुन्हा या फ्रँचायझीच्या मुख्य भूमिकेत दिसणार आहे, तसेच अर्शद वारसी, तुषार कपूर, कुणाल खेमू आणि श्रेयस तळपदे यांचेही पुनरागमन निश्चित आहे. याशिवाय जॉनी लिव्हर, संजय मिश्रा, मुकेश तिवारी आणि अश्विनी कळसेकर यासारखे अनुभवी कलाकारही या यादीत समाविष्ट आहेत. शरमन जोशी परत येण्याची शक्यता आहे, तर करिनाबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. २०२७ च्या सुरुवातीला तो चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. ■



### पोस्टरपाठोपाठ 'धुरंधर-२'चा टीझर प्रदर्शित

**मुंबई** : रणवीरसिंहच्या 'धुरंधर-२' चित्रपटाचा टीझर रिलीज झाला आहे. 'धुरंधर : द रिव्हेंज' असे या भागाचे नाव आहे. एक मिनिट १२ सेकंदांच्या या टीझरमध्ये रणवीरसिंह पुन्हा एकदा त्याच्या दमदार आणि धोकादायक अवतारात दिसत आहे. टीझरची सुरुवात रणवीरसिंहच्या नवीन लूकने होते. हातात बंदूक, छोटे केस आणि डोळ्यांत दिसणारी लढाईची आग त्याच्या भूमिकेला आणखीनच भयानक बनवते. रणवीरसिंहच्या जसकीरतसिंग रंगी या भूमिकेचे हमजामध्ये बदललेले रूप दाखवण्यात आले आहे. हा बदल प्रेक्षकांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण करतो, ज्यामुळे असे काही प्रसंग घडतात की हमजाला देशासाठी आपली ओळख पणाला लावून धोकादायक टोळ्यांमध्ये घुसावे लागते. या भागातील सर्वांत मोठे गूढ 'बडे साब' कोण, हेच राहणार आहे. काहींनी यासाठी सलमानचे नाव घेतले तर काहींनी केजीएफ स्टारची शक्यता वर्तवली आहे. आधीचा भाग पाहिलेल्यांनी अर्जुन रामपालच 'बडे साब' असावा, असे म्हटले आहे. प्रत्यक्षात १९ मार्च रोजी हे रहस्य उलगडणार आहे. ■




### गोपीचंद पडळकरांचे गाणे आले समोर

**मुंबई** : भाजपा आमदार गोपीचंद पडळकर त्यांच्या बिनधास्त, स्पष्ट वक्तव्यामुळे नेहमीच चर्चेत असतात. धनगर समाजाच्या प्रश्नांवरून ते नेहमीच आक्रमक असतात. पडळकर यांनी सिनेसृष्टीतही काम केले आहे. त्यांनी एका चित्रपटाची निर्मिती केली असून, त्यांनी अभिनय केलेले गाणे आता समोर आले आहे. 'आमच्या नादाला लागण्याआधी आमचा इतिहास वाचून या', असे ते या गाण्यातून सांगतात. या गाण्यातून होळकरशाहीचा इतिहास एकदा आठवा, असे म्हणत पडळकरांनी विरोधकांना इशाराच दिला आहे. आता जिल्हा परिषद निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर हे गाणे समोर आले आहे. ते समाज माध्यमांवर व्हायरल होत आहे. ■



# बस दरीत कोसळून पाच प्रवासी ठार

## उत्तराखंडच्या डेहराडून जिल्ह्यातील घटना

### ३५ जखमी

◆ **डेहराडून, ३ फेब्रुवारी**

हिमाचल प्रदेश परिवहन विभागाची बस मंगळवारी सकाळी उत्तराखंडच्या डेहराडून जिल्ह्यातील हरिपूर-क्वानू मीनस मार्गावर अनियंत्रित होऊन १५० फूट दरीत कोसळली. या अपघातात पाच प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला, तर ३५ जण गंभीर जखमी आहे, त्यांना खासगी रुग्णालयात भरती करण्यात आले.

हिमाचल प्रदेशच्या नेरवा-चौपाल येथून मंगळवारी पहाटे रवाना झालेली बस उत्तराखंडच्या पांवटा साहिबकडे जात होती डेहराडून जिल्ह्यातील हरिपूर-क्वानू मीनस मार्गावरील वळनावर चालकाचे नियंत्रण सुटले आणि बस दरीत कोसळली. स्थानिकांकडून घटनेची माहिती मिळताच पोलिस आणि बचाव पथक घटनास्थळी पोहोचले. बसमध्ये अडकलेल्या अपघातग्रस्तांना बाहेर काढून डेहराडून येथील खासगी रुग्णालयात हलविले, तिथे डॉक्टरांनी पाच प्रवाशांना मृत घोषित केले, तर ३५ जणांवर उपचार सुरू असल्याची माहिती राज्य आपत्ती प्राधिकरणाचे अधिकारी अर्पण यदुवंशी यांनी दिली.

मृतांमध्ये दोन महिला आणि तीन पुरुषाचा समावेश आहे. अपघातात चालक आणि वाहकदेखील गंभीर जखमी आहे. ◂(वृत्तसंस्था)




### तालिबानची गर्भनिरोधक गोळ्यांवर बंदी

◆ **काबुल, ३ फेब्रुवारी**

अफगाणिस्तानमध्ये तालिबान सरकारने महिलांसाठी गर्भनिरोधक गोळ्यांच्या वापरास बंदी घातली आहे. तालिबान डॉक्टरांना धमकी देतात की औषध दिल्यास क्लिनिक बंद करतील.

देशभरात क्लिनिकही बंद होत आहेत. महिलांना गर्भधारणा किंवा गर्भपातावर उपचार मिळत नाहीत. बदगीस प्रांतातील एका खाजगी क्लिनिकमध्ये तर, इशारा देऊन सर्व औषधे नष्ट करण्यात आली.

जवजजान प्रांतात ३० वर्षांपासून क्लिनिक चालवणाऱ्या एका डॉक्टर म्हणतात, तालिबान सत्तेत आल्यापासून गर्भनिरोधक गोळ्या वेगाने संपत आहेत. येथे ७० पैकी ३० महिलांना याची गरज होती, आता आम्ही सांगतो की आमच्याकडे काहीही नाही. कंदहार प्रांतासह अनेक ठिकाणी थेट पुरुष डॉक्टरांकडून उपचार घेण्यावर कठोरता आहे. ◂(वृत्तसंस्था)

# पत्नीने वैध कारणाशिवाय पतीला सोडल्यास पोटगी नाही!

## केरळ उच्च न्यायालयाचा निर्णायक निकाल



◆ **तिरुवनंतपुरम, ३ फेब्रुवारी**

पत्नीने कोणतेही वैध कारण नसताना स्वतःहून पतीपासून वेगळे राहण्याचा निर्णय घेतला असेल, तर घटस्फोटापूर्वीच्या काळासाठी ती पोटगीची मागणी करू शकत नाही, असे केरळ उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

न्या. सतीश निनान आणि न्या. पी. कृष्णकुमार यांच्या खंडपीठाने कौटुंबिक न्यायालयाचा निर्णय अंशतः बदलत हा निकाल दिला. या प्रकरणात कौटुंबिक न्यायालयाने पत्नीने पतीला सोडून दिले असून, त्यामागे कोणतेही ठोस कारण नसल्याचे मान्य करीत घटस्फोट मंजूर केला होता. मात्र, त्याचवेळी पत्नी आणि मुलाच्या वेगळे राहण्याच्या कालावधीसाठी भरणपोषण देण्याचे आदेश दिले होते.

या निर्णयाला पतीने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. न्यायालयाने स्पष्ट केले की जेव्हा पत्नीने स्वतःच पतीपासून वेगळे राहण्याचा निर्णय घेतला आहे, तेव्हा त्या काळासाठी मागील पोटगी देण्यात कोणताही तर्कसंगत आधार उरत नाही. घटस्फोट कायदा १८६९ अंतर्गत, जरी घटस्फोट मंजूर झाला तरीही, मागील कालावधीसाठी भरणपोषण देणे बंधनकारक नाही, असेही न्यायालयाने नमूद केले. पत्नीच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की, परित्याग म्हणजे नेहमीच अवैध कारणांमुळेच होतो असे नाही. मात्र, न्यायालयाने सांगितले की हिंदू विवाह कायदा-१९५५ आणि घटस्फोट कायदा-१८६९ यामधील तरतुदी वेगवेगळ्या असून, या प्रकरणात पत्नीने वैध कारण सिद्ध न केल्याने मागील पोटगीचा हक्क निर्माण होत नाही. या जोडप्याचे लग्न जून २००३ मध्ये ख्रिश्चन पद्धतीने झाले होते.

डिसेंबर २००५ मध्ये त्यांना मूल झाले, मात्र, तरीही दोघे वेगळेच राहत होते. पुढे पतीने कौटुंबिक न्यायालयात घटस्फोटासाठी अर्ज केला, तर पत्नीने स्वतंत्र खटला दाखल करून तिला लग्नात मिळालेले सोन्याचे दागिने परत देण्याची आणि वेगळे राहत असतानापासून भरणपोषण देण्याची मागणी केली होती. ◂(वृत्तसंस्था)

### रहमान डकैतच्या मुलाला कराचीमध्ये अटक

◆ **इस्लामाबाद, ३ फेब्रुवारी**

पाकिस्तानातील कराची येथील पोलिसांनी गँगस्टर रहमान डकैतचा मुलगा जिब्रानला शस्त्र तस्करीच्या आरोपात अटक केली. त्याच्या ताब्यातून बंदुका, दारुगाळा जप्त करण्यात आला.

जिब्रान हा अब्दुल रहमान उर्फ रहमान डकतचा मुलगा आहे आणि तो बऱ्याच काळापासून गुन्हेगारी कारवायांमध्ये सक्रिय आहे. शस्त्र तस्करीच्या प्रकरणात पोलिस त्याचा शोध घेत होते. माहितीच्या आधारे सोमवारी रात्री कालाकोट येथून त्याला अटक करण्यात आली. अटकेवेळी त्याच्याकडून एक पिस्तूल जप्त करण्यात आले, त्याच्या निवासस्थानी छापा टाकून मोठ्या प्रमाणात शस्त्रे, दारुगोळा जप्त केले. ◂(वृत्तसंस्था)

# शास्त्रज्ञांनी तयार केले फुफ्फुसाचे थ्रीडी मॉडेल

## • भारतीय विज्ञान संस्थेच्या शास्त्रज्ञांचा प्रयोग • क्षयरोगाच्या औषधांचे अचूक परीक्षण शक्य

◆ **बंगळुरू, ३ फेब्रुवारी**

क्षयरोग हा एक गंभीर आजार आहे. दरवर्षी लाखो लोक या आजाराने बाधित होतात. भारतीय शास्त्रज्ञांनी यात क्रांतिकारी बदल घडवून आणला आहे. बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थेच्या शास्त्रज्ञांनी प्रयोगशाळेत फुफ्फुसांचे थ्रीडी मॉडेल तयार केले आहे. यामुळे क्षयरोगांच्या औषधांचे परीक्षण आता अधिक अचूक आणि वेगाने करणे शक्य होणार आहे.

आतापर्यंत प्रयोग शाळेत क्षयरोगाच्या औषधांची चाचणी प्लॅस्टिकच्या सपाट प्लेटवर केली जात होती. मानवी फफ्फुसे ही सपाट नाहीत यासाठी शास्त्रज्ञांनी त्रिमितीय म्हणजेच थ्रीडी मॉडेल तयार केले आहे. शास्त्रज्ञांनी कोलेजन जेलच्या मदतीने तयार केलेली ही थ्रीडी रचना हुबेहुब मानवी फुफ्फुसांच्या उतींप्रमाणे कार्य करते. या मॉडेलमध्ये क्षयरोगाचे जीवाणू एखाद्या रुग्णाच्या शरीरात वाढत असल्याप्रमाणे वाढतात. भारतीय विज्ञान संस्थेचे डॉ. रचित अग्रवाल आणि त्यांच्या टीमने केलेल्या या संशोधनानुसार, जुन्या टूडी मॉडेल्समुळे अनेकदा औषधांच्या परिणामांची अचूक माहिती मिळत नव्हती.




**क्षयरोग हा एक संसर्गजन्य आजार असून, तो 'मायकोबॅक्टेरियम ट्युबरकुलोसिस' नावाच्या जीवाणूमुळे होतो. हा आजार प्रामुख्याने फुफ्फुसांवर हल्ला करतो आणि हवेद्वारे एकाकडून दुसऱ्याला होतो. फुफ्फुसांव्यतिरिक्त हा जीवाणू मणका, मेंदू आणि मूत्रपिंडावरही परिणाम करू शकतो. भारतीय शास्त्रज्ञांच्या या यशामुळे भविष्यात क्षयरोगमुक्त भारताचे स्वप्न पूर्ण होण्यास मोठी मदत होणार आहे.** ■

क्षयरोगावरील महत्त्वाचे औषध 'पायराजीनामाइड' जुन्या मॉडेल्समध्ये निष्प्रभ वाटायचे. मात्र, या नवीन थ्रीडी मॉडेलमध्ये या औषधाने अगदी रुग्णाच्या शरीरात दाखवतो तसाच सकारात्मक परिणाम दाखवला आहे. या नवीन थ्रीडी मॉडेलमुळे आता कोणतीही नवीन औषधे बाजारात आणण्यापूर्वी त्यांची विश्वासार्हता अधिक चांगल्या प्रकारे तपासता येईल. ◂(वृत्तसंस्था)

## अग्रलेख...

# मुठीतल्या जगाने 'जगणे' गिळले

प्रखर प्रकाशाची नेत्रदीपक रोषणाई न्याहाळताना काही क्षण डोळे अक्षरशः दिपून जातात, पण नजर बाजूला झाली, की काही क्षण आसपासचे काहीच दिसतदेखील नाही. आज झपाट्याने सुरू असलेल्या तंत्रज्ञानाच्या प्रगतीचे काहीसे तसेच होऊ लागले आहे. या प्रगतीच्या तेजाने डोळे दिपल्यामुळे त्याच्या अभिमानास येणाऱ्या भरतीच्या लाटा ओसरल्यावर नजर बाजूला केली की त्याच डोळ्यांसमोर काही क्षण अंधारी आल्यासारखे होऊ लागते. प्रगतीच्या त्या नशेमुळे सुरुवातीस याची फारशी दखल घेतली गेली नाही. किंबहुना, डोळ्यासमोर येणारी अंधारी साहजिकच आहे असे समजून त्याकडे दुर्लक्षदेखील केले गेले. पण याच प्रगतीच्या तेजामुळे दिपलेल्या डोळ्यांसमोरची अंधारी आता दूर होऊ लागली असून, त्या तेजामागची दुसरी अंधारलेली बाजू उजेडात येऊ लागली आहे. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सादर झालेल्या देशाच्या आर्थिक पाहणी अहवालाने ही बाजू अधिक ठळकपणे उजेडात आणली आहे आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे दिपलेले डोळे आता खाडकन् उघडले आहेत. एका भयग्रस्त भविष्याचे चित्र आता नजरेसमोर स्पष्ट झाले आहे आणि प्रगतीच्या तेजाने भुलून जाण्यापेक्षा, त्या भविष्यचित्राच्या जाणिवांचे भान ठेवण्याची गरज अधोरेखित झाली आहे. देशाच्या आर्थिक पाहणी अहवालाने तीच गरज दाखवून दिली असून त्याची दखल घेतली नाही तर भविष्यात भावी पिढीला गंभीर परिणाम सहन करावे लागतील असा इशारादेखील दिला आहे. डिजिटल व्यसनाधीनतेचा विळखा तरुण मुले आणि बालकांभोवती घट्ट आवळला जात असून त्यामुळे आरोग्याच्या समस्या तर गंभीर होत आहेतच, पण मानसिक आरोग्याच्या समस्यादेखील उग्र होत जातील अशी भीती व्यक्त करणारी आकडेवारी या अहवालातून समोर आली आहे. या व्यसनाच्या विळख्यात गुरफटलेली बालके आणि मुलांच्या शैक्षणिक क्षमता ढासळत चालल्या असून, कामाच्या ठिकाणी आवश्यक असलेली उत्पादनक्षमताही कमी होत आहे. डिजिटल व्यसनांमुळे निद्रानाश, एकाग्रतेचा अभाव आणि मानसिक संभ्रमावस्थेसारखे विकार बळावत असून १५ ते २४ वयोगटातील मुलांमध्ये या व्यसनापायी वैफल्यग्रस्तता आणि चिंता यांसारखे विकार वाढत आहेत. अशाच अनेक दुष्परिणामांमुळे बिघडत चाललेल्या भावी पिढीला वाचविण्यासाठी सरकारी स्तरावर ठोस उपाययोजनांची गरजही या अहवालातून व्यक्त करण्यात आली आणि अशा विकारांनी ग्रासलेल्या मुलांच्या चिंताग्रस्त कुटुंबांचे एक विदारक चित्रदेखील स्पष्ट झाले. टेलिमानस नावाची एक दूरस्थ सल्ला योजना सरकारने चार वर्षांपूर्वी अंमलात आणल्यापासून अशा चिंतेने ग्रासलेल्या सुमारे ३२ लाख पालकांनी उपायाकरिता या योजनेकडे धाव घेतल्याचे स्पष्ट झाले.

डिजिटल क्रांती ही आजच्या जगाची अपरिहार्यता आहे, त्यामुळे त्याच्या फायद्यातोट्यांपासून पूर्णपणे अलिप्त राहणे कोणालाच शक्य नाही, हे खरे असले, तरी या क्रांतीच्या दुष्परिणामांची फळे चाखण्याची वेळ कोणावर येऊ नये यासाठी काही ठोस उपाययोजना केल्या पाहिजेत, असा इशारा आर्थिक पाहणी अहवालाने दिल्यानंतर लगेचच महाराष्ट्रात उपाययोजनांची आखणी सुरू झाली ही बाब समाधानकारक म्हणावी लागेल. सोशल मीडिया आणि डिजिटल व्यसनांच्या गंभीर विकाराचे दुष्परिणाम वेळीच रोखता यावेत याकरिता या क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश असलेला कृतिगट स्थापन करण्याचा निर्णय राज्याचे माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी घेतला आहे. या कृतिगटाच्या अहवालानंतर, या साधनांचा वापर करण्याबाबत वयोमर्यादा आखून देण्याबाबत राज्य सरकारचा विचार असल्याचे सांगण्यात येते. ३५ वर्षांखालील तरुणांमध्ये मानसिक आजार वाढण्यामागे डिजिटल व्यसनाधीनता हे प्रमुख कारण असल्याच्या एका संस्थेच्या अहवालाचा हवाला देऊन आशिष शेलार यांनी राज्याच्या संबंधित खात्यास कामाला जुंपल्याने, या क्रांतीच्या तेजाने दिपलेल्या महाराष्ट्राच्या नजरेस आता पुढचे सारे काही स्वच्छ दिसू लागल्याची जाणीव निश्चितच दिलासादायक ठरणार आहे. महाराष्ट्रात १८ वर्षांखालील सुमारे चार कोटी मुले समाजमाध्यमांचा वापर करतात आणि त्यापैकी असंख्य मुलांच्या आरोग्यविषयक समस्यांमुळे पाालकवर्ग चिंतित झालेला आहे. मुलांच्या शारीरिक आरोग्यासोबतच कार्यक्षमताही ढासळत चालली असून कुटुंबव्यवस्थेची संस्कृतीही धोक्यात येऊ पाहात आहे. त्यामुळे, देशाच्या आर्थिक पाहणी अहवालाचा इशारा गांभीर्याने घेण्याची गरज महाराष्ट्राने ओळखली हे चांगले झाले आहे.

डिजिटल तंत्रज्ञानाने शिक्षण, माहिती आणि संवादाच्या नव्या शक्यता उघडल्या, हे नाकारता येणार नाही. मात्र मर्यादेचा अभाव हा त्याचा सर्वांत मोठा शत्रू ठरत आहे. 'स्क्रीन टाईम' हा शब्द आता केवळ वेळेचा नाही, तर मेंदूच्या वाढीचा, भावनिक परिपक्वतेचा आणि सामाजिक जाणिवांचा प्रश्न बनला आहे. लहान वयात सातत्याने स्क्रीनसमोर बसल्याने मुलांमध्ये डोळ्यांचे विकार, लठ्ठपणा, झोपेचे विकार, मान-पाठीचे दुखणे अशा शारीरिक तक्रारी वाढताना दिसतात. पण त्याचा मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम ही या व्यसनाची अधिक चिंताजनक बाब आहे. तळव्याएवढ्या आकाराच्या पडद्यावर नजर एकवटून स्वतःस व्यसनाच्या हाती सोपविण्याच्या या सवयीमुळे मुलांमध्ये एकाग्रतेचा अभाव, चिडचिडेपणा, आक्रमकता, चिंता आणि नैराश्य वाढत आहे, हा निष्कर्ष आता नवा राहिलेला नाही. तरीही, 'गेम हरला' किंवा 'मोबाईल काढून घेतला' म्हणून रडणाऱ्या मुलाहाती पुन्हा मोबाईल देऊन मुलाची समजूत काढण्याची पालकांची पळवाटदेखील या संकटास कारणीभूत ठरत आहे.

आभासी जगात 'लाईक्स' आणि 'स्कोअर्स' मिळतात; पण भावनिक सुरक्षितता, सहानुभूती आणि अपयश पचवण्याची क्षमता हरवते. परिणामी, खऱ्या आयुष्यातील आव्हानांना सामोरे जाण्याची मानसिक ताकद कमी पडते. अगोदरच, सामान्य माणसाच्या जगण्याचा संघर्ष दिवसागणिक तीव्र होत चाललेला असल्याने, सहनशक्तीची कसोटी पार पाडताना पालकांची दमछाक होत आहे. अशा वेळी, कामाच्या व्यापातील व्यत्यय टाळण्यासाठी आणि 'मुलगा शांत बसावा' म्हणून त्याच्या हाती मोबाईल देणारे पालक हे काही खलनायक नाहीत; पण अशीच सततची तडजोड पुढील पिढीचे मानसिक आरोग्य धोक्यात आणते, हेही वास्तव आहे. शाळा, पालक आणि शासन या तिन्ही घटकांनी याकडे गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे. महाराष्ट्राला याची जाणीव वेळेवर झाली आणि सरकारने त्यादृष्टीने पावले उचलली याबद्दल राज्य सरकारचे, विशेषतः आशिष शेलार यांचे अभिनंदन करावयास हवे. कारण, भावी पिढीच्या आरोग्याबाबतची संवेदनशीलता ओळखून कृती समिती नेमण्याचा व त्यानुसार मुलांच्या मोबाईल मग्नतेस लगाम घालण्याचा विचार अन्यथा पालकांच्या कृतीच्या आवाक्याबाहेरच राहिला असता.

आज क्रांतीचा वेग पाहता, डिजिटल जगापासून मुलांना पूर्णपणे तोडणे शक्य नाही आणि तसे करणे आवश्यकही नाही. मात्र वयानुसार मर्यादित स्क्रीन वेळ, शाळांमध्ये डिजिटल साक्षरतेसोबत मानसिक आरोग्य शिक्षण, कुटुंबात मोबाईलमुक्त वेळ, आणि संवादाकरिता पालकांची उपलब्धता, मैदानी खेळ, वाचन आणि कला यांना प्रोत्साहन आणि गरज भासल्यास समुपदेशनाची सोय हे उपाय तातडीने राबवावे लागतील. डिजिटल युगातील मुहूर्तमेढ भारतात रोवली गेली, तेव्हा 'कर लो दुनिया मुट्ठी में' ही एक घोषणा खूप लोकप्रिय झाली होती. लोकांना त्याची भुरळही पडली होती आणि खरोखरीच, जग मुठीत आल्याच्या प्रत्यक्ष अनुभवाने सगळेच सुखावूनही गेले होते. या क्रांतीची फळे आपल्याला, आपल्या भावी पिढीला मिळावीत या चांगल्या हेतूनेच पालकांनी मोबाईल नावाचे क्रांतियंत्र मुलांच्या हाती सोपवले आणि आता त्याच्या दुष्परिणामांच्या जाणिवा जगात सर्वत्र उमटू लागल्या. क्रांतीच्या वेगात वाहवत जाताना, आपण जग मुठीत धरले खरे, पण त्या नशेमध्ये हरवून जगणे मात्र निसटून जात राहिले, हे आधी लक्षातच आले नाही. आता ती चूक सुधारण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. आपण मुलांच्या हातात जग देत आहोत, पण त्यांना जगण्याची मानसिक तयारी देतोय का, या प्रश्नाच्या उत्तराचा शोध सुरू झाला आहे. डिजिटल साधनांचा वापर हे व्यसन बनू नये, याची काळजी घ्यायलाच हवी. नाहीतर, तंत्रज्ञानाने समृद्ध पण मानसिकदृष्ट्या कोलमडलेली पिढी पाहावी लागेल आणि त्याचे उत्तर आजच्या पालक पिढीला द्यावे लागेल.

## विशेष


प्रा. सुखदेव बखळे

# गरज पारेषणातील त्रुटी दूर करण्याची

भारतात वीज क्षेत्रात कार्यरत असलेल्या वीजनिर्मिती, पारेषण (वहन) आणि वितरण अशा तीन कंपन्यांपैकी उच्च दाबांच्या वाहिन्यांमधून विजेचे वहन घडवण्यास जबाबदार असलेली वीज पारेषण ही अतिशय महत्त्वाची कंपनी आहेत. देशात वेगवेगळ्या योजनांमधून वीज पारेषणसाठी निधी दिला जात असतो. या क्षेत्रातील पायाभूत सुविधांवर खर्च केला जात असतो. देशात वीज पारेषण नेटवर्क आणि त्यासाठी पायाभूत क्षेत्रात सुरू असलेली कामे याचा आढावा घेणे आवश्यक आहे.

भारताचे 'हाय व्होल्टेज वीज पारेषण नेटवर्क' २२० किलोवॅट आणि चार लाख ९५ हजार सर्किट किलोमीटर (सीकेटी किलोमीटर) पर्यंत पसरले आहे. या प्रक्रियेमध्ये आज प्रत्यावर्ती धारा (एसी - ऑल्टरनेट सायकल) परिवर्तन क्षमता अंदाजे १३ लाख ५४ हजार मेगावॅटपर्यंत पोहोचली आहे. तिला १८ हजार मेगावॅटपेक्षा जास्त वाढत्या 'हाय व्होल्टेज डायरेक्ट करंट' (एचव्हीडीसी) लाईन क्षमतेने बळ मिळाले आहे. त्यामुळे दूरवर मोठ्या प्रमाणात विजेचे कार्यक्षमतेने वहन करणे शक्य होते. तथापि, आर्थिक वर्ष २०२५ मध्ये सुमारे १५ हजार 'सर्किट किलोमीटर'च्या उद्दिष्टाच्या तुलनेत केवळ ८,८३० सर्किट किलोमीटर नवीन पारेषण लाईन्स कार्यान्वित झाल्या. असे असले, तरी एकूण गरजेच्या हे प्रमाण जवळपास ४० टक्क्यांनी कमी आहे. आंतरराज्य पारेषण प्रणालीमध्ये (आयएसटीएस) झालेली वाढ एका दशकातील सर्वांत कमी आहे. अहवालात नमूद केले आहे की, ७१ टक्क्यांपर्यंत 'आयएसटीएस कॉरिडॉर' तीस टक्क्यांपेक्षा कमी क्षमतेने कार्यरत आहेत. जून २०२५ पर्यंत भारताची राष्ट्रीय ग्रीड पारेषण क्षमता अंदाजे एक लाख वीस हजार ३४० मेगावॅट होती. नऊ ट्रिलियनपेक्षा जास्त गुंतवणुकीने ही क्षमता एक लाख ६८ हजार मेगावॅटपर्यंत वाढवण्याची योजना आहे. तथापि, पारेषण पायाभूत सुविधांच्या विकासाचा वेग अक्षय ऊर्जा प्रकल्पांच्या कार्यान्वित होण्याच्या वेळापत्रकापेक्षा मागेच आहे. या विलंबाचे मुख्य कारण पारेषण प्रकल्पांशी संबंधित मंजुरी, भूसंपादन आणि नियामक परवानग्यांसाठी लागणारा जास्त वेळ हे आहे.

२०३० साठी भारताच्या पारेषण वाहिनी नेटवर्कच्या नियोजनाला विलंब आणि विसंगतींचा सामना करावा लागत आहे. त्याचे मूळ राज्यांनी घोषित केलेल्या नवीकरणीय ऊर्जा (आरई) क्षमतेमध्ये आणि विकसक मागत असलेल्या कनेक्टिव्हिटी क्षमतेतील तफावतीमध्ये आहे. ही विसंगती पारेषण प्रणालीचे नियोजन गुंतागुंतीचे करते. त्यामुळे अनेकदा विविध कॉरिडॉरमध्ये गरजांचा अतिअंदाज किंवा कमी अंदाज लावला जातो. परिणामी, अनेक वीजनिर्मिती प्रकल्प कनेक्टिव्हिटी असूनही पारेषणामधील अडथळे किंवा अवरुद्ध कॉरिडॉरमुळे पूर्णपणे वापर करू शकत नाहीत. याव्यतिरिक्त आगामी प्रकल्पांसाठी नवीन कनेक्टिव्हिटी मर्यादित आहे आणि हरित ऊर्जेच्या वहनासाठी पुरेशी पारेषण क्षमता उपलब्ध



होण्यापूर्वी दोन वर्षे किंवा त्याहून अधिक काळाचा विलंब अपेक्षित आहे. परिणामी, अनेक नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प रखडले आहेत किंवा त्यांच्या नियोजित क्षमतेपेक्षा कमी क्षमतेने कार्यरत आहेत. त्यामुळे राष्ट्रीय निर्मितीची उद्दिष्टे साध्य करण्यावर परिणाम होत आहे.

'टॅरिफ-आधारित स्पर्धात्मक बोली' (टीबीसीबी) प्रणालीअंतर्गत विकसित केलेल्या पारेषण वाहिनी प्रकल्पांमधील एक प्रमुख आव्हान म्हणजे पारेषण परवान्याचा कालावधी (२५ वर्षे) आणि पारेषण सेवा करार (टीएसए) कालावधी (३५ वर्षे) यातील विसंगती. ही तफावत कर्जदात्यांसाठी जोखीम मूल्यांकन आणि आर्थिक वचनबद्धता गुंतागुंतीची करते. त्यामुळे प्रकल्पाच्या वित्तपुरवठ्यामध्ये अनिश्चितता येते. कर्जदात्यांना मार्गाधिकार संपादनातील विलंब, प्रकल्पाच्या अंमलबजावणीतील संथपणा आणि वस्तूंच्या किमतींमधील चढ-उतार यासारख्या सततच्या समस्यांनाही सामोरे जावे लागते. प्रकल्पाच्या वेळापत्रकावर आणि आर्थिक व्यवहार्यतेवर या सर्वांचा परिणाम होतो. आयोगांकडून/सरकारी प्राधिकरणांकडून होणारा नियामक विलंब आणि मार्गाधिकारातील अडथळे प्रगतीमध्ये अडथळा निर्माण करत आहेत, तर वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे बजेट अनेकदा सुरुवातीच्या अंदाजापेक्षा वाढते. हे घटक एकत्रितपणे कर्जदात्यांचा आत्मविश्वास कमी करतात आणि पारेषण पायाभूत सुविधांच्या विकासाचा वेग मंदावतात. तो नवीकरणीय ऊर्जानिर्मितीच्या वाढीशी सुसंगत राहण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.

'सेंट्रल ट्रान्समिशन युटिलिटी ऑफ इंडिया लिमिटेड' (सीटीयूआयएल) ने २०२५ मध्ये सुमारे १७ गीगावॅट नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांची कनेक्टिव्हिटी रद्द केली. राजस्थान, गुजरात आणि मध्यप्रदेश यासारख्या नवीकरणीय ऊर्जेने समृद्ध राज्यांमधील विलंबित आणि रखडलेल्या प्रकल्पांना लक्ष्य करून ही कारवाई करण्यात आली. विजेच्या वाढत्या मागणीचे अधिक चांगल्या प्रकारे व्यवस्थापन करण्यासाठी कार्यरत आणि पूर्णत्वाच्या जवळ असलेल्या प्रकल्पांना ग्रीडमध्ये प्रवेशासाठी प्राधान्य देणे हा यामागील उद्देश होता. पारेषण क्षेत्रात मार्गाधिकार (आरओडबल्यू) आव्हाने कायम असताना भारतामध्ये उद्योगक्षेत्रातील खेळाडूंना अतिरिक्त अडथळ्यांना सामोरे जावे लागत आहे. ट्रान्सफॉर्मरसारख्या दीर्घ-प्रतीक्षा कालावधीच्या उपकरणांसाठी मर्यादित पुरवठा साखळी ही एक प्रमुख चिंता आहे, जिथे प्रकल्प वेळेवर पूर्ण करण्यासाठी वेळेवर वितरण महत्त्वाचे आहे. मोठ्या प्रमाणात वीज प्रेषणासाठी मर्यादित कॉरिडॉर उपलब्ध असल्याने 'हाय व्होल्टेज डायरेक्ट करंट' (एचव्हीडीसी) पारेषण नेटवर्कचा विस्तार करणे आवश्यक आहे. भारतातच 'एचव्हीडीसी'सारख्या नवीन तंत्रज्ञानाचे संशोधन आणि विकास करण्यास प्रोत्साहन देण्याची गरज आहे, कारण 'एचव्हीडीसी' प्रणालींच्या निर्मितीसाठी लागणारा वेळ जास्त असतो आणि भविष्यातील मागणी पूर्ण करण्यासाठी लवकर गुंतवणूक करणे आवश्यक आहे.

राज्य पारेषण उपयुक्ततांची (एटीयू) भूमिका तितकीच महत्त्वाची आहे. ती केंद्रीय पारेषण उपयुक्ततांच्या प्रयत्नांना पूरक ठरते. भविष्यात 'एसटीयू'ज आंतरराज्य पारेषण प्रकल्पांसाठी दर-आधारित स्पर्धात्मक बोली (टीबीसीबी) यंत्रणा स्वीकारतील, अशी अपेक्षा आहे. या बदलामुळे स्पर्धेला चालना मिळेल, खाजगी गुंतवणूक आकर्षित होईल आणि देशभरात पारेषण पायाभूत सुविधांचा वेगवान विकास शक्य होईल. सध्या देशाच्या नवीकरणीय ऊर्जेच्या महत्त्वाकांक्षेपुढे काही आव्हाने आहेत. धोरणात्मक गुंतवणूक, लक्ष्यित नियामक सुधारणा, ग्रीन एनर्जी कॉरिडॉर आणि 'टीबीसीबी' प्रकल्पांसारख्या उपक्रमांच्या समन्वित अंमलबजावणीद्वारे भारत आपली पारेषण प्रणाली नवीकरणीय ऊर्जेसाठी एक मजबूत सक्षमकर्ता म्हणून रूपांतरित करू शकतो. यामुळे हरित ऊर्जेचे विश्वसनीय आणि कार्यक्षम वहन तसेच वापर सुनिश्चित होईल. त्यामुळे देशाला स्वच्छ ऊर्जा संक्रमणाच्या ध्येयांकडे जाण्यास मदत होईल. पायाभूत सुविधांमधील तफावत भरून काढण्यासाठी एकात्मिक नियोजन दृष्टिकोन स्वीकारण्याच्या बाबतीत देश योग्य मार्गावर आहे. रस्ते, रेल्वे, जहाज वाहतूक आणि नागरी विमान वाहतूक यासारख्या सर्व माध्यमांमधील वाहतूक धोरणांमध्ये समन्वय साधण्यासाठी एकात्मिक वाहतूक नियोजन संस्था (आयटीपीए) स्थापन करण्याचा भारत सरकारचा अलिकडील प्रस्ताव हे याचे उत्तम उदाहरण आहे. त्याचप्रमाणे ऊर्जा क्षेत्रातही, निर्मिती, पारेषण आणि वितरण या सर्व स्तरांवर क्षमता वाढवण्यासाठी एकात्मिक नियोजन दृष्टिकोन ही काळाची गरज आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

विजय निचकवडे

# 'मानसिकते'चे दिव्यांगत्व!

आमचा स्वभावच आहे, ज्या ज्या मार्गाने जे काही मिळेल, ते ओरबडून घ्यायचं! मग शासकीय योजनांचा लाभ असो, वा एखाद्याच्या अधिकारावर गदा आणून आपला हक्क प्रस्थापित करण्याची विचित्र मानसिकता! शासकीय नोकरीमध्ये फोफावलेली ही मानसिकता आज उजागर होत आहे. शासकीय नोकरी म्हणजे पैसा, प्रतिष्ठा आणि सुरक्षितता असा सगळ्यांचा समज! पण ही सुरक्षितता जेव्हा अपात्र लोक 'कागदी' दिव्यांगत्व दाखवून लाटतात, तेव्हा व्यवस्थेचे 'आंधळेपण' चव्हाट्यावर येते! हे खऱ्या दिव्यांगांच्या जिद्द आणि हक्काला आलेले मरणच नव्हे का? पद, प्रतिष्ठा आणि पैसा कोणाला नको असतो! या तीनही गोष्टी ज्या माध्यमातून सहज मिळू शकतात, ती म्हणजे शासकीय नोकरी. आज शासकीय कार्यालयात साधी शिपायाची नोकरी सुद्धा समाजात

तोऱ्यात मिरविण्यासाठी पुरेशी आहे. काम नक्कीच कोणतेही कमीपणाचे नाही, पण त्यामुळे बदलणाऱ्या मानसिकतेवर बरेच काही अवलंबून असते. खाजगी क्षेत्रात नोकरी मिळावी म्हणून आज उलढाल करण्याची पुरेपूर तयारी दाखविली जात असेल तर शासकीय नोकरी मिळविताना कागदांची थोडीफार हेराफेरी केली तर काय फरक पडतो? ही मानसिकता बळावल्याने आज अपात्र पात्र झाले अन् खरे पात्र 'वंचित' राहत आहेत. दिव्यांगांच्या प्रमाणपत्र तपासणी मोहिमेच्या निमित्ताने शासकीय व्यवस्थेचा हा 'आंधळेपणा' पुढे येऊ लागला आणि सोबत स्वार्थी मानसिकताही!



महाराष्ट्रात २०११ च्या जनगणनेनुसार २९ लाख ६३ हजार ३९२ दिव्यांग आहेत. या दिव्यांगांची वेगवेगळ्या ७ प्रकारांत विभागणी आहे. अंध, कर्णबधिर, अस्थिव्यंग, मानसिक दुर्बल, मानसिक आजारी, इतर आणि बहुविकलांग अशा दिव्यांगांच्या शारीरिक, बौद्धिक संवेदनक्षम आणि विकासात्मक कार्यक्षमतेत वाढ करून समाजाच्या मुख्य प्रवाहात त्यांना आणण्यासाठी शासनाचे दिव्यांग कल्याण विभाग विविध योजना आणि उपक्रम राबविते. पण अशा दिव्यांगांना खरंच त्यांचे अधिकार किंवा हक्क मिळतात का? हा प्रश्नच आहे. दिव्यांग कल्याण आयुक्त तुकाराम मुंढे यांनी शासकीय नोकरी असलेल्या दिव्यांगांच्या प्रमाणपत्रांची तपासणी करण्याचे फर्मान काढले आणि दिव्यांगांचे हक्क हिरावून घेण्याचा प्रयत्न करीत असलेल्या बोगस दिव्यांगांची धांदल उडाली. जानेवारी २०२६ अखेर जवळपास ७१९ दिव्यांग प्रमाणपत्रांची पडताळणी करण्याचे उद्दिष्ट होते. ४० टक्क्यांच्या आत दिव्यांगत्व ओढून आलेले अधिकारी, कर्मचारी हे बोगस म्हणून ओळखले जाऊ लागले आणि वास्तव पुढे आले. भंडारा जिल्ह्यातही आतापर्यंत १० अधिकारी, कर्मचारी बोगस म्हणून पुढे आले.

मानसन्मानासह महिन्याला पगार देणारी नोकरी, विविध लाभ असा सर्वतोपरी उपभोग घेणारे हे बोगस दिव्यांग महाभाग शासकीय व्यवस्थेच्या डोळ्यात अंजन घालणारे आहेत. पात्र नसतानाही स्वतःला खोट्या दस्तावेजांच्या आधारे पात्र करून घेत खऱ्या दिव्यांगांचा अधिकार ओरबडणारी ही मानसिकता बरेच काही सांगून जाते. ज्यांचे हातपाय सदृढ आहेत, कान तीक्ष्ण आहेत, दृष्टी 'दिव्य' आहे अशांनी खोटे प्रमाणपत्र देऊन नोकरी बळकविणे म्हणजे दिव्यांगांच्या व्यंगत्वाचा खेळ करण्यासारखे आहे. एकीकडे दिव्यांगांच्या कल्याणासाठी स्वतंत्र मंत्रालय आमचे शासन स्थापन करते. कल्याणकारी योजना आणते आणि दुसरीकडे स्वकल्याणाची भावना बोकाळलेल्यांकडून अशा पद्धतीने त्याला हरताळ फासला जातो, हे वेदनादायी आहे. आयुक्तांच्या फतव्याने हा सावळा गोंधळ पुढे येतो आहे. पण त्यातही स्थानिक पातळीवरील अधिकारी 'एकमेका साह्य करू'च्या भूमिकेत वावरताना दिसत आहेत. ज्याने शासनाला मूर्ख बनविले, त्यालाच जर पाठीशी घालताना वेगवेगळ्या सबबी दिल्या जाणार असतील तर एखाद्या प्रामाणिक अधिकाऱ्याच्या प्रामाणिकपणाची ही टिंगल करण्यासारखे आहे. प्रमाणपत्रांची फेरतपासणी ही बोगस प्रमाणपत्रांच्या आधारे शासनाचे 'जावई' झालेल्या अनेकांसाठी अवघड जागेचे दुखणे झाले आहे. या दुखण्यावर आता खऱ्या अर्थाने इलाज करण्याची वेळ आली आहे. आज इलाज झाला नाही तर खऱ्या दिव्यांगांसोबत हा अन्याय असेल! हे करताना अशा 'ऐतखाऊ' महाभागांची मानसिकता बदलणे गरजेचे आहे. बदललेली मानसिकताच व्यवस्थेच्या आंधळेपणावर उपाय ठरू शकेल.

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

प्रा. दिलीप जोशी

# विष्णुपुराण!

विष्णुपुराण हे अठरा पुराणातील अत्यंत गोड पुराण असून ऋषी पाराशर आणि महामुनी जैमिनी यांच्यातील हा संवाद आहे. या पुराणात भारताचा इतिहास, भूगोल, भारतीय नैतिक, आध्यात्मिक शिक्षण, ज्योतिष आणि विविध कला याचे दर्शन आहे.

एकूण सहा अंश म्हणजे सहा भागांत विभाजित केलेले हे पुराण भगवान विष्णूंचे गुणगान करणारा विद्वत्प्रचुर ग्रंथ आहे.

ग्रंथाच्या प्रारंभीच मुनीश्रेष्ठ पाराशर ऋषींना त्यांचे परम् शिष्य महामुनी मैत्रेय साष्टांग दंडवत करून आपल्या काही शंका आणि प्रश्न विचारले.

**पाराशरं मुनीवरं कृतपौर्वान्हिकक्रियम् ।**
**मैत्रेयः परिप्रपच्छ प्रणिपत्याभिवाद्य च ।**

विशेष म्हणजे मैत्रेय ऋषींनी विचारलेले ज्ञान पाराशर ऋषींना आपले आजोबा वशिष्ठ महर्षी आणि महर्षी पुलस्त्य यांच्याकडून मिळाले असल्याने त्यांचे स्मरण पाराशर महामुनींना झाले.

**इति पुर्वं वसिष्ठेन पुलस्त्येन च धीमता ।**
**यद्युक्तं तत्स्मृतिं याति त्वत्प्रश्नादखिलं मम ॥**

त्या आनंदाने त्यांनी हे विष्णुपुराण मैत्रेय यांना सांगितले.

पहिल्या अंशात त्यांनी सृष्टीची उत्पत्ती, ब्रह्मांडाची रचना आणि त्या अनुषंगाने काही पौराणिक कथा सांगितल्या. दुसऱ्या अंशात पृथ्वीचे वर्णन, सप्तद्वीप, भारतवर्षाचे वर्णन, भूगोल आणि खगोल सांगितला. तिसऱ्या अंशात कालगणना, मन्वंतरादी आणि वेद धर्माचे वर्णन दिले आहे .चौथ्या अंशात सूर्यवंशी आणि चंद्रवंशी राजांची माहिती तर पाचव्यात भगवान श्रीकृष्णाचे व्यापक चरित्र दिले आहे. अखेर सहाव्या अंशात कलियुगाचे वर्णन, प्रलय वर्णन, त्रिविध ताप, ब्रह्मयोग इत्यादीचे वर्णन केले आहे.

विष्णुपुराणात प्रथम अंशात एकोणविसाव्या अध्यायात भक्त प्रल्हाद आणि त्यांचे पिता दैत्यराज हिरण्यकश्यपू यांचा संवाद चिंतनीय आहे.

दैत्यगुरू शुक्राचार्यांच्या आश्रमातून शिकून परत आल्यावर आपला पुत्र काय शिकला हे पाहण्यासाठी हिरण्यकश्यपूने पुत्र प्रल्हाद याला काही प्रश्न विचारले. त्यात राजाने आपल्या मित्रांशी, शत्रूंशी कसे वर्तन करावे? मंत्री, अमात्य, गुप्तचर इत्यादींप्रति कसा व्यवहार हवा? असे अनेक राजनैतिक प्रश्न त्याला विचारले. त्यावर प्रल्हादाचे उत्तर खूपच महत्त्वाचे आहे.

प्रल्हाद म्हणतात की, कृपया क्रोध करू नका, पण तुम्ही विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे जर दैत्यगुरू शुक्राचार्यांच्या नीतीने दिली तर ती नीती मला अजिबात मान्य नाही. जर

**सर्व भूतात्मके तात जगन्नाथ जगन्मये ।**
**परमात्मनि गोविंदे मित्रामित्रकथा कुतः ॥**

हे तात! तो जगन्नाथ सर्वव्यापी आहे तर शत्रू-मित्र आलेच कुठून?
हे सर्व अविद्येच्या प्रभावाने होत आहे.
या संवादातच सुप्रसिद्ध असा विद्येचा व्याख्या करणारा श्लोक आहे.

**तत्कर्म यत्र बन्धाय सा विद्या या विमुक्तये ।**
**आयासायापरं कर्म विद्यान्या शिल्पनैपुणम् ॥**

कर्म तेच जे माणसाला बंधमुक्त करते. विद्या तीच जी माणसाला जीवनमुक्त करते. बंधमुक्त न करणारे कर्म म्हणजे केवळ क्रियाकलाप होईल. विद्या जर जीवनमुक्त करीत नसेल तर ते केवळ नैपुण्य किंवा कौशल्य आहे. अनेक शिक्षण संस्थांचे ब्रीदवाक्य ''सा विद्या या विमुक्तये'' असते. ते याच पुराणातील आहे. भक्त प्रल्हाद आणि हिरण्यकश्यपू यांच्यातील हा संवाद खूपच सुंदर आहे. खरे तर दैवी विचार आणि दैत्य विचार यातील हा तात्त्विक वाद तेव्हाही होता जो आजपर्यंत सुरू आहे. पण विजय दैवी विचारांचाच तेव्हाही आणि आताही होणार हा दृढविश्वास हे पुराण देते.

याच पुराणातील तिसऱ्या अंशातील तिसऱ्या अध्यायात भारतवर्षाचे सुंदर वर्णन असून जगाला आम्ही किती प्राचीन आणि सभ्य आहोत हे पटवून देण्यासाठी विष्णुपुराण साहाय्यभूत आहे.

भारताचे वर्णन करताना सुप्रसिद्ध श्लोक आहे.

**उत्तरं यत् समुद्रस्य हिमाद्रेश्चैव दक्षिणम् ।**
**वर्षं तद् भारतं नाम भारती यत्र सन्ततिः ॥**

समुद्राच्या उत्तर दिशेला आणि हिमालयाच्या दक्षिण दिशेला पसरलेला सुंदर देश म्हणजे भारत असून त्यात राहणारे सर्व भारतीय हे भारतमातेची संतती आहे.

**नवयोजनसाहस्रो विस्तारोस्य महामुने ।**

भारताचा विस्तार नऊ हजार योजन असल्याचे या पुराणात स्पष्ट आहे.
भारतस्यास्य वर्षस्य नवभेदान्निशामय !
भारताचे नऊ भाग नावासह दिले आहेत ज्यात इंद्रद्वीप, कसेरू, ताम्रपर्ण इत्यादी नऊ नावे आहेत.

**अत्रापि भारतं श्रेष्ठं जंबूद्वीपे महामुने!**

जंबुद्वीपात भारत सर्वश्रेष्ठ असल्याचा उल्लेख आहे.

**धन्यास्तु ते भारत भूमिभागे !**

जे भारतात जन्मले ते धन्य आणि भाग्यवान आहेत.
''भारतं प्रथमं वर्षं'' मेरुपर्वतापासून भारत प्रथम स्थानावर असल्याचे हेच पुराण स्पष्ट करते.

**नमो ब्रह्मण्य देवाय गोब्राह्मण हिताय च ।**
**जगत् हिताय कृष्णाय गोविंदाय नमो नमः॥**

हा प्रसिद्ध विष्णुमंत्र याच पुराणातील आहे.

''ॐ नमो भगवते वासुदेवाय'' हा सिद्ध द्वादशाक्षरी मंत्र विष्णुपुराणाची देण आहे. या पुराणात कृषिशास्त्र, वाणिज्य आणि गोपालन यावर चर्चा आहे.

वास्तुरचनेत आजकाल काळाची गरज म्हणून शौचालय घरात असते. विष्णुपुराणानुसार शौचालय गावाच्या वेशीवरून जर बाण मारला तर तो ज्या अंतरावर जातो, गावकऱ्यांनी तितक्या लांब गावापासून दूर शौचासाठी जावे.

गृहस्थीचे नियम सांगताना अतिथी, गाय, वयोवृद्ध यांची सेवा, उधारी परतफेड, नीती नियम इत्यादींबाबत विष्णुपुराण मार्गदर्शन करते. एकादशीचे महत्त्व इथे आहे. समाजस्वास्थ्यासाठी विवाहाचे ब्राह्म, दैव, आर्ष, प्रजापत्य, आसुर, गांधर्व, राक्षस आणि पिशाच्च असे विविध आठ प्रकार या पुराणात आहेत. थोडक्यात, विष्णुपुराण विष्णुभक्ती, भक्ती आणि ज्ञान यांचा संगम आहे. अभ्यासकांनी विशेष अभ्यास करून भारतीय भूगोल, भारतीय संस्कृती, भारतीय विज्ञान आणि भारतीय ज्ञान परंपरा उजेडात आणावी ही माफक अपेक्षा.

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### वाहनाचा आकार आणि संख्या यावर अंकुश हवा

नागपुरातील वाहतूक कोंडी, अपुरी पार्किंग व्यवस्था, रस्त्यांवरील वाहने यंत्रणेने उचलून नेणे आणि त्यातून होणारा भ्रष्टाचार यावरील वृत्त आता नित्यातेच झाले आहे. वाढती लोकसंख्या आणि रस्त्यांवर रोज येणारी नवी वाहने याला कारणीभूत आहेच. आता नागपुरात कोणत्याही वस्तीत चक्कर मारली तर बहुतांशी रस्त्यांवर, गल्लीबोळात रात्री वाहनांची रांग दिसेल. यावरूनच समस्या किती गंभीर होत चालली आहे हे लक्षात येते. एकाच कुटुंबात अनेक दुचाकी वाहने, एकाहून अधिक चारचाकी वाहने, कुटुंब लहान असले तरी मोठ्या आकाराचे वाहन ठेवण्याची टुम या गोष्टीही समस्येला हातभार लावतात. ठिकठिकाणी रस्त्यावर, गल्लीबोळात दिवसा फिरणारी, पार्क केलेल्या मोठ्या आकाराच्या वाहनांनी तेथील रहिवासी नागरिकांना होणारा वैताग यावर काय तोडगा आहे? आता सरकारनेच यावर तोडगा म्हणून एका कुटुंबात किती वाहने असावीत, मोठ्या आकाराच्या वाहनांना काही भागात प्रतिबंध, या बाबींवर नियम करणे आवश्यक आहे अन्यथा वाहतूक समस्या दिवसेंदिवस भीषण रूप धारण करेल. अशा समस्या न्यायालयीन लढाई किंवा आदेश यांनी सुटणार नाही हे नक्की.

**राम राजे**/९४२१७७९९४५

••••

### व्यसनाधीन तरुणाई : सशक्त राष्ट्रनिर्माणात अडथळा!

दरवर्षी ४ फेब्रुवारीला जागतिक कर्करोग दिन साजरा केला जातो. या दिवसाचा मुख्य उद्देश समाजात कर्करोगाविषयी जनजागृती निर्माण करणे हा आहे. कर्करोग हा आजच्या काळातील एक अत्यंत गंभीर आणि जीवघेणा आजार आहे. जगभरात दरवर्षी लाखो लोक या आजारामुळे मृत्युमुखी पडतात, ही बाब अत्यंत चिंताजनक आहे. कर्करोगाची अनेक कारणे असली तरी व्यसन हे कर्करोगाचे एक प्रमुख कारण आहे. तंबाखू, सिगारेट, गुटखा, खैनी, हुक्का, ई-सिगारेट, दारू तसेच विविध अमली पदार्थांचे सेवन केल्यामुळे तोंडाचा, फुफ्फुसांचा, घशाचा, यकृताचा इत्यादी कर्करोग होण्याचा धोका प्रचंड वाढतो. आजची भयावह वास्तविकता अशी आहे की, तरुण वर्ग (तरुण आणि तरुणी) मोठ्या प्रमाणावर व्यसनांच्या आहारी जात आहेत. किशोरवयापासूनच मुलांना व्यसनांची सवय लागत असल्यामुळे त्याचे दुष्परिणाम लवकर आणि अधिक तीव्र स्वरूपात दिसून येतात. केवळ क्षणिक आनंदासाठी ओढलेली सिगारेट पुढे जाऊन व्यसनात रूपांतरित होते आणि आयुष्यभराचा आजार देऊन जाते, ही वास्तविकता आहे. ताणतणावातून पळ काढण्याची वृत्ती, चुकीची फॅशन, मित्रांचा दबाव, पालकांचे दुर्लक्ष तसेच समाजातील चुकीचे आदर्श ही व्यसनाधीनतेची प्रमुख कारणे आहेत. यामुळे अनेक तरुणांचे आरोग्य, शिक्षण आणि भविष्य धोक्यात येत आहे. आजचा तरुण वर्ग जर व्यसनांच्या आहारी जाऊन भरकटत असेल, तर देशाच्या भविष्याचे काय होणार? अत्यंत गंभीर असा हा प्रश्न आहे. एक पालक, शिक्षक आणि जबाबदार नागरिक म्हणून आपण किती सजग आहोत, याचे आत्मपरीक्षण प्रत्येकांनी करायला हवे. या दिवसाच्या निमित्ताने तरुणांनी व्यसनांपासून दूर राहण्याची, सकारात्मक विचारसरणी स्वीकारण्याची आणि आरोग्यदायी जीवनशैली अंगीकारण्याची शपथ घेऊन त्यानुसार कृती करायला हवी. सुदृढ तरुणाईच सशक्त राष्ट्राची खरी ताकद आहे. म्हणूनच व्यसनमुक्त तरुण आणि निरोगी समाज घडवणे ही काळाची गरज आहे.

**वर्षा आवदे**/नागपूर

••••

### निवडणुका झाल्या, आता विकासाचे बघा..

राज्यात मनपा निवडणुका पार पडल्या. काही ठिकाणी महापौरही विराजमान झालेत. निवडणुकीपुर्वी विविध राजकीय पक्षांनी आपापले जाहीरनामे जनतेसमोर ठेवले होते. आता त्या जाहीरनाम्यांची पूर्तता करण्याची वेळ आली आहे. स्वच्छ, सुंदर, स्मार्ट शहराची स्वप्ने दाखवणाऱ्यांना आता त्याचा विसर पडू नये म्हणजे झाले. नाहीतर सत्ताधारी केवळ सत्ता उपभोगतात आणि विरोधक फक्त आंदोलने करतात. यात मात्र सामान्य जनता भरडली जाते. आपल्या वॉर्डातील रस्ते, नाल्या नियमित स्वच्छ होतात का? रस्त्यांवरील पथदिवे रोज लागतात का याचे खरं तर नियमित ऑडिट होणे गरजेचे आहे. किंबहुना प्रत्येक नागरिकाचा यात सहभाग असावा.

प्रत्येक प्रभागात अशी एक तक्रारपेटी असावी जिथे सामान्य नागरिक आपली तक्रार लिहून त्यात टाकू शकेल व त्या तक्रारीची दखल घेतली जावी. अशी साधी, सरळ व्यवस्था खरंच उभारता येणार नाही का? पण कोण घेईल ती जबाबदारी त्यापेक्षा जसे आहे तसे चालू द्या, खरं तर हीच मानसिकता विकसित भारताच्या संकल्पात बाधा निर्माण करणारी आहे. आता बघूया पुढील पाच वर्षे कोण काय काम करतो ते. पण सत्ताधाऱ्यांनो आणि विरोधकांनो, एक लक्षात असू द्या, राजकारणात कुणीही अमरपट्टा घेऊन येत नाही तेव्हा पदापेक्षा सेवेचं उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवा. भारतमातेची सेवा करण्याचं भाग्य तुम्हाला लाभलंय, हे लक्षात ठेवा.

**अखिल देशपांडे**/अकोला

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९३७३४३८३५२ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





# अजितदादांच्या अस्थिकलशाचे शिवाजी प्रशालेत पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

येथील मराठा समाज सेवा मंडळ, सोलापूर संचलित छत्रपती शिवाजी प्रशालेत माजी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या आस्तिकलशाचे पूजन करण्यात आले.

बारामती वरून निघालेला अस्थीकलश सोलापुरात आल्यानंतर छत्रपती शिवाजी प्रशालेत संस्थेचे अध्यक्ष माजी महापौर मनोहर सपाटे यांच्या हस्ते त्यांचे पूजन करण्यात आले. त्यावेळेस सपाटे यांनी अजितदादांनी आतापर्यंत प्रशालेला दोन वेळा भेट दिल्याचे सांगून त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.

यावेळी सपाटे यांच्यासह उपस्थित आमचे डोळे पाणावले होते. याप्रसंगी सोलापूरच्या राष्ट्रवादीचा प्रवक्ता सुहास कदम संस्थेचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर सपाटे, खजिनदार महादेव गवळी, जनरल सेक्रेटरी महेश माने, संचालक अशोक चव्हाण, शिवदास चटके, मुकुंद जाधव,विनायकराव पाटील, नीलकंठ वाघचवरे, नागेश हावळे, सुरेश पवार, मंगेश जाधव,अलका सुरवसे, सुजाता जुगदार, मंजुषा पाटील, डॉ. नितीन मोटे, सोलापूर जिल्हा कॉलेज कर्मचारी यांच्या अध्यक्ष दत्ता भोसले, यांच्यासह शाळा व महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जामश्री रिअलटी लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : फतेहचंद दमाणी नगर, स्टेशन रोड, सोलापूर, महाराष्ट्र – 413 001 सीआयएन : L17111PN1907PLC000258
दूरध्वनी : 91 22 43152424 इमेल आयडी: jammill1907@gmail.com वेबसाइट: www.jamshri.in

**31 डिसेंबर 2025 रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ माहीच्या कालावधी करीता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाचे विवरण**

(रु. लाख )

| अ. क्र. | तपशील | संपलेली तिमाही 31.12.2025 (अलेखापरिक्षित) | 30.09.2025 (अलेखापरिक्षित) | 31.12.2024 (अलेखापरिक्षित) | संपलेली नऊ माही 31.12.2025 (अलेखापरिक्षित) | 31.12.2024 (अलेखापरिक्षित) | संपलेल वर्ष 31.03.2025 (लेखापरिक्षित) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | एकूण महसूल उत्पन्न | 210.58 | 225.36 | 223.49 | 666.47 | 696.81 | 905.46 |
| 2 | कर आणि अपवादात्मक बाबीं पूर्वीच्या अखंडित परिचलना करीता कालावधीसाठी नफा/(तोटा) | 4.78 | (3.31) | (34.10) | 16.31 | (95.25) | (136.92) |
| 3 | कर आणि अपवादात्मक बाबीं पश्च्यात अखंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) | 4.78 | (3.31) | (34.10) | 16.31 | (62.82) | (104.50) |
| 4 | कर पश्चात खंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) | (4.54) | (4.62) | (4.86) | (15.00) | (14.54) | (19.30) |
| 5 | कर पश्च्यात खंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा /(तोटा) | (4.54) | (4.62) | (4.86) | (15.00) | (14.54) | (19.30) |
| 6 | कालावधीसाठी एकूण व्यापक उत्पन्न (समावेश नफा / (तोटा) (करपश्च्यात) कालावधीसाठी आणि इतर व्यापक उत्पन ( करपश्च्यात)) | ( 0.24 | (7.93) | (38.97) | 1.31 | (77.36) | (111.64) |
| 7 | समभाग भांडवल | 698.65 | 698.65 | 698.65 | 698.65 | 698.65 | 698.65 |
| 8 | प्रति समभाग प्राप्ती प्रत्येकी रु 10/ | 10/- | 10/- | 10/- | 10/- | 10/- | 10/- |
| | अखंडित परिचलना करीता मूलभूत व सौम्यिकृत प्रति शेअर कमाई | 0.07 | (0.05) | (0.49) | 0.23 | (0.90) | (1.50)) |
| | खंडित परिचलना करीता मूलभूत व सौम्यिकृत प्रति शेअर कमाई | (0.06) | (0.07) | (0.07) | (0.21) | (0.21) | (0.28) |

टिप :अ) उक्त अलेखापरीक्षित आर्थिक निष्कर्षाचा लेखापरीक्षक समितीने आढावा घेतला आहे संचालक मंडळाने त्यांच्या फेब्रुवारी 3, 2026 रोजी घेण्यात आलेल्या सभेत त्यांना मंजूरी दिली आहे.
ब) उक्त निष्कर्ष कंपन्या (इंडियन अकाउंटिंग स्टॅंडर्डस्) नियम, 2015 सुधारीत असल्याप्रमाणे आणि अधिधिनयमाच्या इतर संबंधित तरतूदींसह वाचाव्यात कंपन्या अधिनियम, 2013 च्या कलम 133 च्या अनुषंगाने कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने अधिसूचीत केल्याप्रमाणे इंडियन अकाउंटिंग स्टॅंडर्डस् (आयएनडी) नुसार तयार करण्यातआलेलेआहेत.
क) 31 डिसेंबर 2025 रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ माहीचा आर्थिक निष्कर्षाच्या बीएसईकडे दाखल केलेल्या सविस्तर प्रारुपाचा उक्त एक उतारा आहे. संपूर्ण प्रारुप बीएसईची वेबसाइट www.bseindia.com आणि कंपनीची वेबसाइट www.jamshri.in वर उपलब्ध आहे.

तारीख: 03.02.2026
ठिकाण : सोलापूर

जामश्री रिअलटी लिमिटेड करीता
सही
राजेश दमाणी
संयुक्त व्यवस्थापकीय संचालक

# ‘वालचंद’चे सरसमकर व अवाशंक यांचा सन्मान




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

वालचंद कला व शास्त्र महाविद्यालयाचे कार्यालय अधिक्षक संतोष सरसमकर हे ३५ वर्षाच्या सेवेनंतर नियत वयोमानानुसार निवृत्त व ग्रंथालय परिचर अनिल अवाशंक यांनी ३५ वर्षाच्या सेवेनंतर स्वेच्छा निवृत्ती घेतल्यामुळे त्यांचा प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी त्यांच्या महाविद्यालयातील कार्यालयीन व ग्रंथालयातील सेवेतील कार्याबद्दल प्राचार्य डॉ. कोटी, उपप्राचार्य डॉ. एम. पी. जोशी, डॉ. आर. व्ही. हिप्परगी, अनुप म्हेत्रे, डॉ. आनंद महाजन, डॉ. सी. एस. चव्हाण, डॉ. एम. पी. शास्त्री, डॉ. ए. एस. इंजल व स्टेनो अब्रार सय्यद आदींनी मनोगत व्यक्त केले. डॉ. पद्मावती पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

## रमाई लेक पुरस्काराचे ९ फेब्रुवारीला आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

माता रमाई यांच्या जयंतीनिमित्त रमाईची लेक पुरस्काराचे आयोजन संस्थेचे संस्थापक राजाभाऊ माने यांच्या वतीने करण्यात येत आहे. त्याकरिता महाराष्ट्रातील इच्छुकांनी आपल्या प्रस्ताव रमाई सेवाभावी बहुउद्देशीय सामाजिक शिक्षण प्रसारक मंडळ यांच्याकडे सादर करावा, असे आवाहन संस्थापक राजाभाऊ माने यांनी केले आहे. सदर पुरस्काराकरिता शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, वैद्यकीय, औद्योगिक, अधिकारी वर्ग यांनी आपल्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या महिलांना राज्यस्तरीय पुरस्कार देवून गौरविण्यात येणार आहे. पुरस्कार वितरण सोहळा ९ फेब्रुवारी रोजी आयोजन करण्यात आले आहे.

## मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागातून विवाहित तरुणी बेपत्ता

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.३ फेब्रुवारी-**

मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागातून एक २६ वर्षीय विवाहिता अचानक बेपत्ता झाली असल्याची तक्रार तिच्या वडिलाने मंगळवेढा पोलीसात दिली असून पोलीस त्या तरुणीचा कसून शोध घेत आहेत. यातील बेपत्ता २६ वर्षीय विवाहितेला तिच्या सासरकडील मंडळी तिला त्रास देत असल्यामुळे सदर तरुणी ही आई वडिलाकडे ऑक्टोबर २०२५ पासून रहावयास आहे. दि.३१ जानेवारी रोजी कुटूंबीय रात्री १० वाजता जेवणखाण करुन झोपी गेले. सकाळी ती तरुणी झोपलेल्या ठिकाणी दिसून आली नाही. घरात व अन्य ठिकाणी सर्वत्र तिचा शोध घेतला मात्र ती मिळून आली नाही, त्यामुळे कुटूंबियांना खात्री पटली की ती घरातून कोणास काही न सांगता कोठेतरी निघून गेली असावी. तिचे वर्णन उंची ५.६ इंच,रंगाने गोरी,अंगात नेसणेस पिवळ्या रंगाची साडी व पिवळ्या रंगाचा ब्लाऊस,शरीर बांधा मध्यम, डोळे काळे,केस कुरळे अशा वर्णनाची तरुण कोणाच्या निदर्शनास आल्यास त्यांनी मंगळवेढा पोलीसाशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत कार्य**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (टीआरडी), मध्य रेल्वे, सोलापूर हे भारताच्या राष्ट्रपतींकरिता आणि त्यांच्या वतीने खालील कामाकरिता नामांकित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून रेल्वे ई-प्रापण वेबसाईट **www.ireps.gov.in** वर ऑनलाईन ई-निविदा मागवित आहेत: (दोन बोली प्रणाली) **ई-निविदा सूचना क्र. एसयूआर/टीडी/टी/२०२६/०२एस. कामाचे नाव:** सोलापूर विभागाच्या पारेवाडी, कुर्डूवाडी, सोलापूर, दुधनी आणि कलबूर्गी डेपोच्या ट्रॅक्शन सबस्टेशन्स (टीएसएस)ची ०२ वर्षांच्या कालावधीकरिता मॅनिंग. **अंदाजित किंमत:** ₹ १,१९,४१,९४९.९९, **बोली सुरक्षा:** ₹ २,०९,७००/-, पूर्तता कालावधी: २४ महिने, **प्रस्तावाची वैधता:** ९० दिवस. **वेबसाईटवर निविदा बंद होण्याचा दिनांक आणि वेळ:** दि. २५.०२.२०२६ रोजी १५.०० वा. EXP-03

तिकिटांसाठी UTS ॲप डाउनलोड करा

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सोलापूर विभागाच्या कलबूर्गी आणि बार्शी टाऊन स्टेशनवर एमपीएस स्टॉल करिता ई-लिलाव**

**निविदा सूचना क्र. एसयूआर-एमपीएस-२०२६-२, दिनांक: ०२.०२.२०२६. अ. क्र. १. कॅटलॉक लॉट क्र.:** एमपीएस-एसयूआर-केएलबीजी-एमपीएस-४-२५-१, **लिलाव सुरुवात, समाप्ती दिनांक आणि वेळ:** सुरुवात, १६.०२.२०२६ रोजी दु. १२.०० वा. समाप्ती - १६.०२.२०२६ रोजी दु. १२.३० वा. **अ. क्र. २. कॅटलॉक लॉट क्र.:** एमपीएस-एसयूआर-बीटीडब्ल्यू-एमपीएस-६-२४-१, **लिलाव सुरुवात, समाप्ती दिनांक आणि वेळ:** सुरुवात, १६.०२.२०२६ रोजी दु. १२.०० वा. समाप्ती - १६.०२.२०२६ रोजी दु. १२.४० वा. **स्टेशन्सचे नाव:** कलबुर्गी आणि बार्शी टाऊन स्टेशनवर एमपीएस स्टॉलचा ई-लिलाव. **पद्धत:** आयआरईपीएस ई लिलावाद्वारे (लीज मोड्यूल) ई-लिलाव. **निविदेचा कालावधी:** वार्षिक परवाना शुल्क आणि ५ वर्षे व त्यासह ४ थ्या आणि ५ व्या वर्षाकरिता १०% वाढ. वेबसाईटचा पत्ता: सर्व ई-लिलाव तपशील, संबंधित माहिती आणि दस्तऐवज मध्य रेल्वे/भारतीय रेल्वे पोर्टल **https://www.ireps.gov.in** वर उपलब्ध आहेत. सहभागींनी अर्ज करण्यापूर्वी वेबसाईटला भेट देण्याची विनंती आहे. EXP-02

तिकिटांसाठी UTS ॲप डाउनलोड करा


सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाथ प्राईड', १ ला मजला, सिव्हिल हॉस्पीटलच्या पूर्वेस, उत्तर सदर बाझार, सोलापूर, ४१३००३.

## सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर विभाग, सोलापूर

**जाहीर प्रसिध्दीकरण**

**(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२-(२) नियम ७ व ७-से वाचावे)**

**बदल अहवाल क्रमांक:-१४९०/२०२५**

ज्याअर्थी, **एन.एम. वाडीया चॅरिटेबल हॉस्पीटल, सोलापूर न्यास नोंदणी क्रमांक ई-२७ (सोलापूर)** या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेच्या सादरकर्ता विश्वस्त **श्री. शिरीष रामचंद्र गोडबोले, रा.५६०/४३, दक्षिण सदर बझार, सोलापूर** यांनी वर नमूद बदल अहवालामध्ये किरकोळ अर्ज क्रमांक १४९१/२०२५ हा अर्ज सादर करुन बदल अर्ज क्रमांक १४९०/२०२५ हा **तात्पुरत्या स्वरुपात** (Provisionally) **बदलाकरिता** सादर केलेला आहे व तो मा. धर्मादाय उप आयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर, यांनी दिनांक **१७.११.२०२५** रोजी तात्पुरत्या स्वरुपात (Provisionally) स्विकारण्यात आलेला आहे. त्याअर्थी, हितसंबंध असलेल्या सर्व संबंधीत लोकांना सदर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदर बदल अहवालास आपणास काही आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास, आपण आपली हरकत सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत मा. धर्मादाय उप आयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर यांचेसमोर दाखल करावी, अन्यथा, सदर बदल अहवालास आपली काहीही हरकत नाही, असे समजुन सदर बदल अहवाल क्रमांक १४९०/२०२५ मधील कि.अ.क्र. १४९१/२०२५ मध्ये दिनांक **१७.११.२०२५** रोजी तात्पुरत्या स्वरुपात (Provisionally) स्विकारण्यात आलेला बदल अहवाल हा अंतिम आदेश म्हणून कायम राहील याची नोंद घ्यावी.

आज **दिनांक ०२** माहे **फेब्रुवारी** सन **२०२६** रोजी माझ्या सहीनिशी व मा. धर्मादाय उप आयुक्त यांच्या शिक्यानिशी दिली.

शिक्का

**सही/-**
**अधिक्षक (न्याय)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**सोलापूर विभाग, सोलापूर**

ॲड. एच. एच. एखंडे-पाटील
अक्कलकोट

**जाहीर प्रसिध्दीकरण**

नि-१०
**सिव्हील एम. ए. नं. ०४/२०२६**

## अक्कलकोट येथील मे. सिव्हील जज्ञ ज्यु.डी. यांचे कोर्टात

१) **श्रीमती लक्ष्मी विजय जाधव**
रा. अक्कलकोट, जि. सोलापूर — **-- अर्जदार**
२) **चि. आर्यन विजय जाधव**
रा. अक्कलकोट, जि. सोलापूर
**विरुध्द**
**कोणीही नाही** — **-- सामनेवाले**

ज्या अर्थी वरील अर्जदारानी या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज नं. ०४/२०२६ हा दि. बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केला असून यातील अर्जदार क्र. १ च्या आजीसासू व अर्जदार क्र. २ ची पणजी श्रीमती लक्ष्मीबाई साहेबराव मिटकरी यांचे दि. ०९/०९/२००० रोजी निधन झाले आहे. अर्जदार हेच मयत श्रीमती लक्ष्मीबाई साहेबराव मिटकरी यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारसा प्रमाणपत्र मिळावे म्हणून यातील अर्जदारांनी मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत अथवा यातील अर्जदार हे मयत यांचे वारस असलेबाबत कोणाचे काही म्हणणे अगर हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दिनांक ०४/०३/२०२६ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे अर्जदारांना त्यांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश मे. कोर्टातर्फे देण्यात येईल.

येणेप्रमाणे जाहीर प्रसिध्दीकरण केले. ता. ०३/०२/२०२६

आज रोजी मे. कोर्टाच्या हुकुमाप्रमाणे माझ्या सहीने प्रसिध्द केले

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय**
**अक्कलकोट**

महाराष्ट्र शासन

## महाराष्ट्र राज्य हिंदी, सिंधी, गुजराती, संस्कृत, तेलुगु, बंगाली, गोरबंजारा साहित्य अकादमी

ओल्ड कस्टम हाऊस, विकास विभाग इमारत, तिसरा मजला, शहिद भगतसिंग मार्ग, मुंबई – ४००००१
Email: mhsahityaacademy@gmail.com Ph.:022 - 22672539 Website: mahasahitya.org

**पुरस्कार योजना, पुस्तक प्रकाशन, ग्रंथालय अनुदान, पत्रिका खरेदीसाठी अर्ज/प्रवेशिका मागविणेबाबत**

महाराष्ट्र राज्य हिंदी, सिंधी, गुजराती, संस्कृत, तेलुगु, बंगाली, गोरबंजारा साहित्य अकादमीतर्फे देण्यात येणारे विविध पुरस्कार, पुस्तक प्रकाशन अनुदान, ग्रंथालय अनुदान, पत्रिका खरेदी योजना यासाठी प्रवेशिका मागविण्यात येत आहेत.

महाराष्ट्र राज्यात **१५ वर्ष रहिवाशी** असणारे साहित्यकार पुरस्कार आणि पुस्तक प्रकाशन अनुदानासाठी प्रवेशिका पाठवू शकतात तसेच, महाराष्ट्र राज्यातील ग्रंथालये ग्रंथालय अनुदान आणि राज्यातील तसेच राज्याबाहेरील हिंदी पत्रिका प्रकाशित करणारे संस्था / प्रकाशक / संपादक पत्रिका खरेदी योजनेसाठी अर्ज पाठवू शकतात. विविध योजनांसाठी अर्ज / प्रवेशिका **मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य हिंदी, सिंधी, गुजराती, संस्कृत, तेलुगु, बंगाली, गोरबंजारा साहित्य अकादमी, ओल्ड कस्टम हाऊस, विकास विभाग इमारत, तिसरा मजला, शहिद भगतसिंग मार्ग, मुंबई – ४००००१ या पत्त्यावर दिनांक ०५ मार्च, २०२६ सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.** उपरोक्त योजनांच्या संबंधित अधिक माहिती, नियम, अटी–शर्ती व अर्ज **www.maharashtra.gov.in** आणि **www.mahasahitya.org** या संकेतस्थळावर **नवीनतम संदेश** या मथळ्याखाली उपलब्ध आहे.

दिनांक ०४/०२/२०२६
मुंबई

**सही/–**
**सहसंचालक तथा सदस्य सचिव**
**महाराष्ट्र राज्य हिंदी, सिंधी, गुजराती, संस्कृत, तेलुगु, बंगाली, गोरबंजारा साहित्य अकादमी**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः बावी (आ.) तालुका बार्शी व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटोसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** डि सोलापूर सब डि व ता. बार्शीपैकी मौजे बावी (आ.) येथील घरजागा ग्रामपंचायत

मिळकत नं. २०९/२ याचे क्षेत्र ८९९ चौ. फुट यांसी चतुःसिमा पुर्वस - सुरेश आगलावे, दक्षिणेस-भावकी रस्ता, पश्चिमेस - नरहरी डोईफोडे व उत्तरेस- गोविंद डोईफोडे येणेप्रमाणे वर्णनाची खुली घरजागा ही श्री. तुकाराम बळीराम आगलावे यांचे मालकीची असून सदरची जागा हक्कपत्रकी त्यांचे नांवे नोंद आहे. श्री. तुकाराम बळीराम आगलावे हे सदरची मिळकत आपला मुलगा श्री. वैभव तुकाराम आगलावे यांच्या नांवे हस्तांतरीत करुन सदर मिळकत बॅंकेस तारण देऊन त्यावर कर्ज घेऊ इच्छितात. तरी सदर मिळकतीवर कोणचेही कसलेही हक्क हितसंबंध. उदा. गहाण, दान, लीज, लीन, पोटगी, चोळी, बांगडी, टाच, बोजा, अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आमचे वकिलांना वर दिलेल्या पत्त्यावर प्रत्यक्ष भेटुन कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबीत करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील हे, सदर मिळकतीशी कोणाचाही, कसलाही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही व असल्यास त्याने तो स्वखुशीने सोडून दिलेला आहे, असे समजून सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून सदरची मिळकत आपल्या मुलाच्या नांवे खरेदीखताने अथवा बक्षीसपत्राद्वारे अथवा अन्य मार्गाने हस्तांतरीत करतील. सदरचा हस्तांतरणचा दस्त नोंदणीकृत झाल्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत आल्यास ती आमचे अशिलांच्या हक्काधिकारांवर बंधनकारक राहणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये, म्हणून ही खरेदीपूर्व हस्तांतरणपूर्व जाहीर नोटीस दिली असे. कळावे.

दिनांक - ०३/०२/२०२६

**सही/-**
**ॲड. प्रवीण परशुराम करंजकर**
**पाटील प्लॉट, कर्मवीर नगर, बार्शी**
**मो. नं. ९८२२०६५६६१**

SHRI MAHAVIR URBAN CO-OP BANK LTD. SOLAPUR
॥ धनवृद्धि समृद्धि ॥

## श्री महावीर अर्बन को-ऑप बॅंक लि, सोलापूर

मुख्य कार्यालय : ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२
फोन नं-०२१७-२६२२९४४/२६२२९३३

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६९ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार स्थावर मालमत्तेचे**

**फेरजाहीर लिलाव व विक्री नोटीस**

ज्या अर्थी सही करणार. विशेष वसुली व विक्री अधिकारी, श्री महावीर अर्बन को-ऑप बॅंक ही. सोलापूर हि संस्था महाराष्ट्र कायदा १९६१ अन्वये नोंदणीकृत संस्था असून, त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार दिनाक १८/०५/२०२२ रोजी मागणी नोटीस कर्जदार लक्ष्मीरमण असोसिएटस प्रोप्रा बालकिसन विष्णुदास मंत्री रा. ६. महावीर मार्केट, फलटण गल्ली, सोलापूर व जामीनदार १. लक्ष्मीकांत विष्णुदास मंत्री रा.६ महावीर मार्केट, फलटण गल्ली, सोलापूर २. प्रकाश विष्णुदास मंत्री रा.६. महावीर मार्केट, फलटण गल्ली, सोलापूर पांना पाठवून रक्कम रु.२,१७,४१,७२३/- तसेच मुद्दल रक्कम रुपये १,५६,०१,६७९/- यावर दिनांक ०१/१०/२०२१ पासून पुढे ही सर्व रक्कम परतफेड होईपर्यंत द.सा.द.शे. १४% दराने होणाऱ्या व्याजाची रक्कमेची मागणी केलेली होती व आहे. सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून थकबाकीदार यांनी सदर थकीत रक्कम जमा करणपास कसूर केलेला आहे. तरी बॅंकने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार पुढील कारवाई करत, सदर स्थावर मिळकतीचे कायदेशीररित्या ताबा घेतलेले आहे. तरी सदर वर नमूद धकीत कर्ज रक्कमेपोटी बॅंकेने या खाली नमूद केलेले स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव **जेथे आहेत व जैसे आहेत** अशा त्या त्या मिळकती त्या त्या परीस्थिती मध्ये विक्री करणार आहेत.

**जाहिर लिलाव व विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेचे वर्णन पुढील प्रमाणे असे**

| अ. नं. | कर्जदार नांव व पत्ता | डि.सब डि. सोलापुर तालुका दक्षिण सोलापूर येथील मौजे मुस्ती येथील बालकिसन विष्णुदास मंत्री यांच्या मालकी वहिवाटीच्या खालील मिळकती | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **मिळकतीचे वर्णन** | **पूर्वेस** | **दक्षिणेस** | **पश्चिमेस** | **उत्तरेस** | **राखीव किमंत** |
| १ | कर्जदार लक्ष्मीरमण असोसिएटस प्रोप्रा बालकिसन विष्णुदास मंत्री | गट नं.२२५/१. क्षेत्र ३४.00 हे आर. चौ. मी. आकार 0.१३ | उपलब्ध नाही. | | | | रु. २,५५,000/- |
| | | २२५/४, क्षेत्र 0.८२,00 हे आर. चौ. मी. आकार 0.३५ | गट नं. २२७ ची शेतजमीन | गट नं. २२३ पैकी ची शेतजमीन | गट नं. २२५ पैकी ची शेतजमीन | गट नं. २२६ पैकी ची शेतजमीन | रु. ६.१५,000/- |
| | | २२५/५, क्षेत्र 0.८२.00 हे आर. चौ.मी. आकार 0.३५ | गट. नं. २२५/६ ची शेतजमीन | गट नं. २२३ पैकी ची शेतजमीन | गट नं. २२५/४ पैकी ची शेतजमीन | गट नं. २२५/२ पैकी ची शेतजमीन | रु. ६.१५,000/- |
| | | २२५/६ क्षेत्र 0.८२,00 हे. आर. चौ.मी. आकार 0.३५ | गट नं. २२७ ची शेतजमीन | गट नं. २२३ पैकी ची शेतजमीन | गट नं. २२५/५ पैकी ची शेतजमीन | गट नं. २२५/२ पैकी ची शेतजमीन | रु. ६.१५,000/- |
| | लिलावाचे ठिकाण तारीख व वेळ | श्री महावीर अर्बन को-ऑप बॅंक ली. सोलापूर<br>६०/६१ पूर्व मंगळवार पेठ सोलापूर-४१३००२<br>**बंद लिफाफ्यात निविदा सादर करणेचे दिनांक ०७/०३/२०२६**<br>वेळ - सकाळी ११ ते दुपारी ५ वाजेपर्यंत<br>**निविदा उघडण्याची तारीख व वेळ दिनांक ०९/०३/२०२६ सायं. ५:३० वा.** | | | | | |
| | ३१.०३.२०२५ अखेर येणेबाकी | रु.३.७१.७४.५६६/- व त्यापुढे होणारे व्याज, दंड व्याज सरचार्ज व इतर खर्च | | | | | |

**टिप-**
१. लिलावात भाग घेणार यांनी राखीव किमतीच्या १०% बयाणा रक्कम भरणा केल्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही. बयाणा रक्कम दि.०६/०३/२०२६ दुपारी ३.०० वाजेपर्यंत डिमांड ड्राफ्ट/आर.टी.जी.एस. अथवा पे ऑर्डर ने भरणा करावी.
२. लिलावाच्या अटी व शर्ती लिलावाच्या दिवशी लिलावापूर्वी वाचून दाखविण्यात येईल आणि त्या बॅंकेच्या सूचना पत्रकामध्ये दिले जातील.
३. लिलावापूर्वी थकबाकीदाराने रक्कम भरल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.
४. लिलाव मिळकतीसंबंधी अधिक माहिती पाहिजे असल्यास बॅंकेच्या प्रधान कार्यालयात संपर्क साधावा.

**दिनांक - ०२/०२/२०२६**
**स्थळ - सोलापूर**

**सही/-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बॅंक ली., सोलापूर**

## मे. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था अक्कलकोट, यांचे समोर

**यांचे कार्यालय: श्री स्वामी समर्थ सहकारी लि (अवसायनात), ए वन चौक, स्टेशन रोड अक्कलकोट**

जा. क्र./उप/१२६/२००५ — दि. ०३.०२.२०२६

**लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापुर** — **अर्जदार**
**विरूध्द**
**(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद)** — **जाब देणार**

| अ. क्र. | दावा क्र. | दावा रक्कम | प्रतिवादी नंबर | प्रतिवादीचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ०४/२०२५ | १,७४,६६६.५०/- | २ | २. श्री. भोसले अमोल अरुण रा.मु.पो. म.न.पा. मुलींची मराठी शाळा क्र. ०५ पांढरे वस्ती जि. सोलापुर |
| २ | ०८/२०२५ | ३४,५३७/- | १ | १. सौ. राठोड कविता रमेश रा.मु.पो. कडबगांव डीग्गेवाडी सेवालालनगर नागणसूर ता. अक्कलकोट जि. सोलापुर |
| | | | २ | २. सौ. राठोड अनुसया अशोक रा.मु. पो. वसंतराव तांडा स्टेशन रोड ता. अक्कलकोट जि. सोलापुर |
| ३ | ०१/२०२५ | ४७,७४९/- | ३ | ३. श्री. व्हनखचे सुरेखा भागण्णा रा.मु.पो. बुधवार पेठ अक्कलकोट ता. अक्कलकोट जि. सोलापुर |
| ४ | ३३/२०२५ | १,५८,३५७/- | १ | १. सौ. पुजा महांतेश मंथे रा.मु.पो. ग्रामपंचायत शेजारी हत्तीकणबस ता अक्कलकोट जि. सोलापुर |
| | | | २ | २. श्री. शेख जैनोद्दिन अब्बासअली रा.मु.पो. निमगांव ता. अक्कलकोट जि. सोलापुर |
| ५ | ३०/२०२५ | ६०,४२७/- | १ | १. सौ. पुष्पाबाई लक्ष्मण चौगुले रा.मु.पो. शिरवळ ता. अक्कलकोट जि. सोलापुर |
| | | | ३ | ३. सौ. सुनिता रतनलाल खोबरे रा.मु.पो. शिरवळ ता. अक्कलकोट जि. सोलापुर |
| ६ | २९/२०२५ | ४,३९,५१९/- | १ | १. सौ. इंगळे वनिता महादेव रा. मु. पो. माढा कॉलनी ४१ अक्कलकोट ता. अक्कलकोट जि. सोलापुर |
| | | | ३ | ३. श्री. चौधरी महांतप्पा मल्लप्पा रा. मु. पो. कल्लप्पावाडी ता. अक्कलकोट जि. सोलापुर |
| ७ | २०/२०२५ | १,२८,५४४.५०/- | १ | १. श्री. म्हैसलगीकर रविकांत गंगाप्पा रा. मु. पो. म्हैसलगे ता. अक्कलकोट जि. सोलापुर |
| ८ | १७/२०२५ | ७५,४०८.५०/- | १ | १. श्री. कामटे सुनिल तुकाराम व श्री पवार अंदप्पा बाबुराव रा. मु. पो. पानमंगरूळ ता. अक्कलकोट जि. सोलापुर |
| | | | २ | २. श्री. पाटील मनोहर संजय रा. मु. पो. पानमंगरूळ ता. अक्कलकोट जि. सोलापुर |
| | | | ३ | ३. श्री. पवार लक्ष्मीकांत खामु रा.मु. पो. पानमंगरूळ ता. अक्कलकोट जि. सोलापुर |
| ९ | १०/२०२५ | १,५८,३२०.५०/- | २ | २. श्री. मुजावर आसीफ बाबासाहेब रा.मु.पो. करजगी ता. अक्कलकोट जि. सोलापुर |
| १० | ०३/२०२५ | ३,२६,२९०.५०/- | १ | १. श्री. सुतार फयाज नसीरोद्दीन रा.मु. पो. प्राथमीक शाळा दुधनी ता. अक्कलकोट जि. सोलापुर |
| ११ | १६/२०२५ | १,४०,०५५/- | १ | १. सौ. देवर पुष्पा प्रेम रा.मु. पो. हन्नूर गल्ली अक्कलकोट ता. अक्कलकोट जि. सोलापुर |
| | | | २ | २. श्री. वाघमोडे राजु श्रीशैल रा.मु.पो. समर्थ नगर अक्कलकोट ता. अक्कलकोट जि. सोलापुर |
| १२ | २५/२०२५ | १५,७०४/- | १ | १. श्री. पवार बसवलिंग अंदप्पा व श्री पवार अंदप्पा बाबुराव रा. मु. पो. पानमंगरूळ ता. अक्कलकोट जि. सोलापुर |
| | | | २ | २. श्री. पाटील मनोहर संजय रा. मु. पो. पानमंगरूळ ता. अक्कलकोट जि. सोलापुर |
| | | | ३ | ३. श्री. पवार लक्ष्मीकांत खामू रा. मु. पो. पानमंगरूळ ता अक्कलकोट जि. सोलापुर |
| १३ | १२/२०२५ | १,५२,०२९/- | ३ | ३. श्री. मंगरूळे राम नरसप्पा रा.मु. पो. कालिका नगर अक्कलकोट ता. अक्कलकोट जि. सोलापुर |
| १४ | ०७/२०२५ | ५,५१,५९५/- | २ | २. श्री. हुलमनी सिध्दाराम नागप्पा रा.मु.पो. सिध्दरामेश्वर प्रशाला तोळनूर ता. अक्कलकोट जि. सोलापुर |
| | | | ३ | ३. श्री. भोसले अशोक जगन्नाथ रा.मु.पो. सिध्द्धरामेश्वर प्रशाला तोळनूर ता. अक्कलकोट जि. सोलापुर |
| १५ | १५/२०२५ | ३,९४,५७६/- | १ | १. श्री. माढेकर रविराज वैजनाथ रा.मु.पो. १०८ भुषण नगर वांगी रोड ता.उ. सोलापूर जि. सोलापुर |
| | | | २ | २. श्री. कोळी देविदास बसप्पा रा.मु.पो. ४६ माने गल्ली कुमठे ता.उ. सोलापूर जि. सोलापुर |
| १६ | ०६/२०२५ | ३,१८,७०१/- | ३ | ३. श्री. पाटील शिवलिंगप्पा अशोक रा.मु. पो. मैंदर्गी ता. अक्कलकोट जि. सोलापुर |
| १७ | २८/२०२५ | ८२,०९३/- | १ | १. श्री. विभुते गौरीशंकर शिवशरणप्पा रा.मु. पो. नागोरे ता. अक्कलकोट जि. सोलापुर ४१३२१७ |

यात वादी पतसंस्था यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या प्रतिवादी यांचे पत्ते उपलब्ध होत नसल्यामुळे/पत्तावर आढळुन येत नसल्याने /अपुरा पत्ता असल्याने सदरचे जाहीर समन्स देणेत येत आहे.

प्रतिवादी यांना जाहीर समन्सद्वारे कळविणे येते की, उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडणेसाठी स्वतः जातीने अथवा अकिलामार्फत दिनांकः-११/०२/२०२६ रोजी दुपारी १२.०० वा. कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.

प्रतिवादी यांनी तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास त्यांच्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व पुढील योग्य तो निर्णय केला जाईल.

आज दि.०३/०२/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

**स्थळ - अक्कलकोट जि. सोलापुर**
**दि. - ०३/०२/२०२६**

**सही/-**
**(श्री. आर. आर. ठोंबरे)**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था, अक्कलकोट**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# विजयासाठी खेळणार भारतीय युवा

## आज अफगाणिस्तानविरुद्ध सामना ● अभिज्ञान कुंडू, वैभव सूर्यवंशीकडे लक्ष ● १९ वर्षांखालील विश्वचषक




**हरारे, ३ फेब्रुवारी**

आतापर्यंत खेळाच्या प्रत्येक विभागात चांगली कामगिरी केल्यानंतर आत्मविश्वासाने भरलेला भारतीय संघ बुधवारी येथे होणाऱ्या आयसीसी अंडर-१९ विश्वचषक उपांत्य फेरीत अफगाणिस्तानविरुद्ध विजयासाठी प्रबळ दावेदार म्हणून सुरुवात करेल.

भारत या स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात यशस्वी संघ आहे. त्यांनी पाच वेळा (२०००, २००८, २०१२, २०१८, २०२२) विजेतेपद जिंकले आहे. त्यांच्यानंतर ऑस्ट्रेलियाचा क्रमांक लागतो. त्यांनी चार वेळा चषक जिंकला आहे. भारत बुधवारी विक्रमी सहाव्यांदा विजेतेपद जिंकण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे जाण्याचा प्रयत्न करेल.

भारताने आतापर्यंत स्पर्धेत चमकदार कामगिरी केली आहे. त्यांनी त्यांचे पाचही सामने सहज जिंकले आहेत, ज्यात सुपर सिक्स टप्प्यात कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानवर ५८ धावांनी विजय मिळवला आहे.

तथापि, भारतीय संघ अफगाणिस्तानला कमी लेखण्याची चूक करणार नाही. अफगाणिस्ताननेही स्पर्धेत चांगली कामगिरी केली आहे, त्यांनी त्यांचे पाचपैकी चार सामने जिंकले आहेत. त्यांचा एकमेव पराभव श्रीलंकेविरुद्ध झाला. तथापि, खेळाडूंच्या फॉर्म आणि खेळाच्या सर्व पैलूंमध्ये त्यांच्या कामगिरीमुळे अफगाणिस्तानविरुद्ध भारताचा वरचष्मा असल्याचे दिसून येते.

**यष्टिरक्षक-फलंदाज**

अभिज्ञान कुंडूने फलंदाजीने अपवादात्मक कामगिरी केली आहे. डावखुरा फलंदाज आतापर्यंत पाच सामन्यांमध्ये १९९ धावा केल्या आहेत, ज्यात दोन अर्धशतकांचा समावेश आहे. मोठे फटके मारण्यात पटाईत असलेला सलामीवीर वैभव सूर्यवंशी (पाच सामन्यांमध्ये १९६ धावा, ज्यामध्ये दोन अर्धशतकांचा समावेश आहे), देखील चांगल्या फॉर्ममध्ये आहे, परंतु संघ व्यवस्थापन त्याला त्याच्या अर्धशतकांचे शतकात रूपांतर करावे अशी इच्छा करेल.

विहान मल्होत्रा (पाच सामन्यांमध्ये १७२ धावा) हा आणखी एक भारतीय फलंदाज आहे. त्याने गट टप्प्यात झिम्बाब्वेविरुद्ध शतक (नाबाद १०९) झळकावले. कर्णधार आयुष म्हात्रेने त्याच्या ऑफ-ब्रेक गोलंदाजीने पाच सामन्यांमध्ये सहा बळी घेतले आहेत, परंतु त्याच्या फलंदाजीत सुधारणा करण्याची संधी आहे. त्याने पाच सामन्यांमध्ये फक्त ९९ धावा केल्या आहेत. त्याची सर्वोच्च धावसंख्या ५३ आहे.

सलामीवीर आरोन जॉर्जचा फॉर्म देखील भारतासाठी चिंतेचा विषय आहे, कारण उजव्या हाताचा फलंदाज तीन डावात फक्त ४६ धावा करू शकला आहे.

भारतीय गोलंदाजीचे नेतृत्व उजव्या हाताचे वेगवान गोलंदाज हेनिल पटेल आणि आरएस अम्ब्रिस करत आहेत. या दोन्ही वेगवान गोलंदाजांना फिरकीपटू खिलन पटेलकडून चांगली साथ मिळाली आहे. त्याने पाच सामन्यांमध्ये आठ बळी घेतले आहेत. (वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**भारत विरुद्ध अफगाणिस्तान**
**स्थळ** : हरारे स्पोर्ट्स क्लब, हरारे
**वेळ** : दुपारी १ वाजपापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्स नेटवर्कवर



## समर्थ गवळी, समृद्धी लोंढे प्रथम

### जिल्हा पॉवरलिफ्टींग स्पर्धेत कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

जिल्हा पॉवरलिफ्टींग स्पर्धेत सबज्यनियर गटात समर्थ गवळी व समृद्दी लोंढे यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. स्पर्धेचे उद्घाटन सोलापूर जिल्हा शिवसेना उबाठा पक्षाचे प्रमुख अजय दासरी यांनी केले. यावेळी सोलापूर जिल्हा पॉवर लिफ्टिंग असोसिएशन सचिव प्रा. संतोष गवळी, नगरसेवक मेघनाथ येमुल, सिद्धेश्वर कमटम, उद्योगपती मल्लिकार्जुन कमटम, सदाशिव उडता उपस्थित होते.

यावेळी सूर्या जिमचे मालक राजमहेंद्र येमुल यांची पोलंड येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय बेंच प्रेस स्पर्धेसाठी निवड झाली असल्याने त्यांचा सत्कार करण्यात आला. या स्पर्धा पार पाडण्यासाठी सूर्या जीम चे कोच लखन येमूल, विलास बेलदार, तौफिक इनामदार,तनवीर मियाडे, वैभवी माने,रमेश दोडमणी यांनी परिश्रम घेतले.

**विविध गटाचे अंतिम निकाल (प्रथम तीन )**

**सब ज्युनियर मुले** : ५३ किलो : समर्थ गवळी, आर्यन पाटेकर. ५९ किलो : समर्थ उपाध्ये, अनंत जाटला, करण पवार. ६६ किलो : रफिक जमादार, नवीन बेत, तुषार मुद्देबिहाळ. ७४ किलो : रुपेश यादव, योगेश बंडगर, समर्थ कोळेकर. **मुली** : समृद्धी लोंढे. ५७ किलो : श्रावणी अवताडे. ६३ किलोः मनस्वी वाघमारे.

**ज्युनिअर मुले** : ५३ किलो : बसवराज थम. ५९ किलो : चैतन्य पालकर, रोहित कोंडाबत्तीन. ७४ किलो : समाधान पाटील, मनोज बत्तूल, रमेश दोडमणी. ८३ किलो : सुमित जाधव, श्रीनिवास चिमणी . ९३ किलो : चेतन चव्हाण, शहाणूर्ण दाब, करण राठोड. **मुली** : ऋतुजा पेंटी. ६९ किलो : साक्षी आहेरवाडी ५७ किलो : सायली गाढवे.

**सीनियर : पुरुष** : ५९ किलो : बिरू होनमने, नंदकिशोर साधू. ७४ किलो : रवीकुमार संगम, शहाबाद नदाफ. नयन जगताप. ९३ किलो : चेतन चव्हाण, लखन येमुल, महबूब शेख. **महिला** : ४७ किलो : साक्षी सुरा. ५७ किलो : लक्ष्मी गुंडेटी, संगीता जाधव. ६३ किलो : पूजा गट्टू.

## महत्त्वाचे

### नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत खेळणार गुकेश

**ओस्लो** : विद्यमान जागतिक विजेता भारतीय ग्रॅण्डमास्टर डी गुकेश मे महिन्यात नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत सहभागी होणार आहे. त्यामध्ये जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांकाचा आणि गतविजेता मॅग्नस कार्लसनसह अनेक स्टार खेळाडू सहभागी होतील. २५ मे ते ५ जून दरम्यान होणाऱ्या या स्पर्धेत गुकेशने आपला सहभाग निश्चित केला आहे. ही जगातील सर्वात कठीण बुद्धिबळ स्पर्धांपैकी एक असेल.



ही स्पर्धा स्टॅव्हेंजरमधील त्याच्या पारंपरिक ठिकाणाहून ओस्लो येथे हलवण्याची तयारी आहे. गेल्या वर्षी ओपन प्रकारात तिसऱ्या क्रमांकावर राहिलेला भारतीय खेळाडू गुकेश खेळाच्या इतिहासातील सर्वात तरुण विश्वविजेता म्हणून ओस्लो येथे पोहोचेल. गुकेश म्हणाला, नॉर्वे बुद्धिबळात पुन्हा सहभागी होण्यास मला खूप आनंद होत आहे. नेहमीप्रमाणे, मी खूप मजबूत खेळाडूंविरुद्ध स्पर्धा करेन आणि सर्व रोमांचक खेळांची मी उत्सुकतेने वाट पाहत आहे. गुकेशने २०२४ मध्ये कँडिडेट्स स्पर्धा जिंकली आणि त्यानंतर फक्त १८ वर्षांच्या वयात तत्कालीन विश्वविजेत्या डिंग लिरेनला हरवून जागतिक विजेतेपद मिळवले. गुकेशने त्याच्या कारकीर्दीत अनेक टप्पे गाठले आहेत, ज्यात २७५० रेटिंग पॉईंट्स ओलांडणारा सर्वात तरुण खेळाडू आणि १२ व्या वर्षी ग्रॅण्डमास्टरचा किताब मिळवणे यांचा समावेश आहे. तो बुद्धिबळ इतिहासातील तिसरा सर्वात तरुण ग्रॅण्डमास्टर आहे. आणखी एक भारतीय खेळाडू आर. प्रज्ञानंद यानेही या प्रतिष्ठित स्पर्धेत आपला सहभाग निश्चित केला आहे. भारतीय ग्रॅण्डमास्टर आणि विश्वचषक विजेती दिव्या देशमुख नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत महिला गटात पदार्पण करणार आहे.

### विश्वचषकाच्या तिकीट विक्रीच्या तिसऱ्या टप्प्याची घोषणा

**मुंबई** : उद्घाटन सामन्याची उलट गणती सुरू होताच, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक २०२६ च्या तिकीट विक्रीच्या तिसऱ्या टप्प्याची घोषणा केली आहे. बीसीसीआय आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (आयसीसी) सोबत काम करत आहे जेणेकरून जागतिक अजिंक्यपद स्पर्धेचे प्रमाण आणि दर्जा प्रतिबिंबित करणारी स्पर्धा आयोजित करता येईल. पहिला टप्पा ११ डिसेंबर २०२५ रोजी आणि दुसरा टप्पा १४ जानेवारी २०२६ रोजी सुरू झाला.

### पीसीबीवर कडक कारवाई करणार प्रसारक

**कराची** : टी-२० विश्वचषकात भारताविरुद्धच्या गट टप्प्यातील सामन्यात सहभागी न होण्याचा पाकिस्तानचा निर्णय महागात पडू शकतो. आयसीसी आता पाकिस्तानवर कडक कारवाई करण्याची तयारी करत आहे आणि जागतिक क्रिकेट संघटनेने पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला (पीसीबी) इशारा दिला आहे. आयसीसीने पीसीबीला कळवले आहे की जर पाकिस्तान संघ १५ फेब्रुवारी रोजी भारताविरुद्ध सामना खेळला नाही, तर टी-२० विश्वचषकाचे अधिकृत प्रसारक जिओस्टार त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करू शकते. पाकिस्तानने त्यांच्या सरकारच्या सूचनेनुसार कोलंबोमध्ये भारताविरुद्धच्या सामन्यावर बहिष्कार टाकण्याची घोषणा केली आहे. तथापि, त्यांनी अद्याप आयसीसीला अधिकृतपणे कारण उघड केलेले नाही. वृत्तसंस्थेनुसार, आयसीसी पाकिस्तानचे वार्षिक उत्पन्न रोखण्याची दाट शक्यता आहे, जे अंदाजे ३५ दशलक्ष आहे. हे पैसे प्रसारकाला झालेल्या नुकसानाची भरपाई करण्यासाठी वापरले जातील. पीसीबीच्या एका सूत्राने सांगितले की, जर पाकिस्तानने भारताविरुद्ध खेळण्यास नकार दिला तर त्यांना केवळ आर्थिक दंडच नाही तर प्रसारकांकडून खटला देखील सहन करावा लागेल आणि आयसीसी वाद निवारण समिती (डीआरसी) कडे जाण्याचे त्यांचे सर्व प्रयत्न अयशस्वी होण्याची शक्यता आहे.

### माजी क्रिकेटपटू टोनी पिगॉट यांचे निधन

**लंडन** : इंग्लंडचे माजी क्रिकेटपटू टोनी पिगॉट यांचे वयाच्या ६७ व्या वर्षी निधन झाले आहे. मैदानावर आणि मैदानाबाहेरही आपल्या कामगिरीने ठसा उमटवणाऱ्या पिगॉट यांच्या निधनामुळे क्रिकेटप्रेमींमध्ये शोककळा पसरली आहे.



टोनी पिगॉट यांनी अवघ्या २० व्या वर्षी १९७८ साली ससेक्सकडून प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. पदार्पणाच्याच सामन्यात त्यांनी होव्ह येथे सरेविरुद्ध खेळताना हॅटट्रिक घेत आपल्या कारकीर्दीची सुरुवात लक्षवेधी केली होती. सातत्य, जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर त्यांनी कौंटी क्रिकेटमध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. त्यांची आंतरराष्ट्रीय कारकीर्द अल्प असली तरी ती अत्यंत संस्मरणीय ठरली. १९८३-८४ दरम्यान न्यूझीलंड दौऱ्यावर इंग्लंड संघाला दुखापतींचा फटका बसला असताना, क्लब क्रिकेट खेळत असलेल्या पिगॉट यांना कसोटी संघात संधी मिळाली. हा त्यांचा एकमेव कसोटी सामना ठरला. या सामन्यासाठी त्यांनी स्वतःचे लग्न पुढे ढकलले होते.

## भारताला विश्वचषकात हरवणे कठीण : क्लिंगर

**बडोदा, ३ फेब्रुवारी**

न्यूझीलंडविरुद्धच्या अलिकडच्या मालिकेतील भारताच्या कामगिरीवरून, ७ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या टी-२० विश्वचषकात गतविजेत्या संघाला पराभूत करणे खूप कठीण आहे, असे मत माजी ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू आणि आता प्रशिक्षक मायकेल क्लिंगरने मांडले.

क्लिंगरने वृत्तसंस्थेला सांगितले की, भारत ज्या फॉर्ममध्ये आहे आणि मी अलिकडेच न्यूझीलंडविरुद्ध जे पाहिले, त्यामुळे भारताला हरवणे खूप कठीण होईल. अभिषेक शर्माचा उदय हा टॉप ऑर्डरमध्ये भारताच्या आक्रमक दृष्टिकोनाचे एक प्रमुख वैशिष्ट्य आहे. ऑस्ट्रेलियासाठी १८२ प्रथम श्रेणी सामने आणि तीन टी-२० सामने खेळणारा क्लिंगर म्हणाला, अभिषेक शर्मा माझा नवीन आवडता खेळाडू आहे. मी काही काळापासून त्याच्यावर लक्ष ठेवून आहे. आयपीएलमध्ये ट्रॅव्हिस हेडसोबत डावाची सुरुवात करत आहे आणि आता आंतरराष्ट्रीय स्तरावरही तो खेळत आहे, तो निर्भय आहे आणि त्याला खेळताना पाहणे खूप छान वाटते. भारताचा निर्भय दृष्टिकोन अभिषेक आणि इशान किशन यांनी दाखवून दिला, ज्यांनी न्यूझीलंडच्या गोलंदाजांवर सातत्याने दबाव आणला. क्लिंगर म्हणाला, इशान किशनने आपला फॉर्म परत मिळवला आहे आणि तो निश्चितच विश्वचषकात अकरामध्ये स्थान मिळविण्याच्या शर्यतीत आहे. क्लिंगरने इशारा दिला की भारताला त्यांच्या पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांकडून कठीण स्पर्धेचा सामना करावा लागेल. तो म्हणाला, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका हे मजबूत संघ आहेत. (वृत्तसंस्था)

## चाचण्यांशिवाय रायडर्सना ना-हरकत प्रमाणपत्र

**नवी दिल्ली, ३ फेब्रुवारी**

भारतीय घोडेस्वार महासंघ (ईएफआय) ने कोणत्याही निवड चाचण्यांशिवाय आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी चार रायडर्सना ना हरकत प्रमाणपत्रे (एनओसी) जारी केल्याबद्दल चौकशी सुरू केली आहे, ज्यामुळे हितसंबंधांच्या संघर्षाची चिंता निर्माण झाली आहे.

अशी कागदपत्रे उपलब्ध आहेत जी ईएफआयने २ जानेवारी २०२६ रोजी एनओसी जारी केले होते, ज्यामध्ये ६१ व्या घोडेस्वार दलाच्या चार अधिकाऱ्यांना सक्रिय घोडेस्वार खेळाडू म्हणून प्रमाणित केले होते आणि त्यांना एफईआयच्या वतीने युरोपमधील आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भाग घेण्याची परवानगी देण्यात आली होती. परदेशात स्पर्धांमध्ये भाग घेण्याची परवानगी मिळालेल्या रायडर्समध्ये लेफ्टनंट कर्नल डी. अपूर्वा, मेजर अनंत राज पुरोहित, मेजर यशदीप अहलावत आणि कॅप्टन अनंत कुमार यांचा समावेश आहे. ईएफआयचे उपाध्यक्ष (तांत्रिक) आणि कार्यवाहक अध्यक्ष कर्नल जगत सिंग (निवृत्त) यांनी एनओसीवर स्वाक्षरी केली, ज्यामध्ये असे म्हटले आहे की युरोपमधील आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारतीय संघांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कोणत्याही भारतीय खेळाडू किंवा अधिकाऱ्याला महासंघाचा कोणताही आक्षेप नाही.

ईएफआयचे सरचिटणीस कर्नल जयवीर सिंग यांच्या मते, ईएफआयकडे ११ ऑक्टोबर २०२३ रोजीचा मसुदा निवड निकष असूनही, कोणत्याही चाचण्या किंवा पारदर्शक निवड प्रक्रियेशिवाय ही मान्यता देण्यात आली.

या प्रकरणात मेजर यशदीप अहलावत यांचा समावेश केल्याने प्रकरणे आणखी गुंतागुंतीची झाली आहेत. ते ईएफआय कार्यकारी समितीचे सदस्य मेजर जनरल (निवृत्त) दीप अहलावत यांचे पुत्र आहेत, ज्यामुळे हितसंबंधांच्या संघर्षाचे आरोप झाले आहेत.

कर्नल जयवीर सिंग यांनी सांगितले की, चाचण्या न घेता आणि निर्धारित निवड निकषांचे पालन न करता आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी एनओसी जारी करणे पूर्णपणे चुकीचे आहे. यामुळे व्यवस्थेत पक्षपातीपणाचे आरोप होण्याचा धोका वाढतो आणि फेडरेशनच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होतात. (वृत्तसंस्था)



## ज्ञानदीप व ईगल स्पोर्टस्‌ला विजेतेपद

### क्रीडा भारतीच्या कबड्डी स्पर्धा

**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

क्रीडा भारतीच्या सराव कबड्डी सामन्यात १४ वर्षांखालील गटात ज्ञानदीप मंगळवेढा व १७ वर्षांखालील गटात ईगल स्पोर्टस्‌ अक्कलकोटने विजेतेपद पटकाविले.

शिंदे चौक नवी पेठेतील शिवस्मारक मैदानावर कबड्डी खेळाचा प्रसार प्रचार होण्यासाठी क्रीडा भारतीतर्फे १०० कबड्डी सामने व्हावेत या उपक्रमअंतर्गत हे सामने आयोजित केले होते. याचे उद्घाटन सोलापूर जिल्हा कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष मरगू जाधव यांच्या हस्ते झाले. यात १४ वर्षांखालील गटात ११ संघ व १७ वर्षांखालील गटात १० संघ सहभाग झाले होते. बक्षीस वितरण क्रीडा भारतीचे अध्यक्ष डॉ. विलास हरपाळे यांच्या हस्ते झाले. यावेळी उपाध्यक्ष अरुण उपाध्ये, जिल्हा मंत्री राजेश कळमणकर, शहराध्यक्ष सुधीर देव आदी उपस्थित होते. प्रथम तीन संघांना ट्रॉफी देऊन व उत्कृष्ट खेळाडूंना मेडल देऊन सत्कार केला. पंच म्हणून कृष्णा गायकवाड, आनंद जाधव, तेजस पैसेवारी, विशाल भोपळे, अनिश जाधव व प्रथमेश जाधव यांनी काम पाहिले.

**अंतिम तीन संघ**

**१४ वर्षे** : ज्ञानदीप स्पोर्ट्स क्लब मंगळवेढा, समर्थ कबड्डी क्लब क्रीडा भारती सोलापूर, रौद्रशंभू कबड्डी संघ कळमनगाव.

**१७ वर्षे** : ईगल स्पोर्ट्स क्लब,अक्कलकोट, एकता स्पोर्ट्स क्लब कुमठा नाका, माता स्वरूप राणी तरुण मंडळ.

## महाराष्ट्राचे किशोर व किशोरी संघ उपांत्य फेरीत

### ३५वी किशोर-किशोरी राष्ट्रीय खो-खो स्पर्धा : कोल्हापूरच्या मुलांचीही बाजी

**तभा वृत्तसेवा,**
**कुरुक्षेत्र (हरियाणा), दि. ३ फेब्रुवारी**

येथे सुरु असलेल्या ३५व्या किशोर व किशोरी राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या दोन्ही संघांनी अफलातून, आक्रमक आणि शिस्तबद्ध खेळ साकारत उपांत्य फेरीत दणदणीत प्रवेश केला.

थीम पार्क मैदानावर उपउपांत्य फेरीतील सामन्यांत महाराष्ट्राने प्रतिस्पर्ध्यांना संधी न देता वेगवान आक्रमण, भक्कम संरक्षण आणि अचूक डावपेचांचा प्रत्यय दिला. उपांत्य फेरीत किशोर गटात महाराष्ट्र विरुद्ध ओडिसा, कोल्हापूर विरुद्ध उत्तरप्रदेश, तर किशोरी गटात महाराष्ट्र विरुद्ध पंजाब, राजस्थान विरुद्ध हरयाणा अशी थरारक लढती रंगणार आहे.




**किशोरः महाराष्ट्राची मणिपूरवर दणदणीत सरशी**

किशोर गटात उपउपांत्य फेरीत महाराष्ट्राने मणिपूरचा ३०२१ असा ५.३५ मि. राखून ९ गुणांनी दणदणीत पराभव केला. महाराष्ट्राकडून वरद पोळ (२.५०, १.२० मि. संरक्षण व २ गुण), सुरज खाडे (१.१०, १.५५ मि. संरक्षण), प्रफुल्ल वसावे (१.२० मि. संरक्षण व ४ गुण), विक्रम राठोड (१.२० मि. संरक्षण व २ गुण) यांनी सलग उत्कृष्ट कामगिरी नोंदवली. मणिपूरकडून एल. सिंग (१.१० मि. संरक्षण व ४ गुण), पी. पोहिंबा (१.२० मि. संरक्षण व ४ गुण) यांनी झुंज दिली.

**किशोरीः महाराष्ट्राचा विदर्भावर एकतर्फी डावाने विजय**

किशोरी गटात महाराष्ट्राने विदर्भावर एक डाव आणि १२ गुण राखून (२८१६) विजय मिळवला. महाराष्ट्राकडून अनुषा तामखडे (२.५० मि. संरक्षण व ४ गुण), अपर्णा वर्दे (२.४० मि. संरक्षण व ४ गुण), राही पाटील (२.१० मि. संरक्षण), कार्तिकी यलमार (१.५० मि. संरक्षण), ऋतुजा सुरवसे (१.३० मि. संरक्षण), पियुशा पानमळकर (नाबाद १.२० मि. संरक्षण) यांनी सलग दमदार कामगिरी केली. विदर्भकडून नव्या दुग्गा (१ मि. संरक्षण), मनवी राजू (१ मि. संरक्षण व ४ गुण), कोमल ठाकरे (४ गुण) यांनी चांगला खेळ केला.

**उत्तरप्रदेशची विदर्भवर दणदणीत बाजी**

उत्तरप्रदेशने विदर्भवर २९ गुणांनी (५३२४) मात केली. उत्तरप्रदेशकडून देव कुमार (१.४० मि. संरक्षण व ८ गुण), बिट्टु यादव (१.४५, १.१० मि. संरक्षण व ६ गुण), इशान (१, २ मि. संरक्षण व ८ गुण) यांनी प्रभावी कामगिरी केली. विदर्भकडून रोशन पालटे (१ मि. संरक्षण व ४ गुण) याने प्रतिकार केला.

**कोल्हापूरचा थरारक विजय**

कोल्हापूरने तेलंगणाचा अवघ्या १ गुणाने (३७३६) पराभव केला. मध्यंतराला कोल्हापूरकडे २ गुणांची (२०१८) आघाडी होती. ड्रीम रनचा गुण विजयासाठी निर्णायक ठरला. कोल्हापूरकडून देवराज येड्राव (१.३०, १.१० मि. संरक्षण व ८ गुण), गौरव माने (१४ गुण), सोहम भाटमारे (८ गुण) यांनी चमकदार खेळ केला. तेलंगणाकडून महेश (१ मि. संरक्षण व ४ गुण), अरविंद (१.१० मि. संरक्षण व ४ गुण) यांनी चांगला खेळ केला.

## नांदेड व लोणेरे विद्यापीठाची विजयी सलामी

### आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू करंडक टी-२० क्रिकेट : रशीद शेख व जितू अंधारे सामनावीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी -**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त आयोजित आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू करंडक टी क्रिकेट स्पर्धेत नांदेडचे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व लोणेरेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाने विजयी सलामी दिली

जुळे सोलापूर येथील भंडारी मैदानावर मंगळवारी सलामीचे दोन्ही सामने अत्यंत चुरशीचे ठरले असून दोन्ही संघांनी दमदार कामगिरी करत क्रिकेटप्रेमींची मने जिंकली. पहिल्या सामन्यात नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने मुंबई विद्यापीठाचा ५ गडी राखून पराभव केला. मुंबई विद्यापीठाने प्रथम फलंदाजी करत १५ षटकात ५ बाद १२० धावा केल्या. प्रत्युत्तरात एसआरटीएमयू, नांदेडने विजयी १२१ धावांचे लक्ष १३.२ षटकात ५ गडी गमावून गाठले. अष्टपैलू खेळ करणारा रशीद शेख सामन्याचा मानकरी ठरला. त्याने ३३ चेंडूत नाबाद ५४ धावा करीत ६५ धावात १ गडी बाद केला.



दुसऱ्या सामन्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे संघाने पुणे विद्यापीठावर ८ गडी राखून विजय मिळविला. पुणे विद्यापीठाने १३ षटकात ६ बाद १२४ धावा केल्या. विजयी लक्ष्य लोनेरे विध्यापीठाने ११.४ षटकात २ बाद १२८ धावा करीत गाठले. २० धावात ४ बळीटिपणारा जितू अंधारे सामनावीर ठरला. या मैदानावर मल्लिकार्जुन पाटील व प्रशांत पुजारी हे समन्वयक म्हणून काम पाहत आहेत.

या क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन विद्यापीठाच्या दीक्षांत मैदान येथे पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा हे होते यावेळी महाराष्ट्र कुलगुरू क्रिकेट संघटनेचे उपाध्यक्ष सुभाष पवार, संस्थापक दीपक घोणे, महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष अजय देशमुख, अमरावती विद्यापीठाचे कुलसचिव अविनाश असनारे, परीक्षा विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, वित्त व लेखाधिकारी सीए महादेव खराडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे, दिनेश दखने आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रभारी कुलसचिव तथा विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. अतुल लकडे यांनी केले. या स्पर्धेत महाराष्ट्र राज्यातील पुणे, मुंबई, नागपूर, अमरावती, जळगाव, नांदेड आदी ठिकाणच्या विद्यापीठांतील एकूण १७ संघांचा सहभाग असून, राज्यभरातील विद्यापीठ कर्मचारी खेळाडूंमध्ये मोठ्या उत्साहाचे वातावरण आहे. उद्घाटनापूर्वी सहभागी सर्व संघांचा शिस्तबद्ध मार्च पास्ट पार पडला. विविध विद्यापीठांचे संघ आपल्या ध्वजांसह मैदानात उतरल्याने संपूर्ण परिसर क्रीडामय झाला होता. उद्घाटनानंतर सायंकाळी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. विविध नृत्य व सांस्कृतिक सादरीकरणातून कला व क्रीडांचा सुरेख संगम अनुभवायला मिळाला. ही स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी विद्यापीठ प्रशासन, क्रीडा विभाग, अधिकारी, कर्मचारी व स्वयंसेवकांचे सहकार्य लाभत असून, येत्या काही दिवसांत सोलापूर शहर क्रिकेटमय वातावरणाने भारून जाणार आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. तेजस्विनी कांबळे व प्रा. श्रुती देवळे यांनी केले. आभार सहायक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांनी मानले.

**अधिकारी व कर्मचाऱ्यांना मैदानाची गरज**

यावेळी पोलीस आयुक्त एम राजकुमार म्हणाले, प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी आता मैदानावर येऊन खेळाचा आनंद घेणार आहेत. खऱ्या अर्थाने या अधिकारी व कर्मचाऱ्यांना मैदानाची गरज असते. समाजाच्या विकासासाठी काम करत असताना तंदुरुस्तीसाठी देखील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी काळजी घ्यावी, असे आवाहन केले. प्र-कुलगुरू प्रा.लक्ष्मीकांत दामा यांनी ही खेळाडूना शुभेच्छा दिल्या.

## महत्वाचे...



### सुशीलनगर जि.प. शाळेत प्रजासत्ताक दिन

**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

विजापूर रोड, सुशीलनगर येथील जिल्हा परिषद शाळेत प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. यावेळी होटगी रोड शाखेच्या बँक ऑफ इंडियाचे वरिष्ठ प्रबंधक संजीवकुमार श्रीवास्तव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. बँक ऑफ इंडिया शाखेतील स्वप्नील कच्छवाय ठाकूर, सौरभ साह, संतोष गुत्ते, विमा अधिकारी प्रा. रमेश वाघमेंतर या पाहुण्यांच्या हस्ते शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे किट व खाऊ वाटप करण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांनी देशभक्ती गीतावर कवायत संचलन सादर केले. मुख्याध्यापिका सुरेखा कानडे यांनी आभार मानले तर सूत्रसंचालन शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजश्री इंगळे यांनी केले.

### राज्यस्तरीय पुस्तक परीक्षण स्पर्धेत नर्मदा कनकी यांचे यश

**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**



महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे यांच्यावतीने राज्यस्तरीय पुस्तक परीक्षण स्पर्धा बुलढाणा येथे पार पडली,या स्पर्धेत महाराष्ट्रातील आठ विभागातून एकूण ४० स्पर्धक सहभागी झाले. या स्पर्धेत नू.म.वि मराठी शाळेतील उपक्रमशील शिक्षिका, अक्षरप्रेमी निबंधलेखिका यांना सोलापूर तालुक्यातून प्रथम, पुणे विभागातून द्वितीय आणि राज्यस्तरीय नववा क्रमांक प्राप्त झाला आहे. सोलापूर, संगमनेर, बुलढाणा अशा तीन टप्प्यात झालेल्या या पुस्तक परीक्षण स्पर्धेत नर्मदा कनकी यांनी स्त्री-जीवन, श्यामची आई आणि आपलं पर्यावरण या तिन्ही पुस्तकांचे अभ्यासपूर्ण आणि मुद्देसूद परीक्षण करून त्याचे लेखन व मौखिक सादरीकरण केले, त्यामुळे त्यांची राज्यभरातून टॉप टेन मध्ये निवड झाली आहे. या यशाबद्दल जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सोलापूर तसेच शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन, मुख्याध्यापिका स्मिता माळवदकर व सर्व शिक्षक वृंदांनी त्यांचे अभिनंदन केले.




### शिक्षण उपसंचालक गणपतराव मोरे यांची सुयश विद्यालयाला भेट

**बार्शी, दि. ३ फेब्रुवारी-**

सुयश विद्यालय, बार्शी येथे शिक्षण उपसंचालक श्री. गणपतराव मोरे यांनी भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी शाळेच्या सर्वांगीण शैक्षणिक कार्याचा आढावा घेतला. तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती जाणून घेतली. यावेळी मोरे यांनी शाळेतील अत्याधुनिक संगणक कक्षाची पाहणी केली. संगणक कक्षामध्ये उपलब्ध असलेली आधुनिक संगणक प्रणाली, इंटरनेट सुविधा, डिजीटल अध्यापन पद्धती तसेच विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाशी जोडण्यासाठी शाळेने केलेली तयारी पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. बदलत्या काळाच्या गरजेनुसार विद्यार्थ्यांना डिजीटल शिक्षण देणे ही काळाची गरज असून सुयश विद्यालय या दिशेने सक्षमपणे कार्यरत असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे तर कौशल्याधारित, तंत्रज्ञानाधिष्ठित व मूल्याधारित शिक्षण देणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे मार्गदर्शन त्यांनी यावेळी केले.

### मनाला शोधण्याचा प्रयत्न करा : धनश्री लेले

**बार्शी, दि. ३ फेब्रुवारी-**



श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी या संस्थेचे संस्थापक, संवर्धक व प्रेरणास्त्रोत कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जयंतीनिमित्त जिजाऊ सावित्री रमाई महिला बळ विकास समितीच्यावतीने महिला मेळावा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून मुंबई येथील व्याख्यात्या भाषा अभ्यासक तथा निरुपणकार डॉ. धनश्री लेले या उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बार्शी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा तेजस्विनी कथले या होत्या. यावेळी डॉ. धनश्री लेले यांनी 'माझ्या मना रे ऐक जरा' यावर प्रेरणादायी निरुपण केले. त्या म्हणाल्या, मन दिसत नाही. पण ते प्रत्येकाला आहे. जे दिसत नाही ते जाणून घेणे महत्वाचे आहे. चांगले शिक्षक व आई मुलांचे डोळे वाचतात. मन हे अतिशय चंचल आहे. मन हे प्रचंड सामर्थ्यवान आहे. ते दाहीदिशांना जाते. आजची मने मोबाईलच्या आहारी गेली आहेत. मनाला शोधण्याचा प्रयत्न करा. आज प्रत्येकजण मनाच्या बाबतीत अस्वस्थ आहे. मनाची शक्ती प्रचंड आहे. जिवंतपणा, जिज्ञासा, जिव्हाळा, जिद्द, जिओ और जिने दो हे पाच 'जी' मनाला मिळाल्यास जीवन सुंदर होईल. मन सजग राहणे गरजेचे आहे. मन संवेदनशील असावे. सर्वांनी एकसंघ राहण्याचा प्रयत्न करा, असे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषणात नगराध्यक्षा तेजस्विनी कथले यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संगीत विभागाच्यावतीने स्वागत गीत झाले. प्रास्ताविक समितीच्या सचिव प्रा. मंजुषा श्रीमंगल यांनी केले. प्रमुख पाहुण्या व कार्यक्रमाच्या अध्यक्षा यांचा परिचय डॉ. विजयश्री गवळी यांनी करुन दिला. सन्मान पत्राचे वाचन डॉ. एल.आय. राठोड यांनी केले. आभार डॉ. एस.एस. सुरवसे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. ज्योती यादव आणि डॉ. दैवशाला रसाळ यांनी केले.

# निवडणुकीसाठी पोलीस पाटील सतर्क

## जिल्हा परिषद व ग्रामपंचायत निवडणुकीच्या अनुषंगाने पोलीस पाटील यांची बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**



तालुका, पोलीस ठाणेच्या अंतर्गत गावातील पोलीस पाटील यांची सोलापूर तालुका, पोलीस ठाणे येथे बैठक आयोजित केली होती. दि. ७ फेब्रुवारी रोजी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अंतर्गत जिल्हा परिषद, ग्रामपंचायतीचे मतदान व दि. ९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे. त्या अनुषंगाने दि. ३ फेब्रुवारी रोजी ही बैठक घेण्यात आली.

सदर बैठकी करीता ३७ पोलीस पाटील उपस्थित होते. बैठकी करीता उपस्थित असलेल्या पोलीस पाटील यांना सोलापूर तालुका, पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी राहुल देशपांडे यांनी मार्गदर्शन करून मतदान व मतमोजणीच्या वेळी पोलीस पाटील यांनी करावयाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने सूचना दिल्या आहेत. त्यामध्ये मतदान प्रतिनिधी हे बुथ मधुन वारंवार आत बाहेर करणार नाहीत, पोलीस पाटील हे मतदानाच्या वेळी मतदान केंद्राच्या ठिकाणी सर्व घटनाचे व्हिडीओ शुटींग करतील, मतदानाचे दिवशी घडलेल्या महत्वाचे घटनाची माहिती संबंधीत पोलीस अधिकारी / पोलीस अंमलदार यांना देतील, सर्व पोलीस पाटील यांनी मतदानाचे दिवशी सतर्क राहतील, मतदान केंद्र परिसरात विनाकारण गर्दी होणार नाही याची काळजी घ्यावी वगैरे सूचना दिल्या आहेत.

सदर बैठक अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, प्रितम यावलकर, अपर पोलीस अधीक्षक, संकेत देवळेकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सोलापूर उपविभाग सोलापूर, राहुल आत्राम, परिविक्षावीन सहायक पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पार पाडली आहे. राहुल देशपांडे, पोलीस निरीक्षक, सोलापूर तालुका, पोलीस ठाणे, सोमनाथ कदम, सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस ठाणे कडील पोलीस अंमलदार उपस्थित होते.

## टमटम अपघातप्रकरणी ड्रायव्हरची अपिलात निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

करमाळा तालुक्यातील भाळवणी ते जेऊर रस्त्यावर आरोपी संतोष गोरख गायकवाड वय वर्षे ३० रा. वरकटणे, ता. करमाळा यांनी आपल्या ताब्यातील टमटम नं. एम एच-२३ एक्स ५१२९ जेऊर बाजार असल्यामुळे टमटम मध्ये १०-१२ प्रवासी बसवुन वेगाने, हयगयीने रोडचा अंदाज न घेता जेऊर जवळ टमटम न आवरल्यामुळे टमटम रस्त्याच्या दुभाजकाला धडकुन दोन कोलांट्या खाल्लया, त्यामध्ये फिर्यादी रामेश्वर काळे यांचे वडिल जालिंदर श्रीपती काळे यांचा मृत्यु झाला व वडवळमधील इतर प्रवाशांना जखमी केले म्हणून त्याच्याविरुध्द करमाळा कोर्टात दोषारोप पत्र पाठविले होते. करमाळा कोर्टानी ७ साक्षीदारांचे जबाब नोंदविले व त्यावरुन आरोपी संतोष यास सर्व कलमांखाली दोषी ठरवुन ६ महिन्याची सक्तमजुरीची शिक्षा व ६,000/-रुपयेचा दंड ठोठाविला.

सदर शिक्षेविरुध्द आरोपीने अॅड. भारत कट्टे यांच्यामार्फत बार्शी येथील सेशन कोर्टात अपील दाखल केले होते. खालील मे. कोर्टात झालेल्या पुराव्यावरुन समोरुन कंटेनर आल्यामुळे प्रवाशांचे प्राण वाचविण्यासाठी आरोपीने रस्त्याच्या कडेला गाडी घेतली व त्यामुळे अपघात झाला असे मे. सेशन कोर्टाच्या निदर्शनास आणून दिले, अॅड. भारत कट्टे यांनी केलेला युक्तीवाद ग्राह्य धरुन आरोपीला दिलेली शिक्षा रद्द करुन त्यास निर्दोष मुक्त केले. यात आरोपीतर्फे अॅड. भारत कट्टे व अॅड. गणेश जगताप (बार्शी) यांनी काम पाहिले.

## संत नामदेव महाराज स्मारक उभारणीसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्त

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३ फेब्रुवारी-**

तिर्थक्षेत्र पंढरपूर येथे उभारण्यात येणार्याक संत नामदेव महाराजांच्या स्मारक उभारणीच्या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली असल्याचे पत्रक जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले असल्याची माहिती अ.भा.संत नामदेव क्षत्रिय एकसंघाचे प्रदेशाध्यक्ष व श्री संत नामदेव शिंपी समाज पंढरपूरचे अध्यक्ष गणेश उंडाळे यांनी दिली.

श्री क्षेत्र देहू, आळंदी, पंढरपूर, भंडारा डोंगर, पालखीतळ मार्ग तीर्थक्षेत्र विकास आराखडयाच्या अंतर्गत विभागीय आयुक्त, पुणे यांनी आराखड्यातील मंजूर कामांकरिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार पॅनल गठीत केला आहे. दरम्यान स्मारकाचा आराखडा तयार करण्याच्या दृष्टीने उपविभागीय अधिकारी, पंढरपूर, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर, न.पा. मुख्याधिकारी यांच्यासमवेत स्थळपाहणी करून सविस्तर प्रकल्प अहवाल व अंदाजपत्रक तयार करून तांत्रिक मान्यतेकरिता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर यांच्याकडे सादर करावे, अशा सुचना देण्यात आल्या आहेत. सदर पत्राच्या प्रती विभागीय आयुक्त, पुणे, विशेष कार्य अधिकारी (तीक्षेवि), उपविभागीय अधिकारी, पंढरपूर, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर, मुख्याधिकारी न.प.पंढरपूर यांना देण्यात आल्या आहेत.

**शनिवारी स्थळ पाहणी**

संत नामदेव महाराज स्मारक स्थळाची पाहणी करण्यासाठी शनिवारी ( दि.७ फेब्रुवारी) कंपनीचे अधिकारी तसेच शासकीय अधिकारी येणार आहे. यावेळी अ.भा. संत नामदेव क्षत्रिय एकसंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष अॅरड.म हेश ढवळे, सचिव रुपेश खांडके, नामदेव समाजोन्नती परिषदेचे अध्यक्ष संजय नेवासकर, सचिव अजय फुटाणे आदी उपस्थित राहणार आहेत.

## राज्य बालनाट्य स्पर्धा; सोलापूर केंद्रातून 'हिबाकुशा' प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

२२ व्या महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेत सोलापूर केंद्रातून रंगसंवाद, सोलापूर या संस्थेच्या हिबाकुशा या नाटकाला प्रथम पारितोषिक तसेच बहुजन हिताय बहुजन सुखाय एज्युकेशन सोसायटी या संस्थेच्या झाले मोकळे आभाळ या नाटकास द्वितीय पारितोषिक, आकार सोशल फाऊंडेशन या संस्थेच्या होत्या काही चिमण्या या नाटकासाठी तृतीय पारितोषिक तसेच समर्पित फाऊंडेशन या संस्थेच्या वसा या नाटकासाठी चतुर्थ पारितोषिक प्राप्त जाहीर झाल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत आज एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे केली आहे. या चारही नाटकांची अंतिम फेरीसाठीही निवड करण्यात आली आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे सोलापूर केंद्रावरील अन्य निकाल पुढीलप्रमाणे-

दिग्दर्शनः प्रथम पारितोषिक मिहीका शेंडगे (नाटक-हिबाकुशा), द्वितीय पारितोषिक संदिप उडानशिव (नाटक झाले मोकळे आभाळ), तृतीय पारितोषिक किरण लोंढे (नाटक-बालन), प्रकाश योजना प्रथम पारितोषिक प्रदिप रजपुत (नाटक-होत्या काही चिमण्या), द्वितीय पारितोषिक शशिकांत (नाटक-हिबाकुशा), तृतीय पारितोषिक उमेश बटाणे (नाटक झाले मोकळे आभाळ), नेपथ्य प्रथम पारितोषिक तारासिंग मरोड (नाटक-होत्या काही चिमण्या), द्वितीय पारितोषिक मळसिध्द देशमुख (नाटक-हिबाकुशा), तृतीय पारितोषिक संदिप जाधव (नाटकझाले मोकळे आभाळ), रंगभूषा प्रथम पारितोषिक विजयालक्ष्मी श्रावण (नाटक- होत्या काही चिमण्या), द्वितीय पारितोषिक शिवशंकर स्वामी (नाटक-भेट), तृतीय पारितोषिक रमेश श्रावण (नाटक-हिबाकुशा), वेशभूषा : प्रथम पारितोषिक अंजली मित्रगोत्री (नाटक-हिबाकुशा), द्वितीय पारितोषिक कुणालसिंह चौहाण (नाटक-होत्या काही चिमण्या), तृतीय पारितोषिक पुजा चकोते (नाटक- ताटी उघडा), संगीत दिग्दर्शन : प्रथम पारितोषिक श्रीकृष्ण जोशी (नाटक-हिबाकुशा), द्वितीय पारितोषिक रोहित लगाडे (नाटक- होत्या काही चिमण्या), तृतीय पारितोषिक विश्वजीत माने (नाटक-ताटी उघडा), उत्कृष्ट अभिनय रौप्यपदक सम्राट जोंजट (नाटक- झाले मोकळे आभाळ) व आरोही शेळके (नाटक-भेट), अभिनयासाठी गुणवत्ता प्रमाणपत्रे आराध्या डोळसे (नाटक झाले मोकळे आभाळ), श्रावणी लोखंडे (नाटक-बालन), रुद्राक्षी इंगळे (नाटक- म्यॉडम), वेदीका कांबळे (नाटक-होत्या काही चिमण्या), अनन्या पिंपळेकर (नाटक-हिबाकुशा), विरसिंह ठाकूर (नाटक-सदा फुली रंगीत झाली), अलोक शेळके (नाटक-भेट), ओंकार कांबळे (नाटक-गोलुमोलु) अथर्व भोसले (नाटक-वल्ली), हर्षवर्धन गोतसुर्वे (नाटक-मुकेशब्द)

दि. १६ ते २१ जानेवारी या कालावधीत हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर येथे अतिशय जल्लोषात झालेल्या या स्पर्धेत ४३ बालनाट्य प्रयोग सादर करण्यात आले. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून श्री. हेमंत गव्हाणे, श्री. देवेंद्र भिडे आणि श्रीमती अमृता जोगदेव यांनी काम पाहिले.

सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड. आशिष शेलार यांनी प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या नाटकांच्या संघांचे तसेच इतर पारितोषिक प्राप्त कलाकारांचे अभिनंदन केले. बालनाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत सहभागी झालेल्या सर्व संस्था आणि बालकलाकार यांनी मेहनत घेऊन सादर केलेल्या सर्व दर्जेदार बालनाटकांना प्रेक्षकांनी चांगली दाद दिली. भविष्यातही संस्था व बालकलाकारांनी सर्वोत्तम कामगिरी करावी, अशी अपेक्षा सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड. आशिष शेलार यांनी व्यक्त केलेली आहे.



## कोडिंग करताना समाजाच्या समस्या विसरू नका; मंगळवेढेकर इन्स्टिट्यूटच्या स्पर्धेत नवा संदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

मंगलवेढेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट करिअर डेव्हलपमेंट अँड रिसर्च, येथे 'आंतरमहाविद्यालयीन सी-प्रोग्रॅमिंग स्पर्धा' (Intercollegiate C-Programming Contest) यशस्वीपणे आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध शैक्षणिक संस्थांमधील १३८ विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून गंगाधर थळंगे (व्यवस्थापकीय संचालक, आरएमटीएजी सोल्युशन्स एलएलपी) उपस्थित होते. तसेच अमृता थळंगे (वरिष्ठ तांत्रिक विश्लेषक) यांनी उपस्थिती लाभली. कार्यक्रमात मार्गदर्शन करताना मुख्य पाहुणे गंगाधर थळंगे यांनी स्नातक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी आयटी क्षेत्रातील नोकरीच्या संधींबाबत माहिती दिली. तसेच येत्या काळात सोलापूर हे सॉफ्टवेअर उद्योगाचे एक प्रमुख केंद्र म्हणून उदयास येत असल्याचे त्यांनी सांगितले. इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ.ओ.एम.आष्टणकर यांनी भाषणात प्रोग्रॅमर्समध्ये सामाजिक समस्या आणि संवेदनशीलतेची गरज व्यक्त केली. तंत्रज्ञानाचा वापर केवळ व्यावसायिक यशासाठी नव्हे, तर समाजातील वास्तविक समस्या सोडवण्यासाठीही होणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. विभाग प्रमुख संतोष कुलकर्णी यांनी या शैक्षणिक वर्षात विभागाने आयोजित केलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. प्रा. सुहास कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने स्पर्धेला सामोरे जाण्याचा सल्ला दिला. स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचे नावे : मिराज अत्तार (ए. आर. बुर्ला कॉलेज, सोलापूर) प्रथम क्रमांक; प्रेम मोहोळकर (एच.एन.सी.सी. कॉलेज, सोलापूर) द्वितीय क्रमांक; वेदांत वल्लाळ (एस.ई.एस. पॉलिटेक्निक, सोलापूर) तृतीय क्रमांक.

## बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी लोकशाहीची पायाभरणी केली : डॉ. दामा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**



महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात 'अनुभव मंटप' स्थापन करून लोकशाही विचारांची प्रभावी पायाभरणी केली. काय कवे कैलास या ब्रीदवाक्यानुसार त्यांनी समता, बंधुता आणि मानवमूल्यांचा पुरस्कार केला. जातीभेद नष्ट करून समानतेची शिकवण देणारे महात्मा बसवेश्वरांचे विचार आजच्या समाजासाठीही तितकेच प्रेरणादायी आहेत, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील कन्नड विभाग, भाषा व वाङ्मय संकुल आणि महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'महात्मा बसवेश्वरांच्या वचन साहित्यातील कायक-दासोह' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्या हस्ते झाले. उद्घाटनप्रसंगी ते मार्गदर्शन करत होते.

यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ अभ्यासक डॉ. बी. बी. पुजारी, डॉ. भीमाशंकर बिराजदार, डॉ. राजशेखर विजापुरे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. देवानंद चिलवंत, भाषा व वाङ्मय संकुलाच्या संचालिका डॉ. अंजना लावंड, अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. चंद्रकांत गार्डी यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी डॉ. अंजना लावंड यांनी स्वागत केले. महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. चंद्रकांत गार्डी यांनी कार्यशाळेची भूमिका मांडत प्रास्ताविक केले. या कार्यक्रमास वित्त व लेखा अधिकारी सीए महादेव खराडे, डॉ. प्रभाकर कोळेकर, डॉ. प्रशांत पवार, डॉ. वीरभद्र दंडे, प्राचार्य गजानन धरणे, ड. मल्लिनाथ शहाबादे, चन्नवीर बंकुर, राहुल पावले, महादेव न्हावकर, डॉ. राजीवकुमार मेंटे, डॉ. शिवानंद तडवळ यांच्यासह विविध विभागांचे प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ममता बोल्ली व श्रुती देवळे यांनी केले, तर आभारप्रदर्शन डॉ. गीता डिग्गे यांनी केले.

# भारतीय रेल्वेच्या खासगीकरणाला सेंट्रल रेल्वे मजदूर संघाचा विरोध

### जुनी पेन्शन बहाल करा : डॉ. एम. राघवय्या
### सेंट्रल रेल्वे मजदूर संघाच्या दोन दिवसीय अधिवेशनात विविध प्रश्नांवर चर्चा


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

भारतीय रेल्वेच्या खाजगीकरणाच्या धोरणाला सेंट्रल रेल्वे मजदूर संघ आणि नॅशनल फेडरेशन ऑफ इंडियन रेल्वेमन (छत्रखठ) यांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. रेल्वे ही सार्वजनिक मालमत्ता असून तिचे खाजगीकरण केल्यास सुरक्षेवरच नव्हे, तर कामगारांच्या भवितव्यावरही प्रश्नचिन्ह निर्माण होईल, असे ठाम प्रतिपादन एनएफआयआरचे जनरल सेक्रेटरी डॉ. एम. राघवय्या यांनी केले.

सोलापूर येथे सुरू असलेल्या सेंट्रल रेल्वे मजदूर संघाच्या दोन दिवसीय अधिवेशनात मार्गदर्शन करताना बोलत होते.सेंट्रल रेल्वे मजदूर संघाचे अध्यक्ष डॉ. प्रविण बाजपेई, महामंत्री अनिल दूबे, सोलापूर विभागीय सचिव उल्हास बागेवाडी आणि सोलापूर विभागाचे अध्यक्ष किशोर पिल्ले उपस्थित होते. सेंट्रल रेल्वे मजदूर संघाचे सोलापूर येथे सुरू असलेल्या दोन दिवसीय अधिवेशनात या सर्व मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी त्यांनी जुनी पेन्शन योजना रद्द करण्याच्या निर्णयावरही जोरदार टीका केली. सुप्रीम कोर्टाने पेन्शन ही कोणतीही 'इनाम' नसून कर्मचाऱ्यांनी आयुष्यभर दिलेल्या सेवेचा वृद्धावस्थेतील आधार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे नवीन पेन्शन योजना रद्द करून तात्काळ जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशी मागणी त्यांनी सरकारकडे केली.

रेल्वेतील ऑन ड्युटी कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेबाबत ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे.




रेल्वे रुग्णालयांतील परिस्थितीवरही त्यांनी चिंता व्यक्त केली. तज्ज्ञ डॉक्टरांची नेमणूक करून रिक्त पदे सरेन्डर न करता तातडीने भरावीत, अशी मागणी करण्यात आली.विशेषतः महिला रेल्वे कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले. कर्मचारी व त्यांच्या आई-वडिलांना वैद्यकीय व पास सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, कोविड काळात जीव धोक्यात घालून सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचा १८ महिन्यांचा थकीत डीए तातडीने द्यावा, तसेच आठवा वेतन आयोग जानेवारी २०२६ पासून लागू करावा, अशा प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या. सुत्रसंचालन विजय पाटील यांनी केले तर विभागीय सचिव उल्हास बागेवाडी यांनी प्रास्ताविक केले. सीआरएमएसचे अध्यक्ष डॉ. प्रविण बाजपेयी यांनी आपल्या भाषणातून कर्मचारी वर्गाला प्रबोधन केले. सोलापूर विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बार्शीच्या मातीतील 'आरोग्य पंढरी': जगदाळे मामा हॉस्पिटलची ५० वर्षांची सेवा-तपश्चर्या





महाराष्ट्राच्या मातीत समाजसुधारणेची मोठी परंपरा आहे. या परंपरेतील एक दैदिप्यमान नाव म्हणजे कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे, बार्शीसारख्या दुष्काळी पट्ट्यात शिक्षण आणि आरोग्य ही केवळ सुविधा नसून ती जगण्यासाठीची मोठी लढाई आहे. या लढाईत आयुष्यभर माणसाच्या बाजूने खंबीरपणे उभे राहिलेले नाव म्हणजे निवृत्ती गोविंद जगदाळे ('मामासाहेब')

जयाचा कोणी नाही, त्याचा मी आहे हे केवळ त्यांच्या ओठांवरचे वाक्य नव्हते, तर त्यांच्या प्रत्येक कृतीतून व्यक्त होणारे जीवनतत्त्व होते. १९३४ साली त्यांनी शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली खरी, पण मामाच्या लक्षात आले की, शिक्षणाने डोकं सुधारेल; पण जर शरीरच आजाराने पोखरलेले असेल, तर तो माणूस उभा कसा राहणार? याच तळमळीतून १९७५ साली बार्शीत एका छोट्याशा खोलीत अवघ्या चार खाटांवर 'आरोग्य मंदिर हॉस्पिटल' या नावाने या सेवायज्ञाची सुरुवात झाली. पुढील काळात कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जीवनकार्यामुळे आणि जनमानसातील श्रद्धेमुळे हेच आरोग्य मंदिर पुढे 'जगदाळे मामा हॉस्पिटल' म्हणून ओळखले जाऊ लागले. आज २०२६ मध्ये या बीजाचा विशाल वटवृक्ष झाला असून, ५० वर्षांचा हा प्रवास म्हणजे ग्रामीण भारताच्या आरोग्य क्रांतीचा एक जिवंत इतिहास आहे.

त्याकाळी साधनसामग्रीचा अभाव होता, पण मामासाहेबांची जिद्द अथांग होती. मामासाहेबांच्या तालमीत 'श्री शिवाजी मराठा बोर्डिंग'मध्ये घडलेले डॉ. बी. वाय. यादव हे त्यांचे अत्यंत निष्ठावान शिष्य. मिरजेला एम.एस. चे शिक्षण पूर्ण होत असतानाच मामासाहेबांनी त्यांना साद घातली, 'आपण बार्शीला हॉस्पिटल काढलं तर तिथे येऊन काम करशील का?' गुरुच्या या एका शब्दाला आयुष्याचा आदेश मानून, शहरातल्या मोठ्या संधींना नाकारत डॉ. बी. वाय. यादव सर बार्शीत आले आणि त्यांच्या आगमनानंतरच खऱ्या अर्थाने हॉस्पिटलच्या उभारणीला गती मिळाली. शून्यातून विश्व निर्माण करणे कशाला म्हणतात, याचा हा पहिला अध्याय होता. आज अध्यक्ष म्हणूनही ते केवळ प्रशासन पाहत नाहीत, तर एका ऋषीसारख्या भूमिकेतून संस्थेला मार्गदर्शन करत आहेत. आजच्या भव्य इमारतीकडे पाहून १९७५ सालच्या परिस्थितीची कल्पना करणेही कठीण आहे. त्याकाळी ग्रामीण भागात कॉलरा, टायफॉईड किंवा बाळंतपणातील गुंतागुंत यामुळे मृत्यू होणे ही सामान्य बाब होती. साध्या शस्त्रक्रियेसाठी सोलापूर किंवा पुण्याला जावे लागे, जे गरिबांच्या आवाक्याबाहेर होते. मामासाहेबांनी ही गरज ओळखून एका छोट्या युनिटचे रूपांतर दवाखान्यात केले.

सुरुवातीच्या १५-२० वर्षांचा काळ हा लोकांचा विश्वास जिंकण्याचा काळ होता. जगदाळे मामांच्या दवाखान्यात गेल्यावर माणूस बरा होतोच. ही भावना खेड्यापाड्यात रुजू लागली. हळूहळू रुग्णांचा ओघ वाढला ८० आणि ९० च्या दशकात जेव्हा वैद्यकीय क्षेत्र बदलत होते, तेव्हा संस्थेनेही काळाची पावले ओळखली. केवळ तापाचे औषध देऊन चालणार नाही, तर शस्त्रक्रिया झाल्या पाहिजेत, हे लक्षात घेऊन ऑपरेशन थिएटर्स उभी राहिली. ग्रामीण भागातील महिलांचे आरोग्य हा चिंतेचा विषय होता, त्यासाठी प्रसूती विभाग आणि स्त्रीरोग विभाग सक्षम करण्यात आले. आणि ४ खाटांचे रूपांतर ५०, १०० आणि आज ३०० खाटांच्या भव्य रुग्णालयात झाले आहे. याच काळात एक मोठी दूरदृष्टी दाखवत संस्थेने 'नर्सिंग कॉलेज' सुरू केले. ग्रामीण भागातील मुलींनाच प्रशिक्षित केले तर त्या अधिक माणुसकीने रुग्णांची सेवा करतील, हा त्यामागचा उदात्त हेतू होता. आज तेच नर्सिंगचे विद्यार्थी या रुग्णालयाचा कणा बनले आहेत.

१. **आधुनिकतेचा सुवर्णकाळ : सुपर स्पेशालिटीचा उदय**

२०१० नंतरचा आणि विशेषत: आज २०२६ पर्यंतचा काळ हा या हॉस्पिटलचा 'सुवर्णकाळ' मानला जातो. एकेकाळी ज्या उपचारांसाठी शेतकऱ्याला आपली जमीन विकून पुणे, मुंबईला जावे लागायचे, तेच उपचार आज बार्शीत परवडणाऱ्या दरात उपलब्ध आहेत. आजच्या घडीला हे रुग्णालय केवळ 'जनरल हॉस्पिटल' राहिले नसून ते 'सुपर स्पेशालिटी' आणि 'मल्टी स्पेशालिटी' हब बनले आहे.

न्यूरो सर्जरी (मेंदू विकार विभाग): डॉ. किशोर गोडगे यांच्या मार्गदर्शनाखाली येथे मेंदूच्या अशा काही शस्त्रक्रिया होतात, ज्या करायला मोठ्या शहरांतील डॉक्टर्सही धजावतात. रुग्ण जागा असताना मेंदूवर शस्त्रक्रिया करण्याचे 'अवेक ब्रेन सर्जरी' (Awake Brain Surgery) तंत्रज्ञान येथे यशस्वीपणे राबवले जाते. मणक्याच्या दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया करून रुग्णाला दुसऱ्याच दिवशी चालते करण्याची किमया येथे साधली जाते.

**हृदयरोग विभाग (Cardiology)**: हृदयविकाराचा झटका आल्यावर रुग्णाचे प्राण वाचवण्यासाठी 'गोल्डन अवर' (Golden Hour) महत्त्वाचा असतो. डॉ. आदित्य साखरे यांच्या नेतृत्वाखालील अद्ययावत 'कॅथ लॅब' आणि 'कार्डियाक केअर युनिट'मुळे आज हजारो रुग्णांचे प्राण वाचले आहेत. अँजिओप्लास्टी असो वा बायपास सर्जरी, बार्शीकरांना आता उपचारांसाठी सोलापूर-पुण्याला जाण्याची भीती उरलेली नाही.

**नवजात शिशु विभाग (NICU)**: हॉस्पिटलच्या शिरपेचात मानाचा तुरा म्हणजे येथील सुसज्ज नवजात शिशु विभाग. डॉ. संदीप पाटील यांच्या नेतृत्वाखालील या विभागात (NICU) अत्यंत गुंतागुंतीच्या केसेस हाताळल्या जातात. अवघ्या ८०० ग्रॅम वजनाच्या अतिशय नाजूक नवजात बालकांवरही येथे यशस्वी उपचार करून त्यांना जीवनदान दिले जाते. पूर्वी अशा लहान बाळांना घेऊन पालकांना मुंबई-पुण्याकडे धाव घ्यावी लागायची, पण आता तीच जागतिक दर्जाची सुविधा आपल्या जगदाळे मामा हॉस्पिटलमध्ये उपलब्ध झाली आहे.

यासोबतच हायवेवरील अपघातांचे प्रमाण लक्षात घेऊन उभारलेले 'ट्रॉमा युनिट', सुसज्ज आयसीयू (ICU), आणि ३ अद्ययावत मॉड्युलर ऑपरेशन थिएटर्स हे सर्व पाहताना अभिमानाने ऊर भरून येतो की, मामासाहेबांचे स्वप्न किती भव्य दिव्य स्वरूपात आज उभे आहे.

हॉस्पिटल अद्ययावत झाले, तरी त्याची नाळ आजही मातीशी जुळलेली आहे. पैशाअभावी रुग्ण दगावला, हे वाक्य मामासाहेबांना मान्य नव्हते. आजही तोच वारसा चालवत, हॉस्पिटलने सर्वसामान्यांसाठी आर्थिक सुरक्षेचे मोठे जाळे निर्माण केले आहे.

१. **शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी**: केवळ महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) नव्हे, तर समाजातील विविध घटकांसाठी हॉस्पिटलने विशेष सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.
२. **कर्मचारी राज्य विमा निगम (ESIC)**: कष्टकरी कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी **(ESIC)** अंतर्गत मोफत आणि दर्जेदार उपचार येथे मिळतात.
३. **माजी सैनिक अंशदायी आरोग्य योजना (ECHS)**: देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांना आणि माजी सैनिकांना निवृत्तीनंतर वणवण करावी लागू नये, म्हणून ECHS अंतर्गत संपूर्ण उपचार येथे विनामूल्य होतात.
४. **सेंट्रल रेल्वे आरोग्य योजना** : रेल्वे कर्मचाऱ्यांसाठीही हे रुग्णालय अधिकृत सेवा केंद्र म्हणून कार्यरत आहे.

२. **कॅशलेस सुविधा (Cashless Mediclaim)**: बदलत्या काळानुसार मध्यमवर्गीयांनी आरोग्य विमा (Mediclaim) घेण्यास सुरुवात केली आहे. रुग्णाला खिशातून पैसे भरावे लागू नयेत, यासाठी हॉस्पिटलने नामवंत विमा कंपन्यांशी टाय-अप (Tie-up) केले आहे. स्टार हेल्थ (Star Health), टाटा एआयजी (Tata -IG), एसबीआय जनरल (SBI General), रिलायन्स जनरल (Reliance General) या व अशा अनेक नामांकित कंपन्यांच्या माध्यमातून येथे कॅशलेस (Cashless) उपचार होतात. रुग्ण ऍडमिट झाल्यापासून डिस्चार्ज मिळेपर्यंतची सर्व प्रक्रिया अत्यंत सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने राबवली जाते.

जगदाळे मामा हॉस्पिटलची ५० वर्षे म्हणजे केवळ विटांची इमारत नाही, तर तो लाखो रुग्णांच्या विश्वासाचा सांगाडा आहे. कर्मवीर मामासाहेबांनी पाहिलेले स्वप्न, संस्थेचे पदाधिकारी व डॉ. बी. वाय. यादव सरांनी यांनी केलेले नियोजन आणि तज्ज्ञ डॉक्टरांनी दिलेली सेवा यांचा हा त्रिवेणी संगम आहे. आज सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण करताना, हे रुग्णालय केवळ उपचारांचे केंद्र राहिले नसून ते 'संस्कारांचे विद्यापीठ' बनले आहे. माढा येथील 'सन्मती नर्सिंग होम'च्या माध्यमातून सेवेचा विस्तार सुरूच आहे.

आजच्या तरुण पिढीला, नवीन डॉक्टरांना आणि समाजसेवकांना हे हॉस्पिटल एकच संदेश देते जर तुमची निष्ठा प्रामाणिक असेल आणि ध्येय 'सेवा' असेल, तर शून्यातून विश्व निर्माण करता येते. १९७५ च्या ४ खाटा ते २०२६ मधील ३०० खाटा, शासकीय योजनांचा लाभ आणि कॉर्पोरेट इन्शुरन्सची सुविधा हा ५० वर्षांचा डोलारा म्हणजे कर्मवीर मामासाहेबांच्या त्यागाचे आणि दूरदृष्टीचे मूर्त स्वरूप आहे.

कर्मवीर मामासाहेबांचे कार्य म्हणजे मानवी कल्याणाचा एक अखंड झरा आहे. हा झरा गेल्या ५० वर्षांपासून अविरत वाहत आहे आणि येणाऱ्या अनेक पिढ्यांना तो आरोग्यदायी संजीवनी देत राहील.

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांना १२३ व्या जयंतीनिमित्त मानाचा मुजरा आणि जगदाळे मामा हॉस्पिटलला ५० वर्षांच्या यशस्वी प्रवासाबद्दल सुवर्ण महोत्सवी शुभेच्छा!




**डॉ. महादेव अशोक ढगे**
सहाय्यक प्राध्यापक
बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज बार्शी



|| एकमेका साह्य करू । अवघे धरु सुपंथ ||



कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

* अभिवादक *



सौ. ज्योती दयानंद रेवडकर
प्रा. बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी.



श्री. दयानंद श्रीरंग रेवडकर
मुख्याध्यापक- वखारिया विद्यालय, उपळे दु., ता.बार्शी.
सदस्य - वृक्ष संवर्धन समिती, बार्शी.
सदस्य - लायन्स क्लब बार्शी रॉयल.



|| एकमेका साह्य करू । अवघे धरु सुपंथ ||



कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

* अभिवादक *

एक हितचिंतक



|| एकमेका साह्य करू । अवघे धरु सुपंथ ||

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शीचे संस्थापक, संवर्धक व प्रेरणास्त्रोत

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त हार्दिक शुभेच्छा व विनम्र अभिवादन!



* अभिवादक *

प्राचार्य डॉ. ए. बी. शेख
श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी, जि. सोलापूर
(सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी)



|| एकमेका साह्य करू । अवघे धरु सुपंथ ||

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शीचे संस्थापक, संवर्धक व प्रेरणास्त्रोत

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त हार्दिक शुभेच्छा व विनम्र अभिवादन!



* अभिवादक *

प्राचार्य डॉ. दीपक गुंड व सर्व स्टाफ
(शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय, बार्शी, जि. सोलापूर)
(सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी)


## ध्येय पूर्ण करण्यास प्रेरित असे आदर्श ठेवा -महेश लोंढे

त.भा.वृत्तसेवा
बार्शी,दि.३ फेब्रुवारी

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी या संस्थेचे संस्थापक, संवर्धक व प्रेरणास्त्रोत कर्मवीर डॉ मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त संस्थेच्या वतीने मंगळवार दिनांक ३ फेब्रुवारी २०२६ रोजी संस्थेतील गुणवंत व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई येथील आयआरएस इनकम टॅक्स विभागाचे जॉईंट कमिशनर मा. श्री. महेश लोंढे हे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्री. एन एन जगदाळे होते. यावेळी व्यासपीठावर धाराशिव येथील सहाय्यक संचालक मा. श्री. अमोल ताकभाते, कृषिनिष्ठ शेतकरी मा. श्री. नितीन बापू कापसे, संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ बी वाय यादव, जनरल सेक्रेटरी मा. श्री. पी टी पाटील, सहसचिव मा. श्री. ए पी देबडवार, खजिनदार मा.श्री. जयकुमार शितोळे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मा. श्री. अमोल ताकभाते यांनी विचार व्यक्त केले. ते म्हणाले, कर्मवीर मामांची वैचारिक पार्श्वभूमी असलेली पुण्यभूमी आहे. मी संस्थेचा माजी विद्यार्थी असल्याचा मला अभिमान आहे. निष्ठेने अभ्यास केल्यास यश हमखास मिळते असे त्यांनी सांगितले.

प्रमुख पाहुणे जॉईंट कमिशनर मा. श्री. महेश लोंढे यांनी प्रेरणादायी विचार मांडले. ते म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थी न्यूनगंड बाळगतात. तो दूर करणे अत्यंत महत्वाचे आहे. स्वतःला कमकुवत समजू नका. गरिबाने गरिबीपासून वाचले पाहिजे. इंग्रजी भाषेची भीती कमी करा. इंग्रजी ऐकण्याचा व बोलण्याचा प्रयत्न करा. सरावाने भाषेवर प्रभुत्व मिळवता येते. शब्दसंग्रह व व्याकरण समजून घ्या. तंत्रज्ञानामुळे आपले अस्तित्व धोक्यात आले आहे. तंत्रज्ञान संबंधित कौशल्ये आत्मसात करा. मानवी जीवनात वेळ खूप महत्वाची आहे. योग्य वेळी योग्य गोष्टी करा. विचाराने भारवलेल्या व्यक्तींना वेळेची किंमत असते. जीवनात वेळेचे नियोजन महत्वाचे आहे. ध्येय पूर्ण करण्यास प्रेरित असे आदर्श ठेवा. सातत्याने वाचन करा. संगत चांगली ठेवा. मोबाईल हा सर्वात मोठा शत्रू आहे. मन, इच्छा व कृती यात सांगड घाला. जिद्द, ज्ञान व सामर्थ्य हेच यशाचे खरे गमक आहे असे त्यांनी सांगितले. तसेच सेवानिवृत्तांना निरोगी आरोग्य सांभाळण्याचा त्यांनी सल्ला दिला.

अध्यक्षीय भाषणात संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्री. एन एन जगदाळे यांनी मौलिक मार्गदर्शन केले. ते म्हणाले,कर्मवीर जयंती निमित्ताने कर्मवीर विचार वारसा जतन करण्याचा प्रयत्न केला जातो. यावेळी त्यांनी गुणवंत विद्यार्थी, शिक्षक व सेवानिवृत्तांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनशैलीत सुधारणा करावी. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनाची नितांत गरज आहे. संस्थेच्या वतीने विदयार्थ्यांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व्याख्याने आयोजित केली जातील असे त्यांनी सांगितले.

**कर्मवीर डॉ मामासाहेब जगदाळे गुणवंत पुरस्कार २०२४-२५**

महेश मनोहर देशमुख - प्राथमिक विभाग, सुरेश मधुकर डिसले- माध्यमिक विभाग, अनिल रमेश वैद्य - माध्यमिक विभाग, प्रा. रविराज सुभाष पाटील- उच्च माध्यमिक विभाग, डॉ किरण प्रभाकर देशमुख - महाविद्यालय विभाग, डॉ. अब्दुल बाबूलाल शेख- उत्कृष्ट शाखाप्रमुख (श्री शिवाजी महाविद्यालय), सुहास रावसाहेब थोरबोले -उत्कृष्ट शाखाप्रमुख(माध्यमिक) छत्रपती शिवाजी विद्यालय वाशी-उत्कृष्ट शाळा, शाम रामचंद्र जावळे व आनंद दत्तात्रय देशमुख-उत्कृष्ट शिक्षकेतर कर्मचारी. यावेळी संस्थेतील ३७ सेवानिवृत्तांचा, ५ पीएच डी धारकांचा, १० गुणवंत शिक्षक व शाळा,३० विद्यार्थी व ५ स्पर्धा आयोजक यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सहसचिव मा. श्री. ए पी देबडवार यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्राचार्य डॉ. शखरे यांनी करून दिला. उपस्थितांचे आभार प्राचार्य डॉ. करंडे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. मंजुषा श्रीमंगल व प्रफुल्ल गाढवे यांनी केले. कार्यक्रमास संस्थेतील पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, प्राचार्य, शाखाप्रमुख, सत्कार मूर्ती, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळेंच्या जयंतनिमित्त हार्दिक शुभेच्छा

न्यू त्रिमूर्ती फर्निचर्स & इलेक्ट्रॉनिक्स




प्रोप्रा. बप्पा जगदाळे
मो.- ९८२२५२६५७२
७५०७६४३४३५

सर्व प्रकारचे रेडिमेड फर्निचर्स व
इलेक्ट्रीकल्स, टी.व्ही., फ्रीज, एलईडी, कुलर इ.
७८४/२, तानाजी चौक,बार्शी- ४१३४११, जि. सोलापूर.



कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त
'कर्मवीर प्रेरणा' या पुस्तकाच्या प्रकाशनास
हार्दिक शुभेच्छा !




शुभहस्ते
प्रा. मिलिंद जोशी
(अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, पुणे)

प्रमुख पाहुणे
श्रीमती डॉ. अरुणा ढेरे
(ख्यातनाम साहित्यिक, अध्यक्ष, ९२ वे अ. भा. म. सा. संमेलन, यवतमाळ)

शुभेच्छुक : कर्मवीर परिवार

धाराशिव **दिनांक**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## निता क्षीरसागर यांचा अंगणवाडी सेविकांच्या वतीने सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३ फेब्रुवारी -**

येथील गवते प्लॉटिंग मध्ये असणाऱ्या क्रांतीज्योती क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले अंगणवाडी क्र.१ या ठिकाणी दि.३ फेब्रुवारी रोजी महिला बालकल्याण तसेच शिक्षण सभापती झालेल्या नुकत्याच समितीच्या कमिटी वरील महिला सभापती नगरसेविका नीता क्षीरसागर,



कमिटी सदस्य नगरसेविका ज्योती सावंत, मंजुषा देशमाने, सरोजा अमृतराव या महिला रणरागिनींचा आज आयसीडीएस महिला १ ते १६ अंगणवाडी सेविका यांच्यामार्फत सत्कार करण्यात आला.

अंगणवाडी महिलांचे काही कामाचे प्रश्न सोडून घेण्याचे निवेदन सभापती व कमिटीला देण्यात आले.

यावेळी विद्यार्थी बालगोपालसह सर्व अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या.



### संक्षिप्त वृत्त...



#### इंग्लिश ओलंपियाड परीक्षा स्पर्धेत स्वामी विवेकानंद शाळेचे यश

**उमरगा, दि.३ फेब्रुवारी -**

येथील श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित, स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांनी इंग्लिश ओलंपियाड या परीक्षेत यश मिळवून गोल्ड मेडला गवसणी घातली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या इंग्लिश ओलंपियाड स्पर्धा परीक्षेत या शाळेतील इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवून काही सेकण्ड लेव्हल तर काहींनी गोल्ड मेडल ला गवसणी घातली आहे. यातील इयत्ता दुसरी मुक्ता माहेरा, गावकर सार्थक, इयत्ता तिसरी अजित सूर्यवंशी, इयत्ता चौथी ईशान्य पवार, इयत्ता सहावी अनुष्का चौधरी, इयत्ता सातवी साधना पवार या विद्यार्थ्यांनी गोल्ड मेडल तर इयत्ता तिसरी अभिज्ञा शाई वाले, पाटील अनुष्का, अजित सूर्यवंशी, वैभवी सूर्यवंशी, इयत्ता सहावी कृष्णा क्षिरसागर, ओमकार पवार, श्रावणी माळी, अनुष्का चौधरी, जारा भोईपुरे, इयत्ता सातवी साधना पवार, शिराली बिराजदार, आदर्श चव्हाण, तनिष्का पाटील या विद्यार्थ्यांनी सेकंड लेवल प्राप्त केले आहे. या यशाबद्दल डॉ. चंद्रकांत महाजन, संस्थेचे अध्यक्ष मल्लिकार्जुन दांडगे, डॉ. कपिल महाजन, मुख्याध्यापिका सविता लोहार, गोपाळ आष्टे आदीसह सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षाव केला जात आहे.



#### तेरणा महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींना वाद-विवाद स्पर्धेत यश

**धाराशिव, दि.३ फेब्रुवारी -**

तेरणा महाविद्यालयाच्या बी.ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनी मनीषा जांगीड व गायत्री जांगीड यांनी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, माकणी (जि. धाराशिव) येथे आयोजित शिक्षणरत्न शिवाजीराव मोरे आंतर महाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धेत उत्तम सादरीकरण करत उत्तेजनार्थ २,५०० रुपये व प्रमाणपत्र मिळविले. समकालीन राजकारण संवैधानिक व नैतिक मूल्यांचा ऱ्हास करणारे ठरत आहे/नाही या विषयावर त्यांनी अभ्यासपूर्ण मांडणी व प्रभावी वक्तृत्वाच्या जोरावर यश संपादन केले. या यशाबद्दल प्राचार्य डॉ.डी.बी. मोरे यांच्यासह सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले. या यशामुळे तेरणा महाविद्यालयाच्या शैक्षणिक व सांस्कृतिक परंपरेत मानाचा तुरा रोवला गेला.



#### व्यंकटेश महाजन महाविद्यालयात एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन

**धाराशिव, दि.३ फेब्रुवारी -**

येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास व्याख्याते म्हणून डॉ. दिपाली मेहकरकर व डॉ. वृषाली रोकडे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ. महेश्वर कळलावे तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेचे डॉ. सुरजकुमार बाबर, परवेझ सय्यद, प्राचार्य प्रा.डॉ. प्रशांत चौधरी यांची उपस्थिती होती. नवीन शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत अध्यापक कौशल्य विकास कार्यक्रम या उपक्रमांतर्गत स्वयंम आणि मूक या ऑनलाईन कोर्सेस संदर्भात माहिती दिली. तसेच याबाबतचे प्रात्यक्षिक देखील करून घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रशांत गुरव यांनी केले तर आभार प्रा.डॉ. विनोदकुमार वायचळ यांनी मानले.

# जिल्ह्याचा सर्वांगीण विकासासाठी भाजपाचा वचननामा सादर

## जि.प. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आ. राणाजगजीतसिंह पाटील यांचा १० कलमी विकास आराखडा...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ फेब्रुवारी -**

जिल्ह्याचा सर्वांगीण कायापालट करण्यासाठी भारतीय जनता पक्ष कटिबद्ध असून, आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये महायुतीला जनतेने संधी दिल्यास १० कलमी संकल्प कार्यक्रम तातडीने राबविण्यात येईल, असे प्रतिपादन आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांनी केले.

धाराशिव येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी जिल्हा परिषद निवडणुकीसाठी विकासाचा वचननामा जाहीर केला. या पत्रकार परिषदेस माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, नेताजी पाटील, ॲड. खंडेराव चौरे, नगरसेवक राहुल काकडे आदी उपस्थित होते. आमदार पाटील म्हणाले की, लोकाभिमुख, प्रगत व पारदर्शक प्रशासन हा आम चा केंद्रबिंदू असून जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या कामांसाठी नागरिकांना कार्यालयात येण्याची गरज भासणार नाही. विविध सेवा व तक्रारींसाठी थेट व्हॉट्सॲपवर अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल.

पर्यटन विकासाच्या माध्यमातून जिल्ह्यातील ऐतिहासिक, धार्मिक व निसर्गरम्य स्थळांचा विकास करून स्थानिक नागरिकांच्या उत्पन्नात वाढ करण्यावर भर दिला जाणार आहे.

'आरोग्य आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत ज्या गावांमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र नाही, त्या ठिकाणी



दरमहा 'सर्वरोग निदान शिबिर' आयोजित करण्यात येणार आहे.

महिला सक्षमीकरणासाठी बचत गट अधिक बळकट करून महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी केले जाईल. जिल्ह्यात सौरऊर्जेचा व्यापक वापर करण्यात येणार असून ग्रामपंचायती सौरऊर्जेवर आणून वीजबिल शून्य करण्याचा संकल्प असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शिक्षण क्षेत्रात अद्ययावत व गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर देण्यात येणार आहे. 'स्मार्ट शाळा' संकल्पनेतून प्रत्येक गावातील शाळा डिजिटल करण्यात येणार असून विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.

स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण राबविण्यात येणार असून नवीन उद्योग जिल्ह्यात आणून स्थानिकांना रोजगारात प्राधान्य दिले जाईल. 'उस्मानाबादी शेळी' या नाविन्यपूर्ण प्रकल्पाच्या माध्यमातून शेळीपालनातून आर्थिक दुर्बल घटकांना समृद्ध करण्याचा मानसही आमदार पाटील यांनी व्यक्त केला.

'गाव तिथे पक्के रस्ते' या उपक्रमांतर्गत शेतरस्ते, पाणंद रस्ते तसेच गावांतर्गत रस्त्यांचे मजबुतीकरण करून दळणवळण सुलभ केले जाईल. पाणीपुरवठा योजनांच्या बाबतीत गावोगावी अपूर्ण असलेल्या योजना युद्धपातळीवर पूर्ण करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या सर्व विकासकामांसाठी महायुतीच्या उमेदवारांना जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत निवडून देण्याचे आवाहन आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांनी शेवटी केले.

## रांजणी येथे घरफोडी; २५ हजारांचे सोन्याचे मंगळसूत्र चोरीस

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ फेब्रुवारी -**

शिराढोण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रांजणी (ता. कळंब, जि. धाराशिव) येथे अज्ञात व्यक्तीने घरफोडी करून सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी शिराढोण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सुवर्णा केदारनाथ गोरे (वय ३७, रा. रांजणी) यांच्या दिराच्या घराचा दरवाजाचा कोंडा अज्ञात व्यक्तीने दि.२९ जानेवारी रोजी रात्री ११ ते दि.३० जानेवारी रोजी सकाळी ५ वाजण्याच्या सुमारास तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील २.५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी मंगळसूत्र, अंदाजे २५ हजार रुपये किमतीचे, चोरून नेण्यात आले.

या घटनेबाबत फिर्यादी सुवर्णा गोरे यांनी दि.२ फेब्रुवारी रोजी शिराढोण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास शिराढोण पोलीस करत असून, अज्ञात आरोपीचा शोध घेण्यासाठी परिसरातील नागरिकांकडून माहिती घेतली जात आहे. सलग घरफोडीच्या घटनांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## उमरगा येथे बालविवाह प्रतिबंधक कायद्याबाबत जनजागृती कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.३ फेब्रुवारी -**

उमरगा येथील आयएसओ मानांकित जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ बाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा न्यायालयातील ज्येष्ठ विधिज्ञ तसेच उमरगा जनता बँकेचे व्हाइस चेअरमन ॲड. व्ही. एस. आळंगे प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक पद्माकर मोरे हे होते. तसेच धनराज तेलंग व विद्यानंद सूत्रावे यांची उपस्थिती होती.

ॲड. आळंगे यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, मुलाचे वय २१ वर्षे व मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यावरच विवाह कायदेशीर मान्य होतो.

यापेक्षा कमी वयात होणारा विवाह हा बालविवाह ठरतो आणि तो कायद्याने गुन्हा आहे. बालविवाह रोखण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढे येणे आवश्यक असून, घरात, शेजारी किंवा परिसरात बालविवाह होत असल्याचे आढळल्यास विद्यार्थ्यांनी सामाजिक संघटना, शाळेचे मुख्याध्यापक किंवा शिक्षकांना तत्काळ माहिती द्यावी, असे त्यांनी आवाहन केले.

लहान वयात लग्न केल्यामुळे अनेक सामाजिक, शैक्षणिक व



आरोग्यविषयक समस्या निर्माण होतात.

मुलीने सज्ञान होऊन विवाह केल्यास दोन्ही कुटुंबांचा विकास होतो, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाग्यश्री पंडित यांनी केले. प्रास्ताविक मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी मांडले, तर आभार सोनाली मुसळे यांनी मानले.

यावेळी शाळेतील बशीर शेख, सदानंद कुंभार, नागेश स्वामी, प्रवीण शिंदे, संजय रूपाजी, वर्षाराणी पाटील, धनराज गाडेकर, नागसेन बनसोडे, राजू सरपे, डी. सी. कांबळे, के. एस. चिकले आदी शिक्षकांसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तुळजापूर न.प.च्या पहिल्या सर्वसाधारण सभेत काँग्रेस नगरसेवकांचा प्रशासनावर आरोप

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३ फेब्रुवारी -**

तुळजापूर नगरपरिषदेची पहिली सर्वसाधारण सभा पार पडल्यानंतर काँग्रेसच्या सर्व नगरसेवकांनी काँग्रेस कार्यालयात पत्रकार परिषद घेऊन मुख्याधिकाऱ्यांनी वारंवार मागणी करूनही टिप्पणी देण्यास टाळाटाळ केल्याची खंत व्यक्त केली. टिप्पणी देणे बंधनकारक असतानाही मुख्याधिकाऱ्यांनी उदासीन भूमिका दिसून येत असल्याचा आरोप विरोधी नगरसेवकांनी केला.

या पत्रकार परिषदेस काँग्रेसचे गटनेते तथा नगरसेवक अमोल कुतवळ, तसेच रणजीत इंगळे, आनंद जगताप, अक्षय परमेश्वर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना काँग्रेस नगरसेवकांनी शहरातील स्वच्छतेचा मुद्दा उपस्थित करत सांगितले की, ज्या कंपनीला स्वच्छतेचा ठेका देण्यात आला आहे त्या कंपनीवर अनेक आरोप असून ती कंपनी ब्लॅकलिस्टमध्ये असताना आर्थिक लागेबांधे असल्याने ठेका दिला का? असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. मुख्याधिकारी ठेकेदाराचर जावई लाड का करत आहेत, ब्लॅकलिस्ट झालेल्या कंपनीचे रिटेंडरिंग करावे,





अशी मागणीही करण्यात आली. शहराची लोकसंख्या ५० ते ५५ हजार असताना केवळ ५० ते ५५ कामगारांवर संपूर्ण शहराची स्वच्छता कशी होणार? असा सवाल उपस्थित करण्यात आला. नगरपालिकेचा कारभार सुरू होऊन ४२ दिवस झाले असतानाही प्रभाग क्रमांक ८, ९ व १० कडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप करण्यात आला. केवळ विरोधी नगरसेवकांचे प्रभाग असल्यामुळे या भागांकडे दुर्लक्ष होत असल्याचे काँग्रेस नगरसेवकांचे म्हणणे आहे. जनतेने सत्ताधारी व विरोधक दोघांनाही निवडून दिले असल्याने संपूर्ण शहराचा समान विकास करावा, अशी मागणी त्यांनी केली. संबंधित प्रभागांमध्ये स्वच्छता न झाल्यास त्या भागातील कचरा मुख्याधिकारी व नगराध्यक्षांच्या दालनात टाकून लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला.

नळपट्टी वाढीच्या मुद्द्यावर बोलताना नगरसेवक अमोल कुतवळ म्हणाले की, शहरात हजार ते दीड हजार अनधिकृत नळ कनेक्शन आहेत.

ती कनेक्शन तोडल्यास नळपट्टी वाढवण्याची गरज भासणार नाही. क-वर्ग नगरपालिकेच्या तुलनेत सध्याची नळपट्टी आधीच जास्त असून नागरिकांना एक दिवसाआड पाणीपुरवठा केला जात असल्याने नळपट्टी वाढीस काँग्रेसचा विरोध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच महाराष्ट्र नगर रचना अधिनियम १९६६ मधील कलम १२७ व ४९ नुसार प्राप्त अर्जावरील आरक्षण विकसित व भूसंपादनाबाबत सविस्तर चर्चा व स्पष्ट उल्लेख नसल्याबद्दलही काँग्रेस नगरसेवकांनी नाराजी व्यक्त केली.

### पहिलीच सर्वसाधारण सभा...

नगरपरिषदेची पहिली सर्वसाधारण सभा सोमवारी दुपारी नगरपरिषद सभागृहात पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष विनोद गंगणे होते. सभेस सत्तारूढ पक्षाचे १६ नगरसेवक व विरोधी पक्षाचे ५ नगरसेवक उपस्थित होते, तर भाजपच्या दोन महिला नगरसेविका अनुपस्थित होत्या. आठवडा बाजार मंगळवारऐवजी बुधवार घेण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच शहरातील नगरपरिषदेच्या मोकळ्या जागांवर शॉपिंग सेंटर उभारण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. वाढत्या पाणीपुरवठा खर्चामुळे पाणीपट्टीत वाढ तसेच व्यावसायिक घरांवर करवाढ करण्यास मंजुरी देण्यात आली.

## तुळजापूर पोलीसांकडून प्रतिबंधीत गुटखा व तत्सम पदार्थांची जप्ती

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ फेब्रुवारी -**

तुळजापूर पोलीस ठाण्याच्या पथकाने दि.२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी १०.०५ वाजता नविन बसस्थानकाजवळील कारखान्याजवळ तपासणी दरम्यान आरोपी किरण अनिल जाधव (वय २१ वर्षे, रा. शुक्रवार पेठ, खडकाळ गल्ली, तुळजापूर) याच्याकडून शासनाच्या आदेशाने प्रतिबंधीत गुटखा व तत्सम पदार्थ जप्त केले आहेत.

जप्त करण्यात आलेल्या वस्तूंपैकी मुख्य आहेत: विमल पान मसाला, डायरेक्टर गुटखा, आर एम डी, बादशाहा, गोवा इत्यादी, एकूण किंमत ५७,७२० रुपये आहे.

या प्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, आरोपीविरुद्ध कारवाई सुरु करण्यात आली आहे.

# धाराशिव जिल्ह्यातील ४२८ ग्रामपंचायतींवर येणार प्रशासकराज !

### वरिष्ठ क्षेत्रीय अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून होणार नेमणूक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ फेब्रुवारी -**

ग्रामपंचायत स्तरावर पाच वर्षे सत्ता उपभोगलेले गाव कारभारी आता पुढील आठ दिवसांत पदावरून हटणार असून, जिल्ह्यातील ४२८ ग्रामपंचायतींचा कारभार पुढील चार महिने प्रशासकांच्या हाती जाणार आहे. संबंधित ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपल्यामुळे लोकप्रतिनिधींच्या ऐवजी प्रशासकीय व्यवस्था लागू करण्यात येत आहे.

जिल्ह्यातील जानेवारी - फेब्रुवारी २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ४२८ ग्रामपंचायतींवर प्रशासकीय राजवट लागू करण्यात येणार आहे. धाराशिव जिल्ह्यात एकूण ६२२ ग्रामपंचायती आहेत. या ग्रामपंचायतींच्या निवडणुका एकूण दोन टप्प्यांत झाल्या होत्या. त्यामध्ये पहिल्या टप्प्यात ४२८ ग्रामपंचायतींच्या निवडणुका पार पडल्या होत्या.





क्षेत्रीय अधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्याबाबत जिल्हा परिषदेतून हालचालींना वेग आला आहे. सर्व ग्रामपंचायतींवर वरिष्ठ क्षेत्रीय अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नेमणूक होणार आहे. सध्या जिल्हा परिषदेत या संदर्भात कामकाज सुरू असून, याच आठवड्यात कोणत्या ग्रामपंचायतीवर कोण प्रशासक असणार, याबाबत अंतिम निर्णय होणार आहे.

पाच वर्षांपूर्वी कोरोना काळातच जानेवारी २०२१ मध्ये या ४२८ ग्रामपंचायतींच्या पंचवार्षिक निवडणुका पार पडल्या होत्या. त्यांचा कार्यकाल आता पूर्ण झाला असून, या डिसेंबर - जानेवारी या कालावधीत होणे अपेक्षित होते. मात्र, मुदतीत या निवडणुका न झाल्यामुळे ४२८ ग्रामपंचायतींची मुदत याच आठवड्यात संपत आहे. या ठिकाणी दिनांक ९ फेब्रुवारीपासून प्रशासक कारभार हाकणार आहेत.

सध्या राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समितींच्या निवडणुका सुरू आहेत. या निवडणुकांचे मतदान ७ फेब्रुवारी रोजी होणार असून, ९ फेब्रुवारी रोजी त्यांचा निकाल जाहीर करण्यात येणार आहे.

या निवडणुका पार पडल्यानंतर उर्वरित जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्यात येणार आहे. त्या निवडणुकांसाठी साधारण एक महिन्याचा कालावधी लागेल. त्यानंतर ग्रामपंचायत निवडणुकांची तयारी करण्यासाठी प्रशासनाला दोन ते अडीच महिन्यांचा कालावधी लागेल आणि त्यानंतर ग्रामपंचायतींच्या निवडणुका पार पडतील.

या सर्व गोष्टी वेळेत पूर्ण झाल्यास मे महिन्यात जिल्ह्यातील ४२८ ग्रामपंचायतींच्या निवडणुका होऊ शकतात. त्यामुळे तोपर्यंत ग्रामपंचायतींचा कारभार हाकण्यासाठी प्रशासकांना अधिकार देण्यात येणार आहेत.

### मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींची संख्या...

धाराशिव ६६, तुळजापूर ५३, उमरगा ४९, लोहारा २६, कळंब ५९, वाशी ३४, भूम ७१, परंडा ७०, एकूण : ४२८

### विस्तार अधिकारी असणार प्रशासक!...

मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून विस्तार अधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत आदेश आहेत. मात्र, ग्रामपंचायती आणि उपलब्ध अधिकारी संख्या यांच्यात प्रचंड तफावत आहे. त्यामुळे शासनाकडे मार्गदर्शन मागविण्यात येत आहे. सध्या ग्रामपंचायतींसोबतच कृषी, शिक्षण, पशुसंवर्धन विभागाचे विस्तार अधिकारी तसेच अंगणवाडी पर्यवेक्षक अशा संवर्गातील अधिकाऱ्यांना प्रशासक म्हणून नियुक्त देण्यासाठी प्रशासकीय पातळीवर हालचाल सुरू आहे.

प्रशासकांच्या काळात गाव विकासाची कामे ठप्प होण्याची भीती व्यक्त होत आहे. प्रशासक नेमण्याऐवजी पदावर असलेल्या सरपंचांना मुदतवाढ द्यावी अशी मागणी होत होती. मात्र ही मागणी घटनेला धरून नसल्यामुळे राज्य सरकारने अखेर प्रशासक नेमण्याची प्रक्रिया सुरू केली. उन्हाळा सुरू होत असल्यामुळे बऱ्याच गावांना पाणी टंचाईच्या झळा जाणवू शकतात. हे प्रश्न आता प्रशासकांनाच सोडवावे लागणार आहेत.

प्रशासकांना साधारण चार ते पाच महिन्यांच्या कालावधी मिळण्याची शक्यता आहे. निवडणुका होईपर्यंत ग्रामपंचायतींचा कारभार प्रशासकांमार्फत चालवला जाणार असून, लोकनियुक्त प्रतिनिधी नसल्याने ग्रामपातळीवरील राजकीय घडामोडींना तात्पुरता विराम मिळणार आहे.

# मातोश्री पापड उद्योगाला महाराष्ट्र बिजनेस आयकॉन पुरस्कार

## अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते उद्योजक धीरजकुमार भनगीरे यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०३ फेब्रुवारी :** लातूरच्या मातोश्री पापड उद्योगाला नाशिक येथे झालेल्या पुरस्कार सोहळ्यात अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते ''महाराष्ट्र बिजनेस आयकॉन अवॉर्ड'' हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. लातूरचे भूमिपुत्र धीरजकुमार भनगीरे आणि त्यांच्या मातोश्री सौ आयोध्या पांडुरंग भनगीरे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

एका सामान्य कुटुंबातून येत, स्वतःची जिद्द आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर आज उद्योग क्षेत्रात स्वतःची ओळख निर्माण करून एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणून धीरजकुमार भनगीरे समोर आले आहेत. मुंबई विद्यापीठातून मार्केटिंगमध्ये पूर्ण केल्यानंतर त्यांनी लॉजिस्टिक क्षेत्रात काही काळ नोकरी केली. मात्र, स्वतःचे काहीतरी वेगळे करण्याची ओढ त्यांना उद्योजकतेकडे घेऊन आली.

गुजरात, राजस्थान अशा राज्यांतून आपल्या भागामध्ये पापडांची भरपूर प्रमाणात आयात असल्याचे त्यांच्या लक्षात आले अशा प्रकारचा उद्योग आपल्या भागात कमी पडत असल्याचे त्यांना जाणवले म्हणून आईच्या घरगुती पापड बनवण्याच्या व्यवसायाला त्यांनी व्यावसायिक रूप देण्याचे ठरवले. आणि २०१८ मध्ये ''मातोश्री फूड्स अँड स्पायसेस'' ची मुहूर्तमेढ रोवली. आज हा ब्रँड आधुनिक तंत्रज्ञान आणि अस्सल पारंपरिक चवीचे एक समीकरण बनला आहे.

आधुनिक तंत्रज्ञान आणि उत्पादनाचा विस्तार करत भेसळ न करता एकदम ओरिजनल कॉलिटी चे उत्पादने ग्राहकांपर्यंत पोहोचवत त्यांनी स्वतःचा वेगळा ग्राहक वर्ग निर्माण केला आहे.

आज मातोश्री पापड मोठ्या स्तरावर विस्तारले असून, अत्याधुनिक यंत्रसामग्रीच्या मदतीने उत्पादनाची क्षमता मोठ्या प्रमाणावर वाढवण्यात आली आहे. यंत्रांच्या साहाय्याने उत्पादन करताना पदार्थांची घरची अस्सल चव जपण्याला धीरजकुमार यांनी प्रथम प्राधान्य दिले आहे. ग्राहकांच्या आवडीचे उडीद पापड, नाचणी पापड, तांदूळ पापड, पोहे पापड, उपवासाचे पापड, शेवई, कुरडई आणि बाजरीची खारुडी असे विविध पारंपरिक आणि वाळवणाच्या पदार्थांना त्यांनी एकाच छत्राखाली ग्राहकांना उपलब्ध करून दिले असल्याने लातूर जिल्ह्यातच नव्हे तर पूर्ण देशभर त्यांच्या उत्पादनांना प्रचंड प्रतिसाद आहे.एका छोट्या घरगुती व्यवसायाला मोठ्या उंचीवर नेऊन महिला सबलीकरण आणि रोजगार निर्मितीला त्यांनी हातभार लावला आहे.

धीरजकुमार भनगीरे यांच्या यशाची दखल राष्ट्रीय स्तरावर घेऊन रिसील.इन यांच्या वतीने आयोजित सोहळ्यात, मराठी चित्रपटसृष्टीतील दिग्गज अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते त्यांना दि. २७ जानेवारी २०२६ रोजी नाशिक येथे ''महाराष्ट्र बिझनेस आयकॉन अवॉर्ड २०२५'' हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तसेच लातूर कृषी विभागाने या उद्योगास प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजने मार्फत चालना दिली गेली असल्याने हा पापड उद्योग लातूर जिल्ह्यातील सर्व प्रकारचे पापड उत्पादित



करणारे पहिले आणि सर्वात मोठे युनिट आहे. या पुरस्काराचे श्रेय धीरजकुमार यांनी त्यांच्या आईला आणि कुटुंबाला दिले आहे. त्यांचा हा प्रवास अनेक तरुण उद्योजकांसाठी प्रेरणादायी ठरत असून त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## संक्षिप्त...

### थेरगाव येथे संत रविदास महाराज यांची ६४९वी जयंती साजरी



**शिरूर आनंतपाळ :** तालुक्यातील थेरगाव येथे चर्मकार समाजाच्या वतीने दि. १ फेब्रुवारी रोजी संत रविदास महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. रविदास जयंती दरवर्षी माघ पौर्णिमेला चर्मकार समाजाच्या वतीने श्रद्धेने व भक्ती भावाने साजरी केली जाते. त्यांच्या कृतीने विचार आणि भक्तीने संत रविदास यांनी समाजातील असमानता आणि भेदभावच्या प्रचलित कल्पनांना आव्हान दिले होते. गुरु रविदास हे भक्ती चळवळीतील एक प्रसिद्ध व्यक्तिमत्व होते हिंदू कॅलेंडरनुसार रविदास जयंती माघ पौर्णिमेला केली जाते. म्हणुन याच पौर्णिमे दिवशी थेरगाव येथील चर्मकार समाजाच्या वतीने

संत शिरोमणी रविदास महाराज यांच्या प्रतिमेचे विधीवत पूजन शिवदास सुर्यवंशी यांच्या हस्ते करून विन्रम अभिवादन करण्यात आले. तसेच यावेळी समाजाच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी उपस्थित नामांकित पेंटर रविदास सुर्यवंशी, गोवर्धन सुर्यवंशी, हरीदास सुर्यवंशी, बालाजी हौसे, धनाजी सुर्यवंशी, शिवदास सुर्यवंशी, तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

### जवळगा मतदारसंघात रामलिंग शेरे यांचा झंझावात

**वलांडी/रियाज मोमीन**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी प्रचार यंत्रणा आता अंतिम टप्प्यात पोहोचली असून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. जवळगा जिल्हा परिषद गटात भाजपाचे उमेदवार रामलिंग शेरे यांचा प्रचार अक्षरशः मतदारांच्या चुलीपर्यंत पोहोचल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. घराघरात जाऊन, भाकरी करणाऱ्या महिलांशी थेट संवाद साधत शेरे मतदारांना मतदानाचे आवाहन करत आहेत.जवळगा जिल्हा परिषद गटात प्रचाराला वेग आला असून भाजपाने सामान्य कार्यकर्त्याला उमेदवारी देत वेगळा संदेश दिला आहे. संभाजीरावांचे निष्ठावंत कार्यकर्ते व अक्का फाऊंडेशनचे समन्वयक असलेले रामलिंग शेरे यांना उमेदवारी देत भाजपाने तळागाळातील कार्यकर्त्यांना न्याय दिल्याची चर्चा आहे.सामान्य कार्यकर्त्याला उमेदवारी मिळाल्याने तरुण वर्ग मोठ्या उत्साहाने प्रचारात सहभागी झाला आहे. व्हॉट्सप, फेसबुक, इन्स्टाग्राम, टेलिग्राम व स्नॅपचॅट या सोशल मीडियाच्या माध्यमातून व्हिडिओ व ऑडिओ क्लिप्स व्हायरल केल्या जात असून भाजपाच्या प्रचाराला डिजिटल माध्यमातून चांगलाच वेग मिळत आहे. रामलिंग शेरे यांना निवडून आणण्याचा निर्धार तरुणांनी केला असून, जवळगा मतदारसंघात भाजपाचा प्रचार झंझावाती रूप धारण करत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

### बोलीमुळेच मराठी भाषा व संस्कृती समृद्ध होते – डॉ.सुनीता सांगोले

**लातूर :** मराठी भाषा संवादाचे प्रभावी माध्यम असून ती विविध बोलींनी नटलेली समृद्ध भाषा आहे.महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात बोलल्या जाणाऱ्या बोली मराठी भाषेच्या वैभवाचे प्रतीक आहेत.मराठी भाषेत कोकणी,पुणेरी,अहिराणी,मालवणी,माणदेशी,बेळगावी अशा विविधांगी बोली बोलल्या जातात.बोली ह्या भाषेचा भाग असतात,त्यातून समाजाची संस्कृती व परंपरा समृद्ध होते.बोलीच भाषेला समृद्ध करत असतात.प्रमाणभाषा ही लिखित असते.पण मनातल्या अंतरिक भावना बोलीतूनच सक्षमपणे मांडता येतात.बोलीत अनेक प्रभावी म्हणी,वाक्यप्रचार आहेत.याशिवाय आकलनाचा परिघ रूंदावण्यासाठी बोलीच महत्त्वाच्या आहेत.म्हणूनच बोलीविषयी मनात असलेले गैरसमज व न्यूनगंड टाळले पाहिजे.कारण बहिणाबाईने बोलीतूनच अप्रतिम काव्याची निर्मिती केली.बोलीचे सौंदर्य जपले पाहिजे.लहान वयापासूनच बोलीतूनच संस्कार होतात.बोलीसंदर्भात जास्तीत जास्त संशोधन झाले पाहिजे आणि मराठीतील बोलीचे जतन व संवर्धन झाले पाहिजे,असे प्रतिपादन लातूर येथील दयानंद कला महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.सुनीता सांगोले यांनी केले.

# मुख्यमंत्र्यांचे औसा मतदारसंघावर विशेष लक्ष : आ. अभिमन्यू पवार

**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि. ०३ फेब्रुवारी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे औसा मतदारसंघाच्या विकासासाठी विशेष लक्ष असून नागपूरच्या विकास निधीच्या तुलनेतही औसा मतदारसंघाला लक्षणीय निधी देण्यात आला आहे. त्यामुळे राज्यातील झपाट्याने विकसित होणाऱ्या दहा मतदारसंघांपैकी औसा मतदारसंघा एक ठरत आहे. केंद्रात व राज्यात भाजपचे सरकार आहे. औसा मतदारसंघाचा आमदार भाजपचा आहे आणि आता पंचायत समिती व जिल्हा परिषदेमध्येही भाजपचे प्रतिनिधित्व आवश्यक असून सर्व स्तरांवर भाजपचे प्रतिनिधित्व असेल, तर विकासकामांना अधिक गती मिळते आणि निधी आणण्यात कोणतीही अडचण राहत नाही असा विश्र्वास आमदार अभिमन्यू पवार यांनी व्यक्त केला आहे.

औसा तालुक्यातील बोरफळ येथे आयोजित जाहीर प्रचारसभेत बोलत होते. यावेळी मंचावर माजी आमदार दिनकरराव माने, सरपंच बजरंग जमादार, छाया पद्माकर चिंचोलकर,भाग्यश्री यादव आदीसह पदाधिकारी उपस्थित होते.

आमदार अभिमन्यू पवार म्हणाले, दिलीपराव देशमुख यांनी एकदा फोन करून शेतकऱ्यांच्या ऊस प्रश्नाबाबत विनंती केली. केवळ एका फोनवर मुख्यमंत्री तत्कालीन एकनाथ शिंदे



आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून मंत्रिमंडळाची मान्यता मिळवली आणि बेलकुंड कारखान्यासाठी १०९ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला. हा कारखाना शेतकऱ्यांचा आहे, त्यांच्या मदतीसाठी आहे. त्यामुळे आम्ही विकासाचे सकारात्मक राजकारण करतो.असे सांगून ते पुढे म्हणाले गावागावातील रस्ते, अंतर्गत रस्ते, नाल्या, पाणीपुरवठा, वीज व्यवस्था, शेतकऱ्यांसाठी सिंचन सुविधा, औद्योगिक विकास आणि रोजगारनिर्मिती यासाठी मोठ्या प्रमाणावर कामे सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. बेलकुंड एमआयडीसीच्या माध्यमातून स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे, जेणेकरून पुढील पिढीला पुणे, मुंबईसारख्या शहरांकडे स्थलांतर करावे लागणार नाही, असेही त्यांनी नमूद केले.

पाण्याच्या प्रश्नावर बोलताना आमदार पवार म्हणाले , पश्र्चिम वाहिन्यांमधून समुद्रात वाहून जाणारे पाणी उचलून लातूर, धाराशिव आणि बीड जिल्ह्यांसाठी राखीव ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यामुळे औसा मतदारसंघातील दुष्काळी परिस्थिती कायमस्वरूपी दूर होण्यास मदत होणार आहे.शेवटी मतदारांना आवाहन करताना आमदार अभिमन्यू पवार म्हणाले, विकासाचा वेग अधिक वाढवायचा असेल, तर पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेमध्येही भाजपला संधी द्या. सर्व स्तरांवर एकाच विचाराचे नेतृत्व असल्यास औसा मतदारसंघाचा विकास अधिक जलद आणि प्रभावीपणे होईल.असे मत आ. पवार यांनी व्यक्त केले.

# औसा आगाराकडून प्रवाशांना सापत्न वागणूक

**तभा वृत्तसेवा/प्रमोद सुरवसे**

**लातूर, दि. ०३ फेब्रुवारी :** औशातील जवळपास ऐंशी टक्के लोक लातूरला विविध कामानिमित जात असतात. यात विदयार्थी. व्यापारी, नोकरदार आणि करमत नाही म्हणून लातूरला जाऊन येऊ म्हणणारे हौशी अवलिये यात नोकरदार सोडले तर बाकी साधारपणे दुपारीच औशाला वापस जातात.

खरी परीक्षा होते ती नोकरदारांची कारण संध्याकाळी साडेसात सातपर्यंत औशाला येण्यासाठी बस मिळतात त्यानंतर मग सोलापूर, निलंगा, उमरगा या बसनी औसामोड कधीतरी नवीन बसस्टॅन्ड यात औसा आगाराची बस असते. ती म्हणजे लातूर ते सोलापूर जाणारी. याबस मध्ये औ शाचे प्रवाशी घेतले जात नाहीत. औसा आगाराची बस आहे का घेत नाही असे विचारले असता ही जादाची बस असल्याने थेट सोलापूरला जात असल्याचे कंडक्टर म्हणतात.

जादा बस असली म्हणजे प्रवाशी घेयचे नाहीत हा कुठला न्याय यात आगाराकडून



तशा सूचना आहेत की कंडक्टर मनमानी करतात हा वादाचा विषय आहे.

पूर्वी एस टी चे घोषवाक्य होते. हात दाखवा गाडी थांबवा. तेव्हा बरे असायचे कोणत्याही बस मधून प्रवास करायला यायचा पण आता सगळे.

औसा आगाराची बस औशाकडेच जाणारी पण औ शाच्या प्रवाशांना त्या बसमध्ये प्रवास करण्याची मुभा नाही हे विचित्र आहे. या प्रकरणात जो दोषी असेल त्यावर कारवाई होणे गरजेचे आहे असे असंख्य प्रवाशांचे मत आहे.

## अहिल्याबाई बंडगर यांनी साधला मतदारांशी संवाद

**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ, दि. ०३ फेब्रुवारी :** : येरोळ जिल्हा परिषद गट, पंचायत समिती गणाच्या प्रचाराचे वातावरण तापले आहे. काँग्रेसच्या येरोळ पंचायत समिती गणाच्या उमेदवार अहिल्याबाई प्रभाकर बंडगर यांनी दैठणा गावात भव्य प्रचार रॅली काढून मतदारांशी संवाद साधला व समस्या जाणून घेतल्या.शिरूर अनंतपाळ पंचायत समितीच्या येरोळ गणात काँग्रेस, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये तिरंगी लढत होत आहे.

येरोळ पंचायत समिती गणाअंतर्गत येरोळसह, दैठणा, सुमठाणा, डिगोळ, चामरगा, बोळेगाव, धामणगाव, कारेवाडी, पांढरवाडी, हणमंतवाडी, जाभंळवाडी दगडवाडी, जोगाळा ही गावे येतात. येथील येरोळ पंचायत समिती गणात काँग्रेसच्या वतीने अहिल्याबाई बंडगर यांनी हजारो सर्मथकांच्या उपस्थितीमध्ये निवडणूक अर्ज भरून जोरदार प्रचारास सुरवात केली.

# कॉन्शिअस सेडेशन – बाल दंत उपचारातील सुरक्षित व प्रभावी पद्धत : डॉ. विश्वास पाटील

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०३ फेब्रुवारी :** बाल दंत रोग उपचारांमध्ये मुलांची भीती, चिंता व वेदना कमी करून सुरक्षित आणि प्रभावी उपचार करण्यासाठी 'कॉन्शिअस सेडेशन' ही आधुनिक उपचार पद्धत अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. या पद्धतीमुळे मुलांमध्ये दंत उपचाराची भीती दूर होऊन उपचार प्रक्रिया अधिक सुलभ, सकारात्मक व रुग्णस्नेही बनते, असे प्रतिपादन पुणे येथील बाल दंत रोग तज्ज्ञ डॉ. विश्वास पाटील यांनी केले.

येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाच्या बाल दंत रोग विभागातर्फे 'बियोंड फिअर – कॉन्शिअस सेडेशन इन प्रॅक्टिस' या विषयावर आयोजित एक दिवसीय कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ विश्र्वास पाटील बोलत होते. या वेळी महाराष्ट्र राज्य दंत परिषदेचे निरीक्षक डॉ. मुकेश अर्दाळे, प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, उप प्राचार्य डॉ. यतिश कुमार जोशी, विभाग प्रमुख डॉ. महेश दडपे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. विश्र्वास पाटील म्हणाले की, कॉन्शिअस सेडेशन ही दंत उपचारांदरम्यान वापरली जाणारी सुरक्षित, वेदनाशामक व चिंता कमी करणारी पद्धत असून या प्रक्रियेत बाल रुग्ण पूर्णपणे शुद्धीत असतो. मात्र उपचारादरम्यान भीती, तणाव व वेदना लक्षणीयरीत्या कमी होतात. ही पद्धत जनरल ॲनेस्थेशियापेक्षा अधिक सुरक्षित मानली जाते.

'बियोंड फिअर' म्हणजे भीतीपलीकडे जाऊन उपचार करणे होय. बाल रुग्णांमध्ये सुई, दंत उपकरणांचा आवाज तसेच पूर्वीचे त्रासदायक अनुभव यांमुळे दंत उपचार करणे कठीण होते. मात्र कॉन्शिअस सेडेशनमुळे ही भीती कमी होऊन दंत चिकित्सक व रुग्ण यांच्यात सकारात्मक सहकार्य निर्माण होते. ३ ते १४ वयोगटातील मुले, अत्यंत भीतीग्रस्त किंवा सहकार्य न करणारी मुले, दीर्घ व वेदनादायक उपचार आवश्यक असलेले रुग्ण तसेच विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी ही पद्धत विशेष प्रभावी ठरते, असे त्यांनी सांगितले. या उपचारांमध्ये नायट्रस ऑक्साइड–ऑक्सिजन इनहेलेशन सेडेशन ही सर्वाधिक वापरली जाणारी पद्धत आहे. मास्कद्वारे नायट्रस ऑक्साइड व ऑक्सिजन दिल्यानंतर काही मिनिटांतच रुग्ण शांत होतो, चिंता व वेदना कमी होतात आणि आनंदी भावना निर्माण होतात. ही पद्धत सुईविरहित, सुरक्षित, जलद परिणाम देणारी असून उपचारानंतर रुग्ण लगेच घरी जाऊ शकतो.

कॉन्शिअस सेडेशन करताना रुग्णाची सविस्तर वैद्यकीय माहिती, योग्य रुग्ण निवड, प्रशिक्षित दंत चिकित्सक व कर्मचारी, ऑक्सिजन सॅच्युरेशन व हृदय गतीचे सतत निरीक्षण तसेच आपत्कालीन औषधे व उपकरणांची उपलब्धता आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट करुन तज्ज्ञांच्या देखरेखीखाली उपचार केल्यास ही पद्धत अत्यंत सुरक्षित असल्याचे त्यांनी नमूद केले.

# वैभवी मानेचे राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेत रौप्यपदक

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. ०३ फेब्रुवारी :** इंफाळ (मणिपूर) येथे आयोजित करण्यात आलेल्या ६९ व्या नॅशनल स्कूल गेम्स अंतर्गत १९ वर्षांखालील राष्ट्रीय तलवारबाजी (फेन्सिंग) स्पर्धेत लातूर जिल्ह्याची खेळाडू वैभवी प्रशांत माने हिने उल्लेखनीय कामगिरी करत इप्पी सांघिक प्रकारात रौप्यपदक पटकावले.

वैभवी प्रशांत माने सध्या महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर येथे इयत्ता बारावी सायन्स वर्गात शिक्षण घेत असून, येत्या काही दिवसांत तिच्या बारावीच्या परीक्षा सुरू होणार आहेत. अभ्यास आणि क्रीडा क्षेत्र या दोन्हींचा समतोल साधत तिने मिळवलेले हे यश विशेष कौतुकास्पद ठरत आहे.

या राष्ट्रीय स्पर्धेत देशभरातून विविध राज्यांतील उत्कृष्ट खेळाडूंनी सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या लढतींमध्ये वैभवीने आपल्या संघासोबत उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य, संयम आणि आत्मविश्वास दाखवत अंतिम फेरीपर्यंत मजल मारली व रौप्यपदकावर आपले नाव कोरले.

वैभवी प्रशांत माने हिला शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त प्रा. दत्ता भाऊ गलाले, वजीरोदीन काजी, मोसिन शेख, रोहित गलाले, आकाश बनसोडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. गुणवंत खेळाडूंचे जिल्हा क्रीडा कार्यालय लातूर, शिवछत्रपती क्रीडा



जीवनगौरव पुरस्कार प्राप्त गणपतराव माने, सिनेट सदस्य डळढचण, छरपवशव श्री. तळपेव चरपश ,लातूर तलवारबाजी संघटनेचे अध्यक्ष अभिजीत मोरे, प्रा. शरद माने, मु. अ. प्रशांत माने, संतोष कदम, वैभव कज्जेवाड, मेहफूजखान पठाण लातूरच्या सर्व क्रीडाप्रेमींनी अभिनंदन केले आहे.

वैभवी प्रशांत माने हिला तिच्या या दैदीप्यमान यशाबद्दल हार्दिक हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

# ध्येय सिद्धीसाठी जिज्ञासू राहून सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक – डॉ.अशोक मोटे

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. ०३ फेब्रुवारी :** विद्यार्थ्यांनी आपल्या ठरवलेल्या ध्येय सिद्धीसाठी जिज्ञासू राहून सातत्यपूर्ण प्रयत्न केल्यास निश्र्चितच यशप्राप्ती होते असे प्रतिपादन डॉ अशोक मोटे (सिनेट सदस्य, स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड) यांनी केले.

निलंगा तालुक्यातील औराद शहाजनी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शारदोपासक शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष राजेश वलांडे होते. व्यासपीठावर संस्थेचे सचिव रमेश बगदुरे, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ शंकर कल्याणे, पदवी वितरण समारंभ समिती समन्वयक प्रो.मोहन बंडे, प्रा.प्रसाद ताडमुगळीकर, लेफ्टनंट डॉ.जाफर चौधरी, डॉ.सचिन हंचाटे, डॉ.विनोद चिंते, डॉ. विनोद जाधव, डॉ. विजयकुमार पवार, प्रा.विजयकुमार हंडे, डॉ.रितेश व्यास, डॉ. सुचिता किडीले इत्यादी उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ.अशोक मोटे यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात आई–वडीलांच्या कष्टाची कायम जाणीव ठेऊन जिद्द, चिकाटी, आत्मविश्र्वास, शिस्त, सकारात्मक दृष्टिकोन, संयम इत्यादी गुणसंपदा सदैव अंगी बाळगावी असे सांगितले. संपादन केलेली पदवी ही अभ्यासाची फलनिष्पत्ती असून यापुढील काळात स्वावलंबी व सुजाण नागरिक बनून समाजाच्या सर्वांगीण विकासात योगदान द्यावे. विद्यार्थ्यांनी आपल्या



दैनंदिन अभ्यासासोबतच अंगभूत कला व कौशल्ये विकसित करावीत असेही त्यांनी यावेळी सांगितले. अध्यक्षीय समारोप संस्थेचे सचिव रमेश बगदुरे यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्र.प्राचार्य डॉ.शंकर कल्याणे यांनी केले. संगीत विभागप्रमुख प्रा.दुर्गादास सबनीस व विद्यार्थ्यांनी विद्यापीठ गीत सादर केले. राष्ट्रीय छात्र सेना विभागाचे लेफ्टनंट डॉ. जाफर चौधरी यांच्या मार्गदर्शनात रा.छा.से. कॅडेट्सनी विद्यापीठ ध्वज वहनावेळी पायलट दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.आनंद मुसळे यांनी केले व उपस्थितांचे आभार प्रो.मोहन बंडे यांनी मानले.

कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. यावेळेस बी.ए., बी.कॉम., बी.सी.ए. व एम.एस्सी.एस.ई. विद्याशाखेतील एकूण ९५ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

याप्रसंगी संस्था संचालक मडोळय्या मठपती, दगडू गिरबने, अनिल डोईजोडे, प्रा.श्रीकांत ढेबे, विलास होटकर यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते. पदवी वितरण समारंभाच्या अनुषंगाने गठित करण्यात आलेल्या विविध समित्यांमधून प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## मतदानासाठी भरपगारी रजा बंधनकारक; उल्लंघन केल्यास कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ फेब्रुवारी -**

लोकशाही व्यवस्थेत मतदान हा १८ वर्षावरील प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क असून तो बजावण्यासाठी निवडणुकीच्या दिवशी मतदारांना भरपगारी रजा किंवा आवश्यक सवलत देणे बंधनकारक असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्ह्यात जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुका होणार असून, सर्व मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने, खाजगी कंपन्या, हॉटेल्स, मॉल्स, आयटी कंपन्या आदींना कामगारांना भरपगारी रजा देणे बंधनकारक राहणार आहे.

अपवादात्मक परिस्थितीत पूर्ण दिवसाची रजा शक्य नसल्यास किमान दोन ते तीन तासांची विशेष सवलत देणे आवश्यक असून, रजा किंवा सवलत न दिल्यास संबंधित आस्थापनांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही शासनाने दिला आहे. या आदेशामुळे प्रत्येक मतदाराला निर्भयपणे मतदानाचा हक्क बजावता येणार असून लोकशाही अधिक बळकट होणार आहे.



# ठोस विकासाचा आराखडाच आमचा अजेंडा

**शिवसेना (उबाठा) पक्षाचा वचननामा : खा. ओमराजे आणि आ. कैलास पाटील यांच्याकडून जाहिर...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ फेब्रुवारी -**

शेती, शेतकरी, ग्रामीण युवक, महिला व सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात प्रत्यक्ष बदल घडवून आणणारा ठोस विकासाचा आराखडाच आमचा अजेंडा असून, केवळ घोषणा नव्हे तर प्रभावी अंमलबजावणी हेच आमचे धोरण असल्याचे प्रतिपादन खासदार ओमराजे निंबाळकर यांनी केले.

धाराशिव येथे आयोजित पत्रकार परिषदेत शिवसेना (उबाठा) पक्षाचा जिल्हा परिषद निवडणुकीसाठीचा वचननामा जाहीर करण्यात आला. यावेळी आमदार तथा जिल्हा प्रमुख कैलास पाटील, माजी नगराध्यक्ष मकरंदराजे निंबाळकर यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

खासदार ओमराजे निंबाळकर म्हणाले की, शेतीसाठी सिंचन व पाणलोट विकासाच्या कामांना गती देऊन शेतकऱ्यांच्या शेतात पाणी पोहोचवले जाईल. दुष्काळ व अवकाळी संकटांवर कायमस्वरूपी



उपाययोजना करण्यात येतील तसेच शेतमालाला योग्य व हमीभाव मिळवून देण्याचा ठाम संकल्प आहे.

ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्था अधिक दर्जेदार, आधुनिक व सुविधा-संपन्न करण्यात येणार असून, विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षण, क्रीडा सुविधा व स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.

ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांमधील अन्यायकारक दरी दूर करण्यावर भर दिला जाईल.

आरोग्य क्षेत्रात गावपातळीवर सक्षम व विश्वासार्ह सेवा देण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रे बळकट केली जातील. डॉक्टर, औषधे, तपासणी व आपत्कालीन सेवा सहज उपलब्ध करून देण्यात येतील, जेणेकरून उपचाराअभावी एकही जीव जाणार नाही, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

युवकांसाठी कौशल्यविकासाच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी निर्माण केल्या जातील.

स्थानिक गरजांनुसार प्रशिक्षण केंद्रे, उद्योगांशी थेट संलग्नता व स्वयंरोजगाराला चालना देऊन युवकांना रोजगार व स्वाभिमान मिळवून दिला जाईल. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी बचतगट, स्वयंरोजगार व लघुउद्योगांना अर्थसहाय्य, प्रशिक्षण व बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात येईल. महिला स्वावलंबी झाल्याशिवाय कुटुंब व समाज सक्षम होऊ शकत नाही, या भूमिकेतून निर्णय घेतले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले.

पारदर्शक, उत्तरदायी व भ्रष्टाचारमुक्त प्रशासन हा विकासाचा कणा राहील. सत्तेचा उपयोग लुटीसाठी नव्हे तर लोकसेवेसाठी केला जाईल, हे कृतीतून दाखवून देण्यात येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

शेती, शिक्षण, आरोग्य, रोजगार, महिला सक्षमीकरण व पारदर्शक प्रशासनाच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या जीवनात शाश्वत बदल घडवून आणणे हा आमचा ठोस विकासात्मक संकल्प असल्याचे सांगत, मत विकासाला, मत मशालीला असे आवाहन करत उमेदवारांना निवडून देण्याचे आवाहन खासदार ओमराजे निंबाळकर आणि आमदार कैलास पाटील यांनी केले.

## हिप्परगा सय्यद येथे दर्ग्यातील साहित्य चोरी; ५६ हजारांचा मुद्देमाल लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ फेब्रुवारी -**

लोहारा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हिप्परगा सय्यद (ता. लोहारा, जि. धाराशिव) येथे सय्यद बाशा दर्ग्यासाठी साहित्य ठेवण्यात आलेल्या खोलीत अज्ञात व्यक्तीने घरफोडी करून चांदीचे साहित्य चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी शुकुर महताबसाब कारभारी (वय ४५, रा. हिप्परगा सय्यद) यांनी दर्ग्यातील साहित्य साठवण्यासाठी तयार केलेल्या खोलीच्या दरवाज्याची कडी अज्ञात व्यक्तीने दि.२२ जानेवारी रोजी सायंकाळी ६ ते दि.२३ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास तोडून आत प्रवेश केला.

यानंतर खोलीतील सव्वा किलो वजनाचा चांदीचा घोडा व पाऊण किलो वजनाचा चांदीचा घोडा, असे एकूण ५६ हजार रुपये किमतीचे चांदीचे साहित्य चोरून नेण्यात आले.

या घटनेबाबत फिर्यादी शुकुर कारभारी यांनी दि.२ फेब्रुवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

घटनेचा पुढील तपास लोहारा पोलीस करत असून, अज्ञात आरोपीचा शोध घेण्यासाठी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी व स्थानिक नागरिकांकडून माहिती घेतली जात आहे. दर्गा परिसरात चोरीची घटना घडल्याने भाविकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## इटकळ-तुळजापूर रस्त्यावर तरुणीवर चाकूहल्ला; आईलाही मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ फेब्रुवारी -**

नळदुर्ग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील इटकळ ते तुळजापूर रोडलगत चारित्र्यावर संशय घेत तरुणीवर चाकूने हल्ला करून तिला गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी पुजा सुनिल चव्हाण (वय २२, रा. हंगरगा नळ तांडा, ता. तुळजापूर) या दि.३० जानेवारी रोजी दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास इटकळ-तुळजापूर रस्त्यालगत असताना, आरोपी सुनिल खेरु चव्हाण, संजय खेरु चव्हाण, खेरु ठाकरु चव्हाण, सोनाबाई खेरु चव्हाण, सुनिल राठोड, मनिषा संजय राठोड, मिथुन खेरु चव्हाण (सर्व रा. हंगरगा नळ तांडा) यांनी तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन गैरकायद्याची मंडळी जमवली. आरोपींनी पुजा चव्हाण यांना शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी व चाकूने मारहाण करून गंभीर जखमी केले. तसेच त्यांच्या आई जनाबाई यांनाही शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी मारहाण करण्यात आली. यावेळी आरोपींनी जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या घटनेबाबत पुजा चव्हाण यांनी दि.२ फेब्रुवारी रोजी दिलेल्या तक्रारीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## प्रा. युसुफ मुल्ला यांचा राज्यस्तरीय आय.टी. एक्सलंस अवार्ड देऊन गौरव

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ फेब्रुवारी -**

मायक्रोकॉम कंम्प्युटर एज्युकेशनचे संचालक प्रा. युसुफ मुल्ला यांना पुणे येथील ग्लोबल इलाईट मेडीया अँड टेकच्या वतीने दिला जाणारा संगणक क्षेत्रातील प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय आय.टी. एक्सलंस महाराष्ट्र उद्योग गौरव पुरस्कार २०२६ देण्यात आला. हा पुरस्कार प्रसिद्ध सिनेअभिनेत्री उर्मिला कानेटकर यांच्या हस्ते रविवारी (ता.एक) रोजी हिंजवडी (पुणे) येथे देऊन सन्मानित करण्यात आले.

या पुरस्कार सोहळ्याला उद्योजक तथा संचालक महेश व्यवहारे आणि कार्तिकेश बोरकर यांची विशेष उपस्थिती लाभली.

मायक्रोकॉम ही संगणक संस्था गेल्या २६ वर्षापासुन कार्यरत असुन या संस्थेस यापुर्वी अनेक राज्य व राष्ट्रीय पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आले आहे. या संस्थेच्या माध्यमातुन जिल्ह्यातील दहा हजार विद्यार्थ्यांना संगणक साक्षर करण्यात आले.

अनेक बेरोजगार युवकांना संगणक कोर्सच्या माध्यमातुन रोजगार उपलब्ध करुन देण्यात आले आहे. या पुरस्काराबद्दल आमदार प्रविण स्वामी, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, उपनगराध्यक्ष विजय वाघमारे, नगरसेवक विजय दळगडे, प्राचार्य दिलीप गरुड, रोटरीचे माजी प्रांतपाल डॉ. दिपक पोफळे, अध्यक्ष धनंजय मेनकुदळे, सचिव राजु जोशी, प्रा. शौकत पटेल आदींनी अभिनंदन केले आहे. या पुरस्काराबद्दल मायक्रोकॉम संस्थेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या कार्यक्रमासाठी सचिन नाईक, सुप्रीया नाईक यांनी पुढाकार घेतला. गणेश मोडवे यांनी सुत्रसंचलन करून आभार मानले.

## चिवरी येथील महालक्ष्मी यात्रेत लाखो भाविकांनी घेतले दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.३ फेब्रुवारी -**

तुळजापूर तालुक्यातील चिवरी येथील महालक्ष्मी यात्रेत शेकडो भाविकांनी दंडवत घेतला, यावेळी आराधी, वाघ्या, मुरळी पोतराज गीताने मंदिर परिसरात भक्तिमयवातावरण निर्माण झाले होते. दोन दिवस चालणाऱ्या यात्रोत्सवात महालक्ष्मीच्या दर्शनासाठी राज्यासह परराज्यातून हजारो भाविक दाखल झाले होते.

यात्रेनिमित्त सोमवार व मंगळवार च्या मध्यरात्री १२:३० वाजता देवीचा अभिषेक व महापूजा आरती करण्यात आली. यानंतर गाव ते मंदिर या एक किलोमीटर अंतरावर दंडवत व लिंबाच्या पाल्याने रस्ता झाडण्यात आला. यामध्ये गावातील शेकडो भाविकांनी सहभाग नोंदवला होता. मंगळवारी दिवसभरात नवीन पोतराजांना दीक्षा देणे, लहान मुलाचे जावळ काढणे, मानकरी वाणी पाटील, मराठा पाटील यांच्या वाड्यावर जाणे घोंगड्यात भात झेलणे यासह मानपानाची विधी पार





पडले यानंतर रात्री दहा वाजता होमामध्ये धार्मिक विधी पार पडल्यानंतर भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात आला, रात्री शोभेच्या दारूकामासह हलगीच्या वाद्यांमध्ये महालक्ष्मीची पालखीतून भव्य मिरवणूक काढण्यात आली. आज बुधवारी दि.४ फेब्रुवारी रोजी सकाळी सात वाजता पान आणि लिंबू यांचा घाव घेण्याचा कार्यक्रम होणार असून, यानंतर पालखी मानाच्या पुजाऱ्याच्या घरी प्रस्थान करण्यात येणार आहे.

यात्रेनिमित्त मंदिरापासून ते स्नानगृहापर्यत आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. यासाठी सेवानिवृत्त क्षेत्रीय परिवहन अधिकारी पोपट पाटील, देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकर बिराजदार, विवेकानंद पाटील, वसंत काळजाते, भीमा देडे,तुळशीराम शिंदे, ज्ञानदेव झिंगरे, सुरेश भुजबळ, सरपंच शिवकन्या बिराजदार, उपसरपंच लक्ष्मण लबडे, पोलीस पाटील रुपेश बिराजदार, अमोल म्हंकराज, पिंटू बिराजदार, शंकर बिराजदार यांच्यासह देवस्थान ट्रस्ट, यात्रा कमिटी ग्रामस्थ, तंटामुक्ती समिती, युवा प्रतिष्ठान ग्रामस्थ पुढाकार घेतला. सकाळपासूनच मंदिर परिसरात आई राजा उदो उदो च्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. यात्रेसाठी नळदुर्ग पोलीस ठाण्याचे सपोनि. सचिन यादव यांच्या टीमसह तगडा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## पोदार जम्बो किड्सच्या चिमुकल्यांची 'कलबुर्गे फार्म' येथे शैक्षणिक क्षेत्रभेट

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.३ फेब्रुवारी -**

उमरगा शहरातील पोदार जम्बो किड्स शाळेतील नर्सरी, ज्युनिअर व सीनियर केजीच्या विद्यार्थ्यांनी इ.वाय.एफ.एस. अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून कदेर येथील 'कलबुर्गे फार्म' येथे शैक्षणिक क्षेत्रभेट दिली. चिमुकल्यांना प्रत्यक्ष अनुभवातून नवनवीन गोष्टींची ओळख करून देणे व त्यांच्या मनात कुतूहल निर्माण करणे, या उद्देशाने शाळेमार्फत दरवर्षी क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात येते.

या क्षेत्रभेटीदरम्यान कलबुर्गे फार्मचे मालक संभाजी कलबुर्गे



व मीरा कलबुर्गे यांनी विद्यार्थ्यांना गाईच्या गोठ्यातील बाहेरगावाहून आलेल्या गाई, देशी व गिर गाई, वासरे तसेच विविध प्रकारच्या कोंबड्यांची माहिती दिली. यासोबतच केळीच्या बागेतील विविध झाडे दाखवून केळीची लागवड, निगा व केळी कशाप्रकारे परदेशात निर्यात केली जाते याबाबत सविस्तर माहिती दिली.

विद्यार्थ्यांनी या ठिकाणी वनभोजनाचा आनंद घेतला. वर्गशिक्षकांनी मुलांना झाडांचे महत्त्व, त्यांची निगा कशी राखावी याबाबत मार्गदर्शन करून पर्यावरण संवर्धनाबाबत प्रोत्साहन दिले. अभ्यासक्रमासोबतच प्रत्यक्ष अनुभवातून ज्ञान मिळाल्याने विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित झाला.

ही क्षेत्रभेट यशस्वी करण्यासाठी लोटस पोदार लर्न स्कूलचे मुख्याध्यापक बी.पी. सिंग, उपमुख्याध्यापक अतुल फावडे, झगघ प्रमुख मंजिरी सूर्यवंशी तसेच रागिनी जावळे, अनुसया शिंदे, ज्योती काळे, आश्विनी दुधभाते, नीतीप्रिया पांचाळ, अश्विनी पाटील, रेणुका हिरमुखे, विजयालक्ष्मी अंबुसे, प्रतिभा महामुनी, अंजली क्षीरसागर, प्रज्ञा ढोसे व सरस्वती भालके यांनी विशेष परिश्रम घेतले.

### वाहन धोकादायक रस्त्यावर उभे ठेवल्याप्रकरणी दोन गुन्हे नोंद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ फेब्रुवारी -**

तुळजापूर पोलीस ठाण्याच्या पथकाने दि.२ फेब्रुवारी रोजी तुळजापूर बसस्थानकाजवळ सार्वजनिक रस्त्यावर राहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेली वाहने आढळून आल्याने कारवाई केली. याबाबत आरोपी पांडुरंग शेंडगे (रा. ढेकरी, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) आणि तुषार मुंढे (रा. ढेकरी, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) यांच्याकडील अनुक्रमे वाहन क्र. एमएच २५ एम ५८६ आणि एमएच २४ ए ८९२१ ही वाहने राहदारीस धोकादायकरीत्या उभी असल्याचे आढळले.

## जि. प. व पं. स. निवडणुकीसाठी मतदान व मतमोजणी केंद्र परिसरात कलम १६३ लागू

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ फेब्रुवारी -**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०२६ च्या पार्श्वभूमीवर मतदान व मतमोजणी प्रक्रिया शांततेत व निर्भय वातावरणात पार पडावी, तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी जिल्ह्यात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ लागू करण्यात आले आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या सुधारित कार्यक्रमानुसार दि.७ फेब्रुवारी रोजी मतदान तर दि.९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे. या अनुषंगाने जिल्हादंडाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी आदेश जारी केला आहे.

आदेशानुसार मतदान केंद्रापासून १०० मीटर व मतमोजणी केंद्रापासून २०० मीटर परिसरात राजकीय पक्षांची कार्यालये, उमेदवारांचे मंडप, दुकाने, ध्वनीक्षेपके, मोबाईल व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर तसेच फेरीवाल्यांना बंदी घालण्यात आली आहे. निवडणूक कामाव्यतिरिक्त खाजगी वाहनांनाही प्रवेशास मनाई करण्यात आली आहे.

या परिसरात नियुक्त अधिकारी व कर्मचारी वगळता पाच किंवा अधिक व्यक्ती एकत्र येण्यास प्रतिबंध राहील. मात्र मतदानासाठी रांगेत उभे असलेले मतदार या आदेशातून वगळण्यात आले आहेत.

तसेच उमेदवारांच्या निवडणूक चिन्हांचे प्रदर्शन करण्यास मनाई करण्यात आली आहे.

हे आदेश ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ६ वाजेपासून मतदान पूर्ण होईपर्यंत तसेच ९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी पूर्ण होईपर्यंत अमलात राहणार आहेत.

## धाराशिव येथे मोटरसायकलवरील टिफीन बॅगमधून ४७ हजारांची चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ फेब्रुवारी -**

आनंदनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील धाराशिव शहरात अज्ञात व्यक्तीने मोटरसायकलवर ठेवलेल्या टिफीन बॅगमधील रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी खंडू (सचिन) हरिभाऊ माने (वय २६, रा. कुमाळवाडी, ता. व जि. धाराशिव) यांनी दि.१२ जानेवारी रोजी दुपारी सुमारे २.३० वाजता धाराशिव येथील जिल्हा सत्र न्यायालयाच्या लहान गेटजवळ, श्री हॉटेलसमोर आपली मोटरसायकल उभी केली होती. मोटरसायकलला लावलेल्या टिफीन बॅगमध्ये ठेवलेली अंदाजे ४७,००० रुपये रोख रक्कम अज्ञात व्यक्तीने चोरून नेली.

या घटनेबाबत फिर्यादी खंडू माने यांनी दि.२ फेब्रुवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

घटनेचा पुढील तपास आनंदनगर पोलीस करत असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात येत आहे. शहरात दिवसाढवळ्या झालेल्या चोरीच्या घटनेमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## उमरगा येथे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अस्थी कलश दर्शन व शोकसभा

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.३ फेब्रुवारी -**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनानंतर त्यांच्या अस्थी कलश दर्शन व शोकसभेचे आयोजन दि.३ रोजी उमरगा येथील श्रीराम मंगल कार्यालयात करण्यात आले होते. या कार्यक्रमास उमरगा-लोहारा तालुक्यासह परिसरातून मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

या अस्थी कलश दर्शन व शोकसभेसाठी उमरगा-लोहारा तालुक्याचे आ. प्रवीण स्वामी, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल मोरे, भाजपचे शरण पाटील, नगराध्यक्ष किरण गायकवाड, राष्ट्रवादीचे नेते सुरेश बिराजदार यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक व व्यापारी संघटनांचे प्रतिनिधी, कार्यकर्ते




उपस्थित होते.

शोकसभेमध्ये व्यापारी महासंघ, आय.एम.ए., रोटरी क्लब यांच्यासह सर्व राजकीय पक्षांच्या वतीने दिवंगत अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. राष्ट्रवादीचे नेते सुरेश बिराजदार यांच्या हस्ते अस्थी कलश पूजन करून शोकसभेला सुरुवात करण्यात आली.

यानंतर सजवलेल्या रथातून अस्थी कलश बलचूर येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालय, समुद्राळ येथील भाऊसाहेब बिराजदार सहकारी साखर कारखाना, सास्तूर येथील हुतात्मा स्मारक येथे दर्शनासाठी ठेवण्यात आला. पुढे हा रथ धाराशिव-तेर मार्गे तेरणा नदीकडे अस्थी विसर्जनासाठी मार्गस्थ झाला. मार्गातील प्रत्येक ठिकाणी अजितदादा पवारप्रेमी नागरिकांनी मोठी गर्दी करत श्रद्धांजली अर्पण केली.

यावेळी शिवसेना युवा नेते डॉ. अजिंक्य बापू पाटील, रामकृष्ण बिराजदार, भाजपचे कैलास शिंदे, दिलीप भालेराव, सुनील माने, शौकत पटेल, प्राचार्य संजय अस्वले, शिवसेना युवा तालुकाप्रमुख अजित चौधरी, बाबा औटी, व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष नितीन होळे, मनीषा सोनी, शिवप्रसाद लड्डा, विक्रम माणिवर, डॉ. सुभाष वाघमोडे, डॉ. यतीराज बिराजदार, संजय पवार, बाबा जाफरी, सुनील साळुंखे, शमशोद्दीन जमादार, शंतनू सगर, सुशील दळगडे, विष्णू भगत, संजय जाधव, आर. के. शहापुरे, भरत बिराजदार, रणजीत बिराजदार, पिंटू कलशेट्टी, मुन्ना सूर्यवंशी, अजित पाटील यांच्यासह सर्व पक्ष व संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातूरच्या छत्रपती चौकात सिग्नलची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०३ फेब्रुवारी :** सततच्या वाहतूक कोंडीमुळे लातूर - औसा रस्त्यावरील छत्रपती चौकात सिग्नल सुविधा सुरु करण्यात यावी, अशी मागणी वाढीस लागली आहे.

लातूरचा वाहतूक कोंडीचा प्रश्न सध्या ऐरणीवर आला आहे. शहरात असा कोणताही रस्ता नाही, ज्यावर मोठ्या प्रमाणात वाहतुकीचा खोळंबा होत नाही. शहरातील अंतर्गत रस्त्यावर नेहमीच वाहतूक कोंडी होते. आता त्यासोबतच शहरालगत असणाऱ्या लातूर - औसा रोडवरील बार्शी, नांदेडच्या वळण रस्त्यावरही मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी होताना दिसत आहे. शहरातील राजीव गांधी चौकातही वाहतूक कोंडी होते. त्याबरोबरच राजीव गांधी चौक ओलांडून औशाकडे जाणाऱ्या रोडवरील छत्रपती चौकातही आता मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी होत आहे. एकदा का छत्रपती चौकात वाहतुकीची कोंडी झाली की त्यामुळे कधी कधी थेट राजीव गांधी चौकापर्यंत वाहतूक कोंडी होते. त्यामुळे वाहतूक व्यवस्थेवर नेहमीच प्रतिकूल परिणाम होत आहे. त्यामुळे राजीव गांधी चौकासह आता त्यापुढील छत्रपती चौकातही नव्याने सिग्नल उभारण्यात यावेत, अशी मागणी वाढली आहे. सिग्नल सुविधा नसल्याने वाहतूक कधी कधी या ठिकाणी शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस कर्मचारी वाहतूक नियंत्रण करताना दिसतात. तरीही या चौकात सिग्नलची उभारणी केली गेल्यास वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यांचा ताण काही प्रमाणात कमी होण्यास मदत होणार आहे.



# विविध वृत्त...

### माऊली नगरातून मोबाइलची चोरी

**लातूर :** शहरातील एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीत मोबाइल चोरीची घटना उघडकीस आली आहे. माउलीनगर, बार्शी रोड परिसरातून एका मजुराचा मोबाइल अज्ञात चोरट्याने लंपास केला. फिर्यादी प्रदीप देवगीर भुसे (वय २५, रा. माउलीनगर) हे १ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९:३०च्या सुमारास परिसरात असताना, त्यांच्या खिशातील ६,००० रुपये किमतीचा मोबाइल अज्ञात चोरट्याने अत्यंत शिताफीने चोरून नेला. या प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून एमआयडीसी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस हवालदार धुमाळ करत आहेत.

### आनंद मेळा प्रवेश शुल्क रद्द करावा

**लातूर :** लातूरचे ग्राम दैवत श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर यात्रेतील आनंद मेळाच्या आकारण्यात येणारे शुल्क रद्द करण्यात यावा, अशी मागणी लातूर शहर पूर्व भाग कृती समितीच्या वतीने माजी मंत्री आ. अमित देशमुख, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, देवस्थान ट्रस्टचे प्रशासक सचिन जांबुतराव यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनावर समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे, सचिव बाबासाहेब बसनसोडे, विश्र्वास कुलकर्णी, शंकर जाधव, भागवेश्र्वर धनगर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### पथदिवे दुरूस्ती गुत्तेदाराच्या प्रतीक्षेत

**लातूर :** मागील तीन वर्षांपासून देखभाल-दुरुस्तीअभावी रामभरोसे सुरू असलेले शहरातील पथदिवे एक-एक करुन बंद पडत आहेत. त्याच्या देखभाल-दुरुस्तीसाठी राज्य सरकारने नवा गुत्तेदार शोधला आहे. परंतु, मध्येच लागलेल्या महापालिका निवडणूक आचारसंहितेमुळे त्या गुत्तेदारासोबत करावयाचा करार अद्यापही झाला नाही. त्यामुळे शहरातील पथदिवे बंद असलेल्या भागात अंधाराचे साम्राज्य निर्माण झाले आहे.

### कारच्या धडकेत महिला जखमी

**लातूर :** लातूर ते औसा महामार्गावर भरधाव वेगाने जाणाऱ्या एका कारने दुचाकीला जोराची धडक दिली. या अपघातात दुचाकीवर पाठीमागे बसलेल्या फिर्यादीच्या आई गंभीर जखमी झाल्या. २६ जानेवारी रोजी दुपारी १:३० च्या सुमारास ही घटना घडली. २६ वर्षीय तरुण अभियंता आपल्या आईला घेऊन दुचाकीवरून जात असताना कार (एमएच २४ - सीडी २२०४) चालक ओमप्रसाद मनोहरराव कचरे याने निष्काळजीपणे गाडी चालवून दुचाकीला धडक दिली. फिर्यादीच्या आईच्या डोक्याला आणि कंबरेला गंभीर दुखापत झाली. लातूर ग्रामीण पोलिसात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल आहे.

### दुचाकी लंपास; गुन्हा दाखल

**लातूर :**तालुक्यातील करजगाव येथील एका ज्येष्ठ नागरिकाची दुचाकी अज्ञात चोरट्याने पळवल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी औसा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी तुकाराम ईराप्पा दळवी (वय ७१, रा. करजगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांची हिरो स्प्लेंडर मोटारसायकल (क्रमांक एमए. २५, एबी. ५८५५), जिची अंदाजे किंमत ३०,००० रुपये आहे, ती अज्ञात चोरट्याने पळवून नेली. ही घटना ३१ जानेवारी रोजी सकाळी १०:३० ते १ फेब्रुवारी दुपारी २:३५ च्या दरम्यान घडली.

### दोन दिवस मद्यविक्री बंद

**लातूर :** जिल्हा परिषद व त्याअंतर्गत १० पंचायत समितीसाठी ७ फेब्रुवारी रोजी मतदान व ९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणूक निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी मतदानापूर्वी व मतदानाच्या दिवशी जिल्ह्यातील सर्व मद्य दुकाने बंद राहणार आहेत.

### खड्डेमय रस्त्यांमुळे वाहनधारक त्रस्त

**लातूर :** शहरातील जुन्या रेल्वेलाईनच्या समांतर रस्त्यावर पडलेले खड्डे वाहनधारकांसाठी डोकेदुखी बनले आहेत. रस्ता दुरुस्तीसाठी वारंवार मागणी करून महापालिका प्रशासन लक्ष देत नसल्याची ओरड वाहनधारकांतून वाढली आहे. या मार्गावरील वाहतूक मुख्य मार्गाने होत आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून ते पाच नंबर चौकापर्यंतचा मार्ग अतिशय खडतर झाला आहे. खड्डे वाढल्याने याठिकाणी वाहनांपेक्षा व्यावसायिकांनी दुकाने थाटली आहे. खड्डे बुजविल्यास या रस्त्याने वाहतूक सुरू होऊन समांतर रस्त्याचा भार कमी होण्यास मदत होणार आहे.

### अजितदादांना श्रद्धांजली

**लातूर :** महराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री सर्वाचे स्व.अजितदादा पवार साहेब यांचे विमान दुर्घटनेत दुःखद निधन झाले. त्यांचे आत्म्यास शांती लाभो अशी प्रार्थना करूनजिल्हा पणन कार्यालयात भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी पणन महासंघाचे संचालक आबासाहेबजी पाटील, उच्चतम कृषि उत्पन्न बाजार समिती लातूर चे सचिव श्री अरविंद पाटील, जिल्हा पणन अधिकारी श्री मनोज बाजपेयी, कार्यलय अधिक्षक श्री विलास सोमारे, श्री बाबुराव म्हेत्रे जिल्हा पणन अधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, कृषि उत्पन्न बाजार समिती सर्व कर्मचारी तसेच महाबिज चे अधिकारी कर्मचारी यांचे कडून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# लातूरची गंज गोलाई पुन्हा एकदा अतिक्रमणाच्या विळख्यात !

## ‘अतिक्रमण हटाव’चा फार्स संपणार तरी केव्हा ?
## अर्ध्याहून अधिक रस्त्यावर हातगाड्यांच्या रांगा
## वाहनधारकांसह पादचाऱ्यांचीही होतेय अडचण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०३ फेब्रुवारी :** नवी दिल्लीच्या कॅनॉट प्लेसची प्रतिकृती समजल्या जाणाऱ्या लातूरच्या ऐतिहासिक गंज गोलाईला पडलेला अतिक्रमणाचा विळखा अद्यापही सुटू शकलेला नाही. नागरिकांकडून ओरड होताच काही काळासाठी अतिक्रमण हटविण्याचा फार्स केला जातो. पुन्हा काही दिवसानंतर अतिक्रमण ' जैसे थे' होत असल्याचा सामान्य लातूरकरांचा जुना अनुभव झाला आहे. या वाढत्या अतिक्रमणामुळे वाहनधारक, पादचारी ,व्यापारी या सर्वांचीच मोठी गोची होत असलेली पाहावयास मिळत आहे.

लातूरच्या ऐतिहासिक गंज गोलाईने नुकतेच शतक पूर्ण केले आहे. उत्कृष्ट वास्तुकलेचा उत्तम नमुना असलेल्या गंज गोलाईला सभोवतीच्या अतिक्रमणाने पुरते वेढून टाकले आहे. त्यामुळे गंज गोलाईचे सौंदर्य आणि महती दोन्ही बाबी जणू दुर्लक्षित होताना दिसत आहेत. शहराच्या विविध १२ -१३ मार्गांनी गोलाईमध्ये प्रवेश करता येतो. या सगळ्याच मार्गांना मागच्या प्रदीर्घ काळापासून अतिक्रमणाचा मोठा विळखा पडल्याचे दिसून येते. गोलाईतून मस्जिद रोड जाणारा रस्ता तर कायम हाटगाड्यानी वेढलेला आढळून येतो. या रस्त्याने एखाद दुसरी चार चाकी घेऊन जाणे सुद्धा जिकिरीचे झाल्याचे जाणवते. गंज




गोलाईची चहूबाजूने कमी अधिक प्रमाणात सगळीकडे हे अतिक्रमण झाल्याचे पाहायला मिळते. मुख्य रस्त्याने गंज गोलाईकडे येताना सुद्धा रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी हातगाड्यांच्या रांगा पाहायला मिळतात. शहरात वाहतुकीची कोंडी होण्यामागे या अतिक्रमणाचाही मोठा वाटा आहे, ही बाब दुर्लक्षून चालणार नाही. अर्ध्याहून अधिक रस्त्यावर हातगाड्यांच्या रांगा पाहायला मिळतात. त्यामुळे वाहनधारकांसह पादचाऱ्यांचीही मोठी अडचण होताना दिसते.

लातूरची मुख्य बाजारपेठ म्हणूनही गंज गोलाईकडे पाहिले जाते. मात्र, ही मुख्य बाजारपेठच वर्षानुवर्षे कायम अतिक्रमणाच्या विळख्यात राहत आली आहे. मनपा प्रशासनाकडून अधून मधून हे अतिक्रमण काढण्याचा फार्स केला जातो. काढण्यात आलेले अतिक्रमण अवघ्या काही दिवसातच नव्हे तर काही तासात पूर्ववत झाल्याची उदाहरणे अनेकदा पाहायला मिळाली आहेत. त्यामुळे स्थानिक प्रशासनालाच हे अतिक्रमण कायमस्वरूपी काढायचे नाही की काय ? असा प्रश्नही आता सुजाण नागरिकांना पडताना दिसतोय. केवळ हातगाडेच नाही तर रस्त्यालगतच्या पार्किंगच्या जागेत दैनंदिन गरजेच्या वस्तू विकणारी मंडळीही आपल्या पथारी पसरून व्यापार करताना आढळतात. अशा छोट्या छोट्या विक्रेत्यांमुळे बाजारात दुचाकी घेऊन आलेल्या ग्राहकांनाही वाहन लावायला जागा उपलब्ध होत नाही. दुचाकी धारकांची ही अवस्था असेल तर चार चाकी वाहनधारकांची काय अवस्था होत असेल याची कल्पनाही न केलेली बरी.

गंज गोलाईतील अतिक्रमण कायमसाठी काढण्यासाठी मनपा प्रशासनाने आता त्यावर उपाय योजना राबविणे आवश्यक झाले आहे. रस्त्यावर इकडे तिकडे व्यवसाय करणाऱ्या छोट्या विक्रेत्यांना, हातगाडेवाल्यांना व्यवसायासाठी जागा निश्रि्चत करून देणे गरजेचे आहे. सध्याच्या अतिक्रमण करणाऱ्यांकडून मनपाचेच काही कर्मचारी चक्क बेकायदा पैसे वसूल करून ते स्वतःच्या खिशात घालत असल्याच्या तक्रारीही आहेत. अतिक्रमण काढल्याने शहराच्या सौंदर्यात वाढ तर होणार आहेच, त्याशिवाय शहरातील वाहतुकीची कोंडीही त्यामुळे कमी होण्यास मदत होणार आहे. आता मनपाच्या निवडणुकाही पार पडल्या आहेत. मनपा पदाधिकारी - मनपा प्रशासन आणि पोलीस प्रशासन या सर्वांनी एकत्रित येऊन लातूरच्या गंज गोलाईला अतिक्रमणाच्या विळख्यातून मुक्त करावे,अशी मागणी पुन्हा एकदा वाढीस लागली आहे.

## शिक्षणमहर्षी वसंतराव काळे यांना स्मृतीदिनानिमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०३ फेब्रुवारी :** शहरातील औद्योगिक परिसरामध्ये असलेल्या जिजामाता विद्यालयात शिक्षण क्षेत्रातील थोर व्यक्तिमत्त्व शिक्षण महर्षी स्व. वसंतराव काळे यांचा २० वा स्मृतिदिन सन्मानपूर्वक साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष प्राचार्य मधुकरराव गायकवाड हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य दादासाहेब कांबळे उपस्थित होते. यावेळी शिक्षक आमदार विक्रम काळे, प्राचार्य शुभांगीताई काळे, संचालिका संजना काळे, विपुल काळे, प्राचार्य देविदास कोल्हे, गोकुळ मतकंटे, प्रा. दत्तात्रय मुंडे, प्रा. बाबासाहेब सोन-



वणे, साविजेता खंदारे, राजकुमार शिंदे, शंकर पांचाळ, शंकर दुरुगकर, प्रा. चंद्रकांत सूर्यवंशी, प्रा. सुधीर बाळापुरे, भाग्यशाली गुडे, वैशाली वाघमारे, गंगासागर गुंडेकर, वर्षा येलमटे, वैशाली फुले, सविता राठोड, अरविंद पदातुरे, प्रदीप खामगावकर, राजाभाऊ वाघमारे, बालाजी साबळे, आप्पासाहेब देशमुख, अर्जुन कांबळे, बालाजी पवार आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी शिक्षण महर्षी वसंतराव काळे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून त्यांच्या शैक्षणिक कार्याचा, दूरदृष्टीचा व समाजासाठी दिलेल्या योगदानाचा गौरव केला. शिक्षणाच्या माध्यमातून समाज घडवण्याचे कार्य त्यांनी आयुष्यभर केले. त्यांचे विचार आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. या स्मृतिदिन कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, शिस्त व शिक्षणाची गोडी निर्माण होण्यास मदत होत असून, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## बालविवाह मुक्त भारतासाठी विद्यार्थ्यांची सामूहिक शपथ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०३ फेब्रुवारी :**बालविवाह मुक्त भारत अभियान आणि मराठी भाषा संवर्धन पंधरवाड्याच्या अंतर्गत महिला व बाल विकास मंत्रालय, भारत सरकार तसेच राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांच्या ‘आशा’ मोहिमेअंतर्गत लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व लातूर येथील संत नामदेव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष संजय भारूका यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्यंकटेश गिरवलकर यांनी प्रमुख



मार्गदर्शन केले. बाल विवाहाचे दुष्परिणाम, बाल विवाह प्रतिबंधक कायदा २००६, बाल संरक्षणाशी संबंधित विविध कायदे याबाबत सविस्तर माहिती देताना त्यांनी विद्यार्थ्यांना बाल विवाहास कठोर विरोध करण्याचे आवाहन केले. तसेच बाल विवाहामुळे मुलींचे शिक्षण, आरोग्य आणि सर्वांगीण विकासावर विपरीत परिणाम होतो. विवाहासाठी मुलीचे किमान वय १८ वर्षे आणि मुलाचे २१ वर्षे असणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात मुख्याध्यापिका श्रीमती बी. एस. परगे, मुख्य न्यायरक्षक ए. जे. तिवारी, बालसंरक्षण अधिकारी धम्मानंद कांबळे यांच्यासह विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. श्री. गिरवलकर तसेच इतर मान्यवरांच्या आवाहनानुसार उपस्थित सर्व विद्यार्थ्यांनी बालविवाह मुक्त भारत निर्माण करण्यासाठी सामूहिक शपथ घेतली.

## ‘त्या’ जखमी तरुणाचा अखेर मृत्यू; दोन्ही आरोपी अटकेत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०३ फेब्रुवारी :** मागील भांडणाची कुरापत काढत किरकोळ कारणावरून चाकूने भोसकल्याने जखमी झालेल्या एका तरुणाचा रुग्णालयात उपचार सुरू असताना मृत्यू झाला आहे. या प्रकरणी दोघांविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केले आहे.

लातूर शहरातील आंबेडकर चौकात रविवारी (दि.१) रात्री पावणे अकरा वाजेच्या सुमारास प्रज्वल संजय मस्के (वय २१, रा. बौध्द नगर, लातूर) या तरुणाला त्याच्या मित्राने चाकूने बरगडीवर, पोटात भोसकले होते. चाकू खोलवर घुसल्याने घटनास्थळावरच प्रचंड रक्तस्राव झाला होता. त्याला तत्काळ उपचारासाठी शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले होते. मात्र मध्यरात्री १२.३४ वाजेच्या सुमारास प्रज्वल मस्के याला मृत घोषित करण्यात आले. याप्रकरणी मयताचा चुलत भाऊ अतीश मस्के (रा. बौध्द नगर, लातूर) याच्या फिर्यादीवरून विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात आरोपी गणेश सुरेश गायकवाड (वय १९,) व भीमा बालाजी सूर्यवंशी (वय १९, दोघेही रा. आनंद नगर, लातूर) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक अण्णाराव खोडेवाड करीत आहेत. घटनेचा थरार परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये कैद झाल्याने पोलिसांना आरोपींची ओळख पटविण्यात यश आले. तत्काळ पोलिसांनी दोन पथके तयार करून त्यांचा शोध सुरू केला. संजयनगर भागात दोन्ही आरोपी लपून बसले होते. त्यांच्याकडून पोलिसांनी कोयता जप्त केला आहे. प्रज्वल मस्के खूनातील दोन्ही आरोपींच्या मुसक्या आवळल्यानंतर त्यांना सोमवारी (दि.२) न्यायालयासमोर हजर करण्यात आले होते. त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आल्याचे तपास अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक अण्णाराव खोडेवाड यांनी सांगितले.

## ‘राजमाता जिजामाता’त पालक मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०३ फेब्रुवारी :** येथील शिवनगरातील राजमाता जिजामाता विद्यालयात शनिवारी पालक मेळावा उत्साहात पार पडला. यावेळी पालकांना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीची माहिती देऊन, विविध स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण उपसंचालक कार्यालयातील सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी एन. पी. सोनवणे, उपप्राचार्या कविता केंद्रे, संस्था समन्वयक अश्‍विनी केंद्रे, समन्वयक वैशाली केंद्रे यांची प्रमुख उपस्थित होते.पालक मेळावे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि शाळा-पालक संबंध दृढ करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असतात.

विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवून आपल्या पालकांचे स्वप्न साकार करावे, असे आवाहन सोनवणे यांनी केले.अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डी. एन. केंद्रे म्हणाले, या विद्यालयात विद्यार्थ्यांना संस्कारासोबत गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी बाळगून नियमित सराव करून आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जावे, असे आवाहन त्यांनी केले.

# शहरातील गुन्हेगारी रोखण्याची काँग्रेसची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०३ फेब्रुवारी :** लातूर शहर आणि जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून गुन्हेगारीने सीमा ओलांडली असून, सामान्य नागरिक दहशतीच्या छायेखाली वावरत आहेत. या गंभीर परिस्थितीची दखल घेत, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने सोमवारी (जिल्हा पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन आमदार अमित देशमुख यांचे या संदर्भातील निवेदन दिले.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कठोर पावले उचलण्याची आग्रही मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

या निवेदनाद्वारे आमदार अमित देशमुख यांनी रविवारी रात्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात प्रज्वल मस्के या तरुणाच्या हत्येचा संदर्भ देत पोलीस प्रशासनाला जाब विचारला आहे. सदरील धक्कादायक घटना स्वतः आ. देशमुख यांनी पाहिली असून, भरचौकात लोकांसमोर तरुणाची हत्या होणे हे अत्यंत क्लेशदायक असल्याचे त्यांनी या पत्रात नमूद केले आहे. लातूर हे शिक्षण आणि व्यापाराचे केंद्र आहे. मात्र मागच्या काही महिन्यांपासून वाढत चाललेल्या खुनांच्या घटना, अमली पदार्थांची विक्री आणि जमिनींवरील अतिक्रमणे यामुळे शहराची प्रतिमा मलीन होत असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली आहे.

लातूर शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष ॲड. किरण जाधव यांच्यामार्फत पो-




लीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात लातूर येथील शांतता, सामाजिक सलोखा टिकवून ठेवण्यासाठी गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांवर तात्काळ मोक्का किंवा तडीपारीसारख्या कडक कारवाया करण्यात याव्यात. तसेच रात्रीची गस्त वाढवून अवैध धंदे कायमचे बंद करण्यात यावेत, अशा प्रकारच्या मागण्या देखील आ. देशमुख यांनी केले आहेत. पोलिस प्रशासनाने तातडीने गुन्हेगारांवर वचक निर्माण नाही केल्यास जनतेच्या सुरक्षेसाठी काँग्रेस पक्षकडून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. या शिष्टमंडळात मनपा गटनेते विजयकुमार साबदे, नगरसेवक विकास कांबळे यांच्यासह पदाधिकारी, नगरसेवक आणि कार्यकर्ते उपस्थित होते.